# अनुक्रमणिका


4 अध्यक्षीय– जयंत पाटील– हक्क मागतोय महाराष्ट्र मोहिमेतून...

5 संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे– उजाडले, पण सूर्य कोठे आहे?

10 महायुतीचे सरकार बदलल्याशिवाय जनता स्वस्थ बसणार नाही– शरद पवार

12 अदृश्य शक्तीच्या मनमानीवर नाही, तर संविधानावर देश चालतो– सुप्रिया सुळे

16 अजित पवारांचा प्रयत्न सहानुभूती दाखविण्याचा– जयंत पाटील

18 शरद पवार : कागल (कोल्हापूर) सभा
लोकहित जपणारी नेतृत्वाची फळी निर्माण करणार– शरद पवार

22 भाजपचे डावपेच जुने होऊ लागले– व्यंकटेश केसरी

28 सामुहिक शक्तीच्या जोरावर सरकारला त्यांची जागा दाखवू– शरद पवार

32 जळगाव व भंडारा जिल्ह्यात राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा, भाषणे...
१) गद्दारांना धडा शिकवा, नव्याने इतिहास घडवा– जयंत पाटील–३२
२) ५० खोके एकदम ओके आणि वाघांचे झाले बोके– अमोल कोल्हे– ३६

40 गमावलेला आत्मविश्वास, निसटती पकड संपलेली सद्दी– अनंत बागाईतकर

46 गाझापासून युक्रेनपर्यंतचा नरसंहार– प्रभाकर खोले

52 महायुती सरकारमध्ये भ्रष्टाचाराचा प्रचंड सुळसुळाट– शरद पवार

60 श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांचा विजय अपेक्षितच– जतीन देसाई

66 कर्तृत्व दाखविणारेच समाजकारण,राजकारणात टिकतात : शरद पवार

70 जाता–जाता (फिरस्ता)– चला मुरारी हिरो बनने..

78 सत्तेचा उन्माद आलेल्यांना जागा दाखवण्याचं काम करा– शरद पवार

82 अणणाभाऊंच्या विचारात देशाचं चित्र बदलण्याची ताकद– शरद पवार

88 कानोकानी– घंटाकर्ण (हलके–फुलके राजकीय किस्से)

96 सीताराम येचुरी : उणीव भासणार– अनंत बागाईतकर

102 शेवटचे पान– हेमन्त टकले– महात्मा गांधी अहिंसेचे पुजारी, तरीही क्रांतीकारी



**संचालक**
**हेमन्त टकले**
---
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
---
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.
---
**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी सहाय्य**
दिलीप रोडे
**फोटो**
मयूर बोराडे
---
**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
---
मुद्रक, प्रकाशक हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३, आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

## अध्यक्षीय



# हक्क मागतोय महाराष्ट्र मोहिमेतून, राज्याचं वैभव परत मिळवूया

खरा वीर वैरी पराधीनतेचा
**महाराष्ट्र आधार हा भारताचा**

महाराष्ट्र हे एक असं राज्य हे ज्याने दिल्लीच्या तख्तालादेखील गुडघे टेकवायला लावलं होतं. या देशाच्या राज्यकारभाराचं पान हे कधीच महाराष्ट्राशिवाय आजपर्यंत हललेलं नाही. पण गेल्या २०१४ पासून आलेल्या केंद्रातील मोदी सरकारमुळे आणि राज्यात गेल्या अडीच वर्षांपासून असंवैधानिकपणे सत्तेवर आलेल्या महायुती सरकारमुळे देदिप्यमान महाराष्ट्राचं खच्चीकरण मागच्या काही वर्षांमध्ये केलेलं आहे.

आज शिवाजी महाराजांच्या नावाने, फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांच्या निमित्ताने महाराष्ट्राचा जाज्वल्य इतिहास हा नेहमीच महाराष्ट्राला आणि देशाला कलाटणी देणारा ठरला आहे. आणि मागच्या दहा वर्षांत नेमकं शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार, छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार हा बदलण्याचा किंवा कमी लेखण्याचं काम आणि महाराष्ट्राला सतत महाराष्ट्राचं खच्चीकरण करण्याचं काम हे महाराष्ट्रातल्या भारतीय जनता पक्षानं आणि त्यांच्या दोन्ही मित्र पक्षांनी केलं आहे. तीन काळे कृषी कायदे देशात लागू केले. सातशे शेतकऱ्यांना त्याठिकाणी बळिराजांना मृत्यूच्या दारात लोडण्याचं काम त्या काळात झालं. त्याचबरोबर शेतकऱ्याला हमीभावापासून, पीक विम्यापासून, दुष्काळातील मदतीपासून वंचित ठेवण्याचं कामदेखील याच काळात झालं. सोयाबीन असो, कांदा असो, कपाशी असो, संत्रा असो, दूध उत्पादक असोत हे सगळे चिंतेत गेले. आणि दूध उत्पादकांची तर गळचेपी कशी झाली हे आपण महाराष्ट्रानं पाहिलेलं आहे.

महाराष्ट्राकडून सर्वाधिक जीएसटी केंद्र सरकार आणि राज्य सरकारला गोळा होतो. आणि एवढा मोठी निधी तिजोरीत केंद्राच्या दिल्यानंतर महाराष्ट्राला न्याय मिळत नाही. शेजारच्या-पाजारच्या राज्यांना न्याय दिला जातो अर्थसंकल्पात. पण, केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मदत कधी झाली नाही. पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस सिलिंडर याचा सगळा खर्च, विजेचे दर वाढतायंत, प्रवास खर्च वाढतोय आणि अगदी दोनवेळचं जेवणाचं ताटदेखील आता महाग झालेलं आहे. एकीकडं प्रत्येक गोष्टीत महागाई करायची आणि दुसरीकडं फक्त पंधराशे रूपयांत बोळवण करायची ही परिस्थिती महाराष्ट्रात आज हे सध्याचं सरकार करतंय.

असुविधा, कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, त्याचबरोबर भ्रष्टाचारामुळे उद्योग प्रकल्पांची महाराष्ट्राकडं पाठ फिरलेली आहे, उद्योजकांकडून प्रकल्पासाठी राज्याच्या यादीतून महाराष्ट्राला वगळण्यात आलेलं आहे. का? तर महाराष्ट्रात भ्रष्टाचार प्रचंड झालेला आहे. आणि प्रत्येक गोष्टीत आपला वाटा मागणारे सत्ताधीश हे महाराष्ट्रात उद्योग येत नाहीत असं वातावरण निर्माण करण्यात सहाय्यभूत ठरतायत. औद्योगिकीकरणात आम्ही दरडोई उत्पन्नातदेखील दहाव्या क्रमांकावर गेलेलो आहे. हे अजून नंबर खाली घसरायला वेळ लागणार नाही. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्रात औद्योगिकीकरणाची गंगा आणली. परंतु, ही आता ओळख पुसून टाकण्याचं काम आणि उद्योग महाराष्ट्राच्या बाहेर नेण्याचं आणि जाण्याचं काम हे सध्याचं महायुतीचं सरकार करतंय. अनेक उद्योग गुजरातमध्ये गेले, तरी सरकार ब्र काढत नाही. आजच एक बातमी आलेली आहे, की चाकण इंडस्ट्रियल इस्टेटमधूनदेखील आता बरेच उद्योग बाहेर जायला लागले.

दुसऱ्या बाजूनं युवकांच्यासाठी, विद्यार्थ्यांच्यासाठी स्पर्धा परीक्षेतला सावळा गोंधळ आपण अनेकांनी अनुभवलेला आहे. रिक्त सरकारी पदं, रखडलेली शिक्षक भरती, नीटच्या परीक्षेत झालेला भ्रष्टाचार म्हणजे सगळ्या महाराष्ट्रातला युवा वर्ग संतप्त या सरकारच्या विरोधी झालेला आहे. ऑलिम्पिक खेळापासून ते आपल्या गावातल्या माता भगिनींपर्यंत महिलांच्यावर अत्याचार कसे मागच्या काळात झाले हे आपण बघितलं. आमच्या लाडक्या बहिणीला सुरक्षिततेची खात्री हे सरकार देऊ शकत नाही, हे महाराष्ट्रातल्या सगळ्या आमच्या लाडक्या बहिणींच्या लक्षात आलं आहे. दुसरं पवित्र विधानसभेच्या पायऱ्यांपासून ते पोलिस ठाण्यातल्या गोळीबारापर्यंत कायदा सुव्यवस्थेचा पूर्ण बोजवारा उडालेला आहे. या सरकारच्या काळात कोयता गँग, ड्रग्ज रॅकेट व नागपुरात टेबलवर बसून जुगार खेळणारे पोलिस हे सगळं आपण सगळ्यांनी पाहिलेलं आहे. आणि त्यामुळं उभ्या महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा मालवणचा पुतळा कोसळला. त्यामध्येदेखील भ्रष्टाचार करताना या सरकारनं मागं पुढं पाहिलं नाही. महापुरूषांचा अवमान करतानादेखील पाहिलं नाही आणि हा पुतळा उभा करतानादेखील प्रचंड भ्रष्टाचार करून हा पुतळा कोसळेल अशा पद्धतीचं काम त्याठिकाणी त्यांनी उभं केलं. आणि एक शेवटी संविधानाला बदलण्याचा डाव आजही यांचा कायम आम्हाला दिसतोय. समृद्धी महामार्ग, (पान नं. १०१ वर)

संपादकीय





# उजाडले
## पण सूर्य कोठे आहे?

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक ऑक्टोबर महिन्यात म्हणजे हरियाणा आणि जम्मू-काश्मीर निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर जाहीर होणार असली तरी निवडणुकीला खरा रंग व प्रचाराला जोर चढणार आहे तो दिवाळीचा फराळ खाल्यानंतरच. दिवाळीच्या आधी म्हणजे हरियाना व जम्मू-काश्मीरच्या बरोबरीने महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका घेतल्या असत्या तर सत्तेत घुसखोरी करून बेकायदेशीररित्या बसलेल्या गद्दार व खोकेबाज सरकारला दिवाळी गोड लागण्याची व फराळ पचण्याची सुतराम शक्यता नव्हती. कारण महायुतीच्या नेत्यांना पराभवाचा जमालगोटा महाराष्ट्रातली जनता व मतदार इतक्या बेमालूमपद्धतीने व जबरदस्त देणार आहेत की 'हेचि फळ काय मम आले तपाला' असे हताश बुद्धीने म्हणण्याची पाळी त्यांच्यावर येणार आहे. केंद्रातील कुबड्या व लुळ्यापांगळ्या सरकारला याची माहिती गुप्तचर यंत्रणांकडून आधीच मिळालेली असल्यामुळे सगळा पराभव एकदम झेपणार नाही आणि त्याचा परिणाम पुढच्या झारखंड, दिल्लीसारख्या विधानसभा निवडणुकींवर झाल्याशिवाय राहणार नाही याची जाणीव झाल्यामुळे ताक सुद्धा फुंकून प्यायचा उद्योग केंद्रातील सत्ताधारी जोडगोळीने चालविलेला आहे. पण म्हणतात ना, बुडत्याचा पाय खोलात. त्याप्रमाणे ट्रिपल इंजिन सरकार दररोज त्यांच्या कर्तृत्त्वाने दोन-चार फूट गाळात रूततच चालले आहे. त्यामुळे त्यांची अवस्था 'आपुले मरण पाहिले म्यां डोळा' अशीच आहे.

आता पुन्हा आपण सत्तेवर येण्याची सुतराम शक्यता नाही याची पूर्ण खात्री असल्यामुळे ट्रिपल इंजिन सरकारातील सर्व मंत्र्यांनी राज्याच्या तिजोरीतले जे जे हाताला लागेल ते ओरबाडून पळविण्याचा उद्योग चालविलेला आहे. भरदिवसा महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीवर मंत्री दरोडा घालताहेत आणि मंत्र्यांचे नायकही 'आम्हाला पक्ष चालवायचा आहे' या नावाखाली शासनाची तिजोरी लुटून नेताहेत. एमएमआरडीए, बृहन्मुंबई महानगरपालिका, विविध सरकारी महामंडळे पूर्णपणे खाऊन फस्त झाली आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून स्थानिक स्वराज्य संस्थांचाही ट्रिपल इंजिन सरकारने बेंडबाजा वाजविला आहे. ''आमच्या ३५-४० वर्षांच्या नोकरीच्या कारकिर्दीत इतकं भ्रष्ट आणि लुटारू सरकार कधी पाहिले नव्हते,'' असे सरकारी नोकरीतला प्रत्येक अधिकारी व कर्मचारी म्हणतो आहे आणि मतदार राजाही त्या भ्रष्टाचाराची चव रोज चाखतो आहे, त्याच्या कळा सोसतो आहे. त्यामुळेच जनता राज्य सरकारच्या भ्रष्ट कारभाराला पूर्णपणे कंटाळून वैतागलेली आहे. शिंदे सरकारच्या काळात भ्रष्टाचाराची बजबजपुरी इतकी माजली आहे की एक मंत्री दुसऱ्या मंत्र्याचे काम देखील फुकट, चिरीमिरी हातावर ठेवल्याशिवाय करीत नाही. मग सामान्य जनतेचे हाल कोण खाणार? त्यांना तर मंत्रालयात शिरायचा पास देखील मिळू नये अशीच व्यवस्था प्रशासनाने देखील केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या एजंट व दलालांनी तर मंत्रालयात हैदोस घातला आहे. त्यांच्या गाडयांना आत शिरण्याचे पासेस आहेत. या गाड्यांमधून भरलेल्या बॅगा वाहायची मुभा आहे पण सर्वसामान्य जनतेला व अडलेल्या नडलेल्या लोकांना खिशात पाच-दहा हजार रूपये ठेवायची सुद्धा मुभा नाही. त्यांना दिवसभर रांगेत प्रवेशासाठी तटकळत उभे राहावे लागते आहे. संध्याकाळी चार-पाचला प्रवेश मिळतो तेव्हा मंत्रालयातला कर्मचारी घरी जाण्याच्या मानसिक तयारीला लागलेला असतो. तो लोकांना भेटतच नाही. नुसते हेलपाटे मारण्यात गोरगरिबांचा वेळ वाया चाललेला आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी आपली फाईल क्लिअर होऊन सही झाली पाहिजे यासाठी त्याची धडपड आहे. संत तुकारामांच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' अशीच त्यांची अवस्था आहे. पण मंत्रालयातली कोणतीही फाईल वजन ठेवल्याशिवाय सही होत नाही याचा नित्य अनुभव जनता घेत असल्यामुळेच तिने हे ट्रिपल इंजिन सरकार कमरेत लाथ घालून सत्तेमधून बाहेर हाकलून देण्याचे ठरविले आहे.

बदल्या व नेमणुकांचे आणि चौकशा करायच्या की नाही हे सर्व ठरविण्याचे अधिकार मंत्र्यांनी आपल्या हाती घेतलेले असल्यामुळे पैशाचे व्यवहार झाल्याशिवाय कोणताच निर्णय होत नाही. एका नामांकित महापालिकेत एका आयुक्तांची नेमणूक करायला ३० कोटी रूपये घेतले गेले आणि तीन महिन्यांच्या आतच त्या आयुक्तांची उचलबांगडी करण्याचा निर्णय झाला. या जागेसाठी दुसऱ्या कोणीतरी मोठी सुपारी दिली होती. मग मंत्रालयात त्या मंत्र्याच्या दालनात प्रचंड खडाजंगी झाली. त्या अधिकाऱ्यानेही भ्रष्टाचाराचे तुमचे सगळे भांडेच फोडतो अशी धमकी दिल्यावर ती बदली थांबली असे सांगितले जाते. खरं खोटं त्या दोघांनाच माहिती. पण या प्रकरणाची अधिकारी वर्तुळात राज्यभर मोठी चर्चा झाली. आता अधिकाऱ्यांना देखील कळून चुकले आहे की मलिद्याची जागा हवी असेल तर अगोदर मोठा मलिदा मंत्र्याच्या तोंडात भरवावा लागतो तेव्हांच पोस्टींगचे फळ मिळते. हा मलिदा जमविण्यासाठी तो अधिकारीही लोकांना





लुटतो आहे. महायुती सरकारमुळे राज्यात अराजक माजले आहे. त्यात महागाई, बेरोजगारी गगनाला भिडली आहे. महाराष्ट्रातले बरेचसे उद्योग मोदी-शहा जोडगोळीने गुजरातला पळविलेले असल्यामुळे लाखो लोकांच्या नोकऱ्या जाऊन त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. त्याचा परिणाम सामाजिक अस्वास्थ्य व अशांतता निर्माण होण्यावर झाला आहे.

लाडकी बहिण आणि लाडका भाऊ योजनाच आता आपल्याला या निवडणुकीत तारेल या गोड भ्रमात ट्रिपल इंजिन सरकार गुंग झाले आहे. दर महिन्याला १५०० रू. दिले म्हणजे बहिण आता आपली कायमची मतदार झाली या गोड स्वप्नात महायुती सरकारचे मंत्री, आमदार, नेते, कार्यकर्ते आकंठ बुडाले आहेत. त्याना वास्तवाची, सत्याची, वस्तुस्थितीची प्रत्यक्ष जाणीव करून द्यावी, स्वप्नातून खाली जमिनीवर उतरवावे म्हणून अनेक अनुभवी, जाणकार व जबाबदार लोक सोशल मिडीयाच्या माध्यमातून वारंवार लिहून सांगताहेत की, पूर्ण पगार बायकोच्या हातात देऊनही जी नवऱ्याचे ऐकत नाही ती तुमच्या १५०० रूपयांनी थोडचं तुमचं ऐकणार आहे का? पण महायुतीतले लोक हे समजून घ्यायला तयारच नाहीत. या लाडक्या बहिणींना हे पूर्णपणे माहिती आहे की ही योजना विधानसभा निवडणुकीपुरतीच आहे. निवडणूक संपल्यावर योजना लगेच बंद होणार आहे. कारण ज्या मध्यप्रदेश राज्याच्या लबाड मामाच्या योजनेची आपण कॉपी केली आहे, ती योजना मध्यप्रदेशात भाजपचे सरकार सत्तेवर आल्यावर आता बंद करण्यात आली आहे. तिथे लाडकी बहिण आता दोडकी झाली आहे. या बहिणींना आणखीन पुढची देखील एक गोष्ट माहिती आहे ती म्हणजे ही जी खिरापत वाटण्याचे काम चालू आहे तो सरकारी तिजोरी साफ करण्याचा नामी गोरख धंदा ट्रिपल इंजिन सरकारने हाती घेतला आहे. तिजोरीत खडखडाट असताना कोणीच ही योजना चालवू शकणार नाही. त्यामुळे आत्ता जोपर्यंत गंगा वाहते आहे तोवर आपला लोटा बुडवून घ्या. गंगा आटल्यावर योजना चालविणारेच बुडणार आहेत.

या लाडकी बहिण योजनेचा परिणाम इतर विकास कामांवर आणि दस्तुरखुद्द आमदारांच्या निधीवरही झाला आहे. अगोदरच निधीवाटप करताना वित्तमंत्र्यांनी दुजाभाव करून विरोधी आमदारांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या आणि जवळच्या व मर्जीतल्या आमदारांना निधीचा प्रचंड मलिदा वाटून भरपूर कमिशन खाण्याची व्यवस्था त्यांची करून ठेवली आहे. भाजपच्या आणि शिंदे गटाच्या आमदारांना मात्र राष्ट्रवादीच्या (अजित पवार गटाच्या) आमदारांइतका निधी न मिळाल्यामुळे त्यांनी अजित पवारांच्याविरुद्ध बोंबाबोंब सुरू करून त्यांना आधी सत्तेतून बाहेर काढा असा आरडाओरडा चालविलेला आहे. त्यामुळेच जाणीवपूर्वक भाजपचा सामान्य कार्यकर्ताही अजित पवारांना लाखोली वाहतो आहे आणि शिंदे गटाचे आमदार वारंवार मुख्यमंत्र्यांकडे तक्रारी करून अजित पवारांचा पाणउतारा करताहेत. त्यांनी भाजपमधून बाहेर पडावे असे वातावरण व व्यवस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपच्या कोअर गटाकडून जाणीवपूर्वक केली जात आहे. पण 'कुत्ता ना घरका, ना घाट का' अशी अवस्था झालेल्या अजित पवारांच्या वाट्याला लाचारीचे व अपमानास्पद वागणुकीचे जीणे आले आहे. अर्थात त्यांनी स्वतःच्या हाताने आपल्या पायावर धोंडा मारून घेतला आहे आणि आता पश्चात्तापाचा कोळसा रोज

उगाळून पक्ष सोडून जाणाऱ्यांना साळसूदपणाचा फुकटचा सल्ला देत आहेत. हा वांझोटा सल्ला ऐकायला नेते व कार्यकर्ते काही इतके मूर्ख नाहीत. अजित पवारांनी स्वतःभोवती सगळी मलिदा गँग गोळा केली आहे. कॉन्ट्रॅक्टर, ठेकेदार, एजंट, दलाल, सुपारी बहाद्दर व रोज कुणाला ना कुणाला टोपी घालणाऱ्या बाजार बुणग्यांनी अजित पवारांना घेरले आहे. अभिमन्यूसारखे ते आता चक्रव्यूहात सापडले आहेत. बाहेर पडण्याचा रस्ता त्यांना सापडत नाही म्हणा किंवा तो पूर्वीच बंद झाला आहे म्हणा किंवा मलिदा हाणणारे त्यांना बाहेर पडू देत नाही म्हणा, लोकांच्या बापांकरिता स्वतःच्या मिशा काढण्याचा नसता उद्योग 'अजित पवारांनी चालविलेला आहे.

अजित पवारांची पुरती कोंडी करायची असे ठरवून केंद्रीय गृहमंत्री त्यांना रोज आपल्या दाराचा उंबरठा झिजवायला लावताहेत. वाघाची बकरी झाली आहे हे चित्र सारा महाराष्ट्र रोज उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे आणि स्वतःच्या चुलत्याशी ४० वर्षे सांभाळल्यानंतरही गद्दारी करणाऱ्या पुतण्याबद्दल जनतेला काडीमात्र व तसूभरही प्रेम राहिलेले नाही हे या विधानसभा निवडणुकीत पुन्हा दिसणार आहे. त्यामुळेच अजित पवार आतून घाबरले आहेत, हवालदिल झाले आहेत आणि बारामतीतून निवडणूक लढवावी की नाही या द्विधा मनःस्थितीत आहेत. त्यांनी अमित शहांकडे ६०-७० जागांची भीक मागितली आहे पण ते ४०-५० पेक्षा जास्त जागांचा तुकडा टाकायला तयार नाहीत. त्यांना अजित पवारांनी स्वतः होऊन बाहेर पडावे हेच अपेक्षित आहे. शहाण्यांना शब्दांचा मार पुरतो पण झोपेचे सोंग घेतलेल्यांना जागे करणे अवघड असते. आता मुख्यमंत्रीपदाचे अजित पवारांचे स्वप्न कायमचे विरले आहे. आपण कधीच मुख्यमंत्री होऊ शकणार नाही याची पुरेपूर जाणीव झाल्यामुळेच त्यांनी शहांकडे आलटून पालटून मुख्यमंत्रीपद द्यावे अशी माधुकरी मागितली आहे पण भाजपवाले त्यांच्या मूळ पदावर आणि वळणावर जाणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. ते विधानसभेची निवडणूक संपल्यानंतर गद्दार आणि खोके बहाद्दर शिंदे गटाच्या व अजित पवार गटाच्या निधी लोलूप आमदारांना पराभवाची चव चाखवून चांगले कंबरडे मोडणार हे विधीलिखीत ठरलेलं आहे. आजपर्यंतचा भाजपचा तोच अनुभव आहे. हा पक्ष 'भोगूनी त्यागी' आहे पण सोबत जाणाऱ्यांना ते कळत असूनही ते न कळल्यासारखे दाखविताहेत यामागे संधीची सेवा करणे आणि स्वतःची घरे भरून प्रॉपर्टी वाढविणे एवढाच मुख्य उद्देश आहे.

मोदी-शहा ही जोडगोळी वारंवार महाराष्ट्राचा दौरा करते आहे आणि पंतप्रधान महाराष्ट्रातल्या गावागावात व गल्लीबोळात जाऊन नारळ फोड, हिरवा झेंडा दाखव, फित काप असले जे उद्योग करताहेत त्यामागे महाराष्ट्रातल्या जनतेची सेवा करावी हा काही हेतू नाही. पण देवेंद्रच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या एकनाथ शिंदेंना व अजित पवारांना हे कधी कळणारच नाही. मोदी-शहा या जोडगोळीला महाराष्ट्रात जी भिती वाटते आहे ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचीच. त्यामुळे शहा वारंवार भाषणातून सांगताहेत, ''पवार आणि ठाकरे गटाचे नेते व कार्यकर्ते फोडा. त्यांना आपल्या बाजूला घ्या.'' एकनाथ आणि अजित या दोघांना घेऊन पुरेसा फायदा आपल्याला झालेला नाही आणि भविष्यात तर होण्याची अजिबात शक्यता नाही हे चाणाक्ष

## चाणक्यांना शिंदे-पवारांचे ग्रहण

भाजपचे चाणक्य आणि देशाचे गृहमंत्री अमित शहा यांना एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे मोठे ओझे झाले आहे. ही पीडा मानेवरून उतरविलीच पाहिजे असा त्यांच्या मनाने आता चंग बांधला आहे. त्यामुळे त्यांनी नुकत्याच झालेल्या भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत शतप्रतिशत भाजपाच सत्तेवर आली पाहिजे आणि एकट्याच्या ताकदीचे दर्शन महाराष्ट्राला घडले पाहिजे असा संदेश दिला. खरे तर त्यांना या विधानसभेपासूनच शिंदे आणि अजित पवार नको आहेत. पण निवडणुका एकदम तोंडावर आहेत, म्हणून त्यांची बोलती बंद झाली आहे. शिंदे व पवारांचे ग्रहण निवडणुकीनंतर आपोआप संपणारच आहे याची पूर्ण खात्री चाणक्यांना आहे, त्यामुळेच त्यांनी २०२९ चा स्वबळाचा नारा दिला आहे.





गृहमंत्र्यांच्या वेळीच लक्षात आल्यामुळे त्यांनी एकनाथ व अजित या दोघांनाही फाट्यावर मारून नवीन भरती पक्षात करण्याचा सल्ला भाजपच्या बैठकांमधून देण्यास सुरूवात केली आहे. पण हा सल्ला खुद्द भाजपच्या आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांना अजिबात पटलेला नाही. अगोदरच ते भ्रष्टाचारी अजित पवारांना सत्तेत सामील करून घेतल्यामुळे संतप्त आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने तर त्यांच्या 'ऑर्गनायझर' आणि 'विवेक' या मुखपत्रातून एवढ्या भ्रष्ट नेत्याला सत्तेत घ्यायलाच नको होते असा स्पष्टपणे लिहून घरचा आहेर दिला. आजही भाजपचे आणि संघाचे कार्यकर्ते




प्रचंड अस्वस्थ व नाराज आहेत. इतकी वर्षे आम्ही मेहनत करून पक्ष सत्तेत आणला आणि देवाभाऊने आम्हांला काहीही न देता भ्रष्टाचारी नेत्यांना सत्तेत भागीदारी देऊन आमच्या ऊरावर बसविले. त्यामुळे लोकसभा निवडणुकीमध्ये संघाच्या लोकांनी भाजपच्या उमेदवारांचे प्रचाराचे काम केले नाही. आत्ता या विधानसभेलाही ते करतील असे वाटत नाही. कारण संघाच्या कार्यकर्त्यांचा भाजप नेत्यांनी म्हणजे दस्तुरखुद्द भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी ''आर.एस.एस. ची आता आम्हाला काहीही गरज राहिलेली नाही. भाजप स्वतःच्या सामर्थ्यावर पुरेसा बलवान झालेला आहे.'' असे जाहीरपणे सांगून संघ परिवाराचा प्रचंड अपमान तर केलाच पण मागील शंभर वर्षांपासून संघ स्वयंसेवक ज्या ध्येयाने, निष्ठेने, प्रामाणिकपणे व प्रसंगी हालअपेष्टा सोसून काम करीत आले आहेत त्याच्यावर एका वाक्याने बोळा फिरवून त्यांचा उपमर्द केला. श्री. नड्डा हे ज्या हिमाचल प्रदेशातून येतात तिथे त्यांच्या पक्षाचा म्हणजे भाजपचा पूर्ण पराभव झाला आहे. सत्ता कॉंग्रेसच्या हाती गेली आहे. यावरून नड्डा यांची त्यांच्या राज्यातच काय किंमत व लायकी आहे हे दिसून आले आहे. खरं तर ज्या दिवशी नड्डांनी हे भाषण केले त्याच दिवशी त्यांना भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावरून हाकलून द्यायला हवे होते. पण तेवढे सामर्थ्य व धैर्य मोदी-शहांना दाखविता आले नाही. इतकेच नव्हे तर त्याबद्दल ते अवाक्षरही बोलले नाहीत आणि संघाची माफी देखील मागितली नाही. मग प्रश्न असा पडतो आज जर गोळवलकर गुरूजी किंवा डॉ. केशव बळीराम हेडगेवार हयात असते तर त्यांनी भाजपच्या नेत्यांकडून झालेला अपमान व मानहानी इतक्या निमूटपणे सहन केली असती का? आजचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे भाजप नेत्यांच्या व विशेषतः मोदी-शहा या जोडगोळीच्या खिशात जाऊन का बसले आहेत! मूकपणे ते एवढी मानहानी व वाईट वागणूक का सहन करताहेत! महाराष्ट्रात आता भाजपला जनतेचा पाठिंबा राहिलेला नाही आणि त्यांच्या आधाराने सत्तेचा मध चाखत असलेल्या शिंदे व पवारांना विधानसभा निवडणुकीत पराभवाची चव चाखविल्या शिवाय जनताही स्वस्थ बसणार नाही हे आज फिरलेल्या वातावरणातून दिसतेच आहे. महायुती सरकारला तीनही पक्ष मिळून विधानसभा निवडणुकीत १०० ते १०२ जागा मिळतील असा गुप्तहेर (रॉ) संघटनेने




स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार!

अंदाज व्यक्त केला आहे. खरा अंदाज दिला तर तो मोदींना सहन होत नाही. त्यामुळे खोटा अंदाज देत चला असा नवा फंटा नोकरशाहीने प्रसूत केला आहे. पण सत्य हे कधीही साधे असत नाही हे जुमलेबाज व असत्याचा आधार घेऊन जनतेची दिशाभूल व फसवणूक करीत आलेल्या भाजप नेत्यांना कसे व कधी कळणार? त्यांचे रोजचे जगणे, उठणे, मरणे असत्यातच चालू आहे. जनतेला या असत्याची व खोटारडेपणाची आता किळस आली आहे. त्यामुळे ती महायुतीचे सरकार उलथून टाकण्याच्या मनस्थितीत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था तर भाजप व महायुतीने अत्यंत कठिण करून ठेवली आहे. त्यांना देशोधडीला लावून कर्जबाजारी करून ठेवले आहे. शेतकऱ्यांच्या त्यांनी उत्पादित केलेल्या कुठल्याही मालाला भाव नाही. कांदा, सोयाबीन, कापूस, भात (धान) या मालाच्या आधारभूत किंमती वाढवून द्याव्यात व सरकारने माल खरेदी त्वरित सुरू करावी तसेच आतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. खरीपाची पिके वाहून गेली आहेत, सडली आहेत. काढलेले पीककर्ज कसे भरावे असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी मिळावी. पिकांची नुकसानभरपाई मिळावी यासाठी शेतकरी गावोगावी आंदोलने करताहेत, रास्ता रोको करताहेत, मोर्चा काढताहेत, धरणे धरताहेत पण सरकार शेतकऱ्यांना काहीही मदत करायची नाही. त्यांनी उत्पादित केलेल्या मालाचे भाव पाडून ग्राहकांना, मध्यमवर्गीयांना व नोकरदार लोकांना स्वस्तात शेतमाल मिळाला पाहिजे मग शेतकरी मेला तरी चालेल या विचारावर ठाम ठाण मांडून बसलेले आहे. मध्यमवर्गीयांची मते मिळविणे हेच महायुती व भाजप नेत्यांचे अंतिम ध्येय असल्यामुळे त्यांनी शेतकरी वर्ग पूर्णपणे वाऱ्यावर सोडून दिला आहे. इतकेच नव्हे तर शेतकऱ्याचे काहीही करून कंबरडे मोडायचेच असा निर्धार करून सरकारने कांदा, साखर यांच्या निर्यातीवर बंधने तर आणलीच पण कांदा, संत्रा, मोसंबी, द्राक्षे ही फळे जी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर निर्यात होत होती त्यांच्यावर शेजारच्या बांगला देश, श्रीलंका या देशांनी १०० टक्क्यांच्या पुढे जो आयातकर बसविलेला आहे तो उठवावा यासाठी केंद्र सरकारने मध्यस्थी व बोलणी करावी असा शेतकऱ्यांनी आग्रह धरून मागणी केली. पण जगभरचे रोज दौरे करणाऱ्या आणि फोकनाड गोष्टी सांगून स्वतःची वाहवा मिळविणाऱ्या पंतप्रधान मोदींना शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी दोन शब्द खर्ची करावेत असे वाटत नाही हे अन्नदात्या शेतकऱ्यांचेचं मोठे दुर्दैव आहे. त्यामुळेच अडचणीत सापडलेला शेतकरी त्यांना तारणहार वाटणाऱ्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीच्या पाठिशी विधानसभा निवडणुकीत उभा राहिला तर नवल वाटायला नको.



भाजप नेत्यांनी ज्या पद्धतीने दमदाटी करून व ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, जीएसटी विभाग व पोलिस यंत्रणेचा वापर करून शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे पक्ष फोडले व आमदार चोरून पळवून नेले हे जनतेला अजिबातच रूचलेले नाही. निवडणूक आयोग आणि न्यायालयांवर दबाव आणून आपल्याला पाहिजे त्या पद्धतीने भाजप सरकार निर्णय करून घेते आहे. देशात एक प्रकारची अघोषित आणीबाणी व हुकूमशाही आहे हे जनतेला कळत नाही अशातला भाग नाही. ती भयग्रस्त व दबलेली आहे. तापलेल्या बॉयलरचा सेफ्टी व्हॉल्व जर बराच काळ बंद केला तर अखेरीस त्याचा स्फोट होतो हे भाजप नेत्यांना नुसते सांगून कसे कळणार? त्यांना याचा अनुभव विधानसभा निवडणुकीत जनता देईलच! गद्दार आमदारांचे, '५० खोके एकदम ओके' हा मंत्र स्वीकारून मतदारांशी प्रतारणा केलेल्या शिंदे व अजित पवार गटाच्या आमदारांचे नामोनिशाण या निवडणुकीत पुसले जाणार आहे. त्यांचा पराभव अटळ आहे. त्यामुळेच बऱ्याच लोकांनी आता घरवापसी करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तसा प्रयत्नही ते करताहेत. पण मतदारांचा, जनतेचा व प्रामाणिक स्वच्छ कार्यकर्त्यांचा त्याला विरोध आहे. त्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक भाजप व महायुतीची प्रचंड धनशक्ती आणि महाविकास आघाडीचा गरीब कार्यकर्ता अशीच होणार आहे. बघूया जनता धनिकांची लबाडांची, चोरांची का प्रामाणिक गरीब कार्यकर्त्यांची तळी उचलते. आता मतदारांचीही परीक्षा आहे. केंद्रात नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांच्या कुबड्या घेऊन तर महाराष्ट्रात शिवसेना-राष्ट्रवादी पक्ष फोडून भाजप सत्तेवर आला आहे. लोकांना ही दोन्ही सरकारे रूचलेली व आवडलेली नाहीत. त्यामुळे त्यांची अवस्था 'उजाडले, पण सूर्य कोठे आहे?' अशीच आहे !

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी विविध माध्यमांतून प्रसार माध्यमांशी साधलेला संवाद....

# महायुतीचे सरकार बदलल्याशिवाय जनता स्वस्थ बसणार नाही

## शरद पवार



आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार , काँग्रेस व शिवसेना हे तिन्ही पक्ष एकत्रित निवडणूक लढवणार आहेत, त्यामुळे या पक्षाची एकत्रित बैठक घेऊन जागावाटप झाल्यानंतर उमेदवारी देण्याचा निर्णय होईल. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला राज्यात ३० जागा मिळाल्या, त्यामुळे जनतेला महाराष्ट्रात बदल करून महायुतीचे सरकार बाजूला करायचे आहे, हे यावरून स्पष्ट होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील जागावाटपा बाबत पक्षातील वरिष्ठ नेते एकत्रित बसून निर्णय घेतील.

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. त्यामुळे नेहमी इच्छुक उमेदवारांसह त्यांचे समर्थक आपणास भेटत असतात. उमेदवारी देण्याबाबतचा निर्णय घेण्यापूर्वी राज्यातील संबंधित विधानसभा मतदारसंघातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास घेण्याचे काम सध्या सुरू आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेते हा अभ्यास करत आहेत. दरम्यान विधानसभेची निवडणूक आम्ही तिन्ही पक्ष एकत्र लढवणार आहोत. त्यामुळे या तिन्ही पक्षातील नेत्यांची एकत्रित बैठक होऊन जागावाटप फायनल होईल, यानंतर उमेदवारी देण्याची प्रक्रिया सुरू होईल. मागील लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात काँग्रेसचा एक खासदार निवडून आला होता. तर राष्ट्रवादीचे चार खासदार निवडून आले होते. मात्र या लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे तब्बल ३० उमेदवार निवडून आले. राज्यातील जनतेला बदल हवा आहे, हे यावरून स्पष्ट होते. राज्यातील महायुतीचे सरकार बाजूला करण्याच्या मनस्थितीमध्ये राज्यातील जनता आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला अनुकूल स्थिती आहे.

महाविकास आघाडी म्हणून राष्ट्रवादी, काँग्रेस व शिवसेना (उद्धव ठाकरे गट) असे तीन पक्ष एकत्रित निवडणूकांना सामोरे जात आहोत. कोणती जागा कोणता पक्ष लढवणार हे निश्चित करण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. आम्हा तीन घटक पक्षांना जागेबाबत एकवाक्यता करावी लागेल. ही प्रक्रिया झाली की तो-तो पक्ष तेथे कोणाला उमेदवारी द्यायची याचा विचार करेल. राष्ट्रवादीच्या वाट्याला ज्या जागा येतील तेथे राज्याचे अध्यक्ष जयंत पाटील व इतर वरिष्ठ नेत्यांची समिती मुलाखती घेतील व उमेदवार निश्चित करतील. पण सध्या आम्ही कुठेही गेलो तरी इच्छुक शिष्टमंडळ घेवून भेटत आहेत. लोकशाहीत ही चांगली प्रक्रिया आहे. एकाने निर्णय घेण्याऐवजी

सगळ्यांनी मिळून निर्णय घेण्याची आवश्यक आहे. आम्ही जिल्ह्याजिल्ह्यात जावून इच्छुकांचा अभ्यास चालू केला आहे. त्या आधारे उमेदवार निश्चिती होईल.

आरक्षण प्रश्नावरून राज्यात तणाव निर्माण होण्याचे काही कारण नाही. असे प्रश्न सामंजस्याने सोडवायचे असतात. जात, धर्म काहीही असले तरी आपण भारतीय आहोत, महाराष्ट्राचे घटक आहोत. त्यामुळे नेतृत्व करणारांनी या मागणीची पूर्तता कशी करता येईल, राज्यात चांगले वातावरण कसे राहिल, याची खबरदारी घेतली पाहिजे. केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक पुढील आठवड्यात राज्यात येत आहे. निवडणूक आयोगाच्या या दृष्टीकोनाचे स्वागत व्हायला हवे. आम्ही दिल्लीला जाण्याऐवजी ते राज्यात येत असतील तर ती राजकीय पक्षांना सूचना, भूमिका मांडण्यासाठी चांगली संधी आहे. त्यातून सुसंवाद साधायला सोपे जाईल.

अरविंद केजरीवाल उत्तम काम करत होते. त्यांची टीम चांगली होती. पण एका विशिष्ट स्थितीत केजरीवाल यांना तुरुंगात टाकले गेले. खोट्या केसेस केल्या गेल्या. त्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. पक्षांतर्गत बैठकीत आतिशी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. त्या कर्तृत्ववान, अभ्यासू व विचारवंत महिला आहेत. या आधी सुद्धा दिल्लीचे नेतृत्व काही महिलांनी केले आहे. दिल्लीचा दर्जा उंचावला. त्यात आतिशी या ही सातत्य ठेवतील. वन नेशन, वन इलेक्शन या विषयावर आम्ही इंडिया आघाडीचे नेते एकत्रित बैठक घेऊन निर्णय घेणार आहोत.

राज्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीसंबंधी राज्य शासनाने काही धोरणे आखली. पण शेतकऱ्यांपर्यंत काय पोहोचले हा महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्यापर्यंत काहीही न पोहोचल्याने शेतकरी अस्वस्थ आहेत. मुख्यमंत्र्यांना भेटून यात दुरुस्ती करण्याचा आग्रह आम्ही धरू.

विधानसभा निवडणुकीसाठी एक कार्यक्रम हाती घेऊन आम्ही लोकांसमोर जाणार आहोत. आम्ही विकासाचे मुद्दे लोकांसमोर मांडणार आणि त्या बदल्यात लोकांची मतं मागणार आहोत. हे करत असताना आम्ही आमच्यासारखे विचार असणाऱ्या इतर पक्षांना, संघटनांना आमच्याबरोबर घेणार आहोत. उदाहरणार्थ कम्युनिस्ट पार्टी (दोन्ही गट), शेतकरी कामगार पक्ष आणि इतर समविचारी पक्षांना बरोबर घेऊन आम्ही लोकांसमोर जाऊ. लोकांचा पाठिंबा मिळवू. महाराष्ट्रासमोर एक प्रगतिशील पर्याय उभा करण्याचा आमचा प्रयत्न असेल.

काही लोक मला विचारतात की तुमचा नेता कोण असणार? तुमचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असणार? मला त्यांना एवढंच सांगायचं आहे की आम्ही लोकांसमोर जाणार आहोत. आमच्या कार्यक्रमाला लोकांनी मान्यता दिली, शक्ती दिली, आम्ही निवडून आलो तर एकत्र बसून निर्णय घेऊ आणि एक सक्षम नेता राज्याला देऊ. मी तुम्हाला १९७७ सालचं उदाहरण देईन. आणीबाणीनंतर देशात निवडणुका झाल्या. जयप्रकाश नारायण यांच्या सूचनेने समविचारी पक्ष एकत्र आले आणि निवडणुकीला सामोरे गेले. लोकांनी देखील त्या पक्षांना शक्ती दिली, निवडून दिलं. निवडणूक जिंकल्यानंतर जनता पक्षाची स्थापना करण्यात आली आणि मोरारजी देसाई यांची पंतप्रधानपदी निवड करण्यात आली. आम्ही जेव्हा लोकांकडे मतं मागितली तेव्हा मोरारजी देसाई हे आमचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नव्हते. आम्ही कधीही लोकांना सांगितलं नव्हतं की अमुक नेता आमचा पंतप्रधानपदाचा चेहरा असेल. तरीदेखील लोकांनी आम्हाला शक्ती दिली आणि मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. त्यांनी देश चालवला. आमचा पूर्वीचा अनुभव आहे, तीच गोष्ट आम्ही महाराष्ट्रात देखील करणार आहोत.

आम्हाला लोकांना विश्वास द्यायचा आहे की आम्ही राज्याच्या हिताची जपणूक करणारा पर्याय तुम्हाला देणार आहोत. विकासाचा कार्यक्रम लोकांसमोर मांडणार आहोत. निवडणुकीत आम्हाला लोकांची शक्ती मिळाल्यास मंत्रिमंडळात कोण असेल? कोणाला कुठलं खातं द्यायचं? नेता, मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असेल ते नंतर ठरवता येईल. भविष्यात काका-पुतण्या एकत्र येतील का? असं विचारलं जातं. पण, आम्ही घरात सर्व एकत्रच आहोत.

बदलापूर येथे दोन चिमुरड्यांवर झालेल्या अन्यायाला न्याय मिळण्यासाठी कायद्याच्या योग्य चौकटीतून फाशी झालीच पाहीजे होती. परंतू या घटनेतील मुख्य आरोपीला स्थलांतरीत करताना गृह विभागाने दाखवलेला हलगर्जीपणा संशयास्पद आहे. भविष्यात अशा निंदनीय कृत्याची कल्पनाही कोणाच्या मनाला शिवणार नाही यासाठी कायद्याचा धाक घालण्यात शासन दुर्बल ठरलंय, असे भासते. या घटनेच्या सखोल चौकशीतून वस्तूस्थिती समोर येणं अपेक्षित आहे.

सत्ता ही लोकांसाठी वापरायची असते, तुमच्या भागात सत्तेचा दुरुपयोग केला जातो, त्यावर जो कोणी आवाज उठवतो, त्याचा आवाज दाबला जातो. राजकारण हे समाजकारणाला स्थान देणारं पाहिजे, येथील चित्र बदलतंय, लोकसभा निवडणुकीआधी सुद्धा ते दिसलं. देशाचे पंतप्रधान सांगत होते आम्ही ४०० पार निवडून येणार, पण त्यांचे किती खासदार आले? राष्ट्रवादी काँग्रेसने १० जागा लढवल्या, त्यापैकी ८ जागा आपण जिंकून आणल्या. आमच्या नावावर निवडून आले आणि मग भाजपसोबत सत्तेत जाऊन बसले, लोकांची फसवणूक या लोकांनी केली आणि सत्तेमध्ये सहभागी झाले. राज्यात सरकार बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, आता फक्त दोन महिने राहिले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रसार माध्यमांशी साधलेला संवाद...

# अदृश्य शक्तीच्या मनमानीवर नाही, तर संविधानावर देश चालतो

**सुप्रिया सुळे**

एका ताटात जेवल्यास त्या व्यक्तीचं ऋण आयुष्यभर विसरू नये. तो व्यक्ती सोबत असो वा नसो, कारण त्याने आपल्या सुख-दुःखात साथ दिलेली असते. सध्याचे राजकारण बघता ते बदलायला हवं. माझ्या आईला देखील सध्याचे राजकारण आवडत नाही. समाजात तेढ निर्माण होईल अशी भाषणे सध्या नेते करत आहेत. एक दिवस पोलिसांना घरी पाठवा मग बघतो.. हे कोण सांगणार?. हा देश संविधानावर चालतो. कुठल्या अदृश्य शक्तीच्या मनमानीवर चालत नाही. अशा धमक्या तुम्ही कोणाला देता?

बारामती लोकसभेदरम्यान प्रत्येक संस्था माझ्या विरोधात होती. एक माणूस माझ्यासोबत नव्हता. आम्हाला बूथ कमिटीदेखील चोरून बनवावी लागत होती. अनेक ठिकाणी बूथ कमिटीला माणूस मिळत नव्हता. अनेक दशकांचे ऋणानुबंध असलेल्या व्यक्तीच्या आम्ही घरी गेलो होतो. त्या व्यक्तीने आमचा तोंडावर दरवाजा बंद केला होता. मतांच्या माध्यमातून त्यांनी राग व्यक्त केला.

मुख्यमंत्रिपदाबाबत सांगायचं, तर प्रत्येक पक्षाला आणि कार्यकर्त्याला आपला नेता आपला पक्ष मोठा व्हावा, अशी अपेक्षा असते, त्यात गैर काहीही नाही.राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका शरद पवार यांनी दोन आठवड्यांपूर्वी मांडली होती. आम्ही कोणत्याही शर्यतीत नाही. हे त्यांनी स्पष्ट केलं होतं.

नितीन गडकरी यांनी पंतप्रधानपदाबाबत विरोधकांकडून प्रस्ताव आल्याचे म्हटल्याचे मी ऐकलं नाही. नितीन गडकरी यांच्यासारख्या नेत्याची देशाला गरज आहे. ते जर प्रधानमंत्री झाले तर आम्हाला आनंद होईलच. एक मराठी माणूस एवढ्या मोठ्या पदावर बसेल. नितीन गडकरी यांचे कर्तृत्व सुद्धा खूप मोठे आहे आणि ते गलिच्छ राजकारण करत नाहीत. सत्तेसाठी त्यांनी कधी आपली भूमिका बदलली नाही ही त्यांची खासियत आहे. त्यांचं खूप मोठं मन आहे. विकासात ते कधीच राजकारण करत नाहीत.

आपचे नेते अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदावरुन राजीनामा दिला, ही खूप दुर्दैवी गोष्ट आहे. कारण एजन्सीचा गैरवापर यामध्ये झाला आहे. आयकर विभाग, सीबीआय आणि ईडी याचा गैरवापर होतो हे सातत्याने आम्ही बोलतो. एकतर याची भीती दाखवायची नाहीतर वॉशिंग मशीनमध्ये टाकायचं. हा देश अदृश्य शक्तींच्या मनमानीने



चालत आहे. पण हा देश डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानेच चालणार आहे. अतिशय गलिच्छ राजकारण भाजप आणि त्यांचे मित्र पक्ष करत आहेत. केजरीवाल हे लादलेले नेते नाहीत किंवा कॉम्प्रोमाइज करणारे नाहीत.

आरक्षणाचे जे विधेयक सरकार आणेल, त्याला आम्ही पाठिंबा देऊ. आरक्षणासाठी घटनादुरुस्ती करावी लागेल, राज्यात बोलून काहीही होणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनी धनगर आरक्षणासंबंधी बारामतीत शब्द दिला होता, हेही लक्षात घेतलं पाहिजे.

महायुती सरकारने बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरण अतिशय चुकीच्या पद्धतीने हाताळले आहे. याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यात उशीर करण्यात आला. लोकांच्या प्रचंड दबावानंतर एफआयआर दाखल करण्यात आला खरा, पण आता आरोपीचा पोलीस एन्काउंटरमध्ये मृत्यू झाला. कायदा सुव्यवस्था आणि न्यायव्यवस्थेची ही शासन

कपड्याने झाकलेला होता, त्याचे हात बांधले होते; मग तो बंदुकीपर्यंत पोहचला कसा? पोलिसांना गोळी लागली कशी? एन्काउंटर झाला कसा? हेच मोठे प्रश्न मला पडले आहेत.

राज्यात आज पोलिसच सुरक्षित नाहीत का? असा प्रश्न यातून निर्माण होतो. एखाद्या पोलिसावर हल्ला होतो, तर यंत्रणा करते काय? असा सवाल त्यांनी केला. महिला अत्याचारासारखे अत्यंत घाणेरडे कृत्य करणाऱ्या प्रकरणात आरोपीविरोधात जलदगती न्यायालयात केस चालवून अशा नराधमांना भर चौकात सर्वांसमोर फाशी द्यायला पाहिजे, अशी मागणी सरकारकडे केली आहे. बदलापूर खटला फास्ट ट्रॅकद्वारे चालवून आरोपीला फाशी देण्याची 'कमिटमेंट' सरकारने केली होती. याप्रकरणी एफआयआरला किती आणि का वेळ लागला? याची सरकारला उत्तरे द्यावी लागतील. देवेंद्र फडणवीस गृहमंत्री होतात, तेव्हा क्राइम रेट वाढतो. ड्रग, हिट अँड रनच्या केस, महिलांवरील अत्याचार वाढले. सरकारवर





पुरस्कृत थट्टा आहे. बदलापूर प्रकरणातील 'त्या' नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी, ही माझी मागणी होती. मात्र, सोमवारी घडलेली घटना वेगळी आहे. आरोपीचे हात बांधलेले असताना, त्याच्या डोक्यावर कपडा घातलेला असताना तो गोळी चालवतोच कसा? पोलिसांवर झालेल्या हल्ल्याबाबत गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे. एवढ्या पोलिसांसमोर आरोपीची हिंमत होतेच कशी? सुदैवाने यामध्ये पोलिसांना गंभीर दुखापत झालेली नसली, तरी प्रकरण गंभीर आहे. त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे. गृहमंत्र्यांनी यासंबंधी उत्तर दिले पाहिजे.

हा देश संविधानाने चालतो. आपला देश कोणाच्या मर्जीने चालत नाही. संविधानामध्ये ही कृती बसत नाही. महाराष्ट्रात 'एन्काउंटर' शब्द ऐकलेला नाही. हा एन्काउंटर आहे का? याबाबत स्पष्टता करावी. त्याचा चेहरा काळ्या

मायबाप जनतेचा कसा विश्वास राहणार? बदलापूर घटनेतील आरोपीच्या मृत्यूनंतर काही ठिकाणी पेढे वाटप झाल्याचे ऐकले. त्याला जर फाशी दिली असती तर मुख्यमंत्र्यांना मी पहिला पेढा दिला असता.

मला सगळ्यात जास्त दु:ख एका गोष्टीचं झालं. देवेंद्रजी बंदूक दाखवत आहेत. हा बंदुकांचा देश नाही. हा शाहू, फुले, आंबेडकरांचा देश आहे, आणि राज्य आहे. त्यामुळे देवेंद्रजींनी तिथून आम्हाला बंदुका दाखवल्या तर आम्ही इथून देवेंद्रजींना संविधान दाखवू. गृहमंत्री देवेंद्र फडणवीसजी असे बंदूक घेतलेलं बॅनर लहान मुलं बघतील तेव्हा काय म्हणतील? गृहमंत्र्यांच्या हातात बंदूक असणं आणि त्याची पोस्टरबाजी करणं हे माझ्यासारख्या महिलेसाठी फार धक्कादायक आहे. जी लहान मुलं ते पोस्टर बघतील, त्यांच्यावर काय संस्कार

होतील. या राज्याचाच गृहमंत्री बंदूक घेऊन फिरतोय. मिर्झापूर टिव्ही सिरिज मध्येच या गोष्टी चालतात. बॉस हे वास्तव आहे. हा शाहू, फुले, आंबेडकरांचा देश आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नेतृत्व सुप्रिया सुळेंकडे जाणार असल्याने अजित पवारांनी बंड केल्याचं बोललं जातं. पण, या मुद्द्यावर मी अजित पवार किंवा त्यांच्या समर्थकांशी खुली चर्चा करायला तयार आहे. पक्षात पक्षाच्या उत्तराधिकारी पदावरून कोणताही वाद नव्हता. पण अजित पवारांनी जे केलं ते चुकीचं होतं.

अजित पवारांना नेतृत्व द्यायला आम्ही तयार होतो. मी कधीच नेतृत्व मागितलं नाही. ते त्यांनाच मिळणार होतं. त्यांनी मागितलं असतं तर देऊन टाकलं असतं. पक्ष घ्यायची गरज नव्हती, मागितलं असतं तर दिलंही असतं. यात कोणती मोठी डील आहे? आमचं आयुष्य विस्कळीत करून ते गेले. त्यांच्याकडे हा पक्ष ठेवण्याचा पर्याय होता.

माझं नागरिकशास्त्र चांगलं आहे. मी लोकसभेत निवडून गेले आहे. मी लिंगाआधारीत ट्रॅपमध्ये अडकणार नाही. मला मुख्यमंत्री बनायचं नाही. ही माझी पसंती आहे. हे सार्वजनिक आयुष्य आहे. हे एका पदावर अवलंबून नसून सार्वजनिक आयुष्य हा एक प्रवास आहे. राजकारणाबाबत गैरसमज पसरवला जातोय सध्या. पक्ष फोडणे, चिन्ह चोरणे म्हणजे राजकारण नाहीय. देश असा नाही चालत. देश संविधानाने चालतो. शरद पवार कधीच कोणालाच कोणताच सल्ला देत नाहीत. ते त्यांची शांतता एका शस्त्रासारखी वापरतात. मलाही त्यांची ही कला शिकायची आहे.

सत्ताधाऱ्यांकडं इलेक्शनमध्ये बोलण्यासारखे काहीही नाही. लोकसभेच्या अगोदर यांना बहिणी आठवल्या नाहीत. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर यांना बहिणी आठवल्या. विकासाच्या बाबतीत महाराष्ट्रात आणि देशात काय पद्धतीने विकास झाला आहे, हे सर्वजण पाहत आहोत. महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार तसेच एकाच योजनेचे युतीतील वेगवेगळे श्रेयवाद घेत आहेत. बॅनरबाजी आणि श्रेयवाद सातत्याने दिसून येत आहे.

आरक्षणावरून राज्यात सध्या जी तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याला सध्याचे ट्रिपल इंजिन खोके सरकार जबाबदार आहे. मराठा, धनगर, लिंगायत, मुस्लिम व भटक्या विमुक्त समाजाच्या अनेक वर्षांच्या मागण्या आहेत. सातत्याने गेली दहा वर्ष मोदी सरकार आणि गेली शंभर दिवस इंडियाचे सरकार सत्तेवर आहे. जेव्हा जेव्हा मला संधी मिळाली. तेव्हा तेव्हा म्हणाले आहे की, जे सरकार आरक्षणाचे बिल आणेल त्याला आमचा पाठिंबा असेल.




राष्ट्रवादी व शिवसेना पक्षासंबंधी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे. ज्यांनी पक्ष स्थापन केले, त्यांचे पक्ष आणि चिन्ह पळवले गेले आहे. आमचा न्याय देवतेवर पूर्ण

विश्वास असून योग्य निर्णय होईल. न्यायालयाने लवकरात लवकर निर्णय द्यावा. सत्य परेशान हो सकता है पराजित नही. ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर झालेला अन्याय जनतेने पाहिला आहे. पण न्यायदेवता योग्य निर्णय देईल.

मणिपूरप्रश्नी केंद्र सरकार फेल गेले आहे. पक्षभेद विसरून आपण तेथे जावू, तेथील महिला, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करू  अशी मागणी मी पंतप्रधानांकडे केली. दुदैवाने तेथील हिंसा थांबत नसून केंद्र त्याकडे गांभीर्याने पाहत नाही. आपल्या राज्यातही



हिट ॲण्ड रन, महिला अत्याचार वाढले आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यात ट्रिपल इंजिन खोके सरकार अपयशी ठरले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगडावरील समाधी टिळकांनी शोधली असं वक्तव्य सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं. यावरून भाजप व त्यांच्याशी संबंधित लोक इतिहास बदलू पाहत आहेत, हे स्पष्ट होतं. फडणवीस यांनी सुरतबद्दल असेच वक्तव्य केले होते. इतिहास अभ्यासक वस्तुस्थिती मांडत आहेत. छत्रपतींचा मान-सन्मान झालाच पाहिजे. परंतु भाजपकडून छत्रपतींचा चुकीचा इतिहास मांडला जात आहे. त्याला आम्ही कडाडून विरोध करू.

हक्काच्या निधीसाठी आंदोलन करावे लागत आहे आणि ही बाब अतिशय वेदना देणारी आहे. देश अदृश्य शक्तीच्या मनमानीनं नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानानं चालतो. विकासासाठी सत्तेत आहोत असं म्हणणारं सरकार आम्हाला निधी देत नाही. जनतेच्या हक्काचा निधी नाकारला जाण्याचं राजकारण दुर्दैवी आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रत्येकाला निधी देऊ शकतात. मग त्यांच्याच विचारांचे राज्यातील सरकार निधी का देत नाही? मतदारसंघात मिळालेलं मताधिक्य पाहून हे सरकार निधी देतंय. राज्यातील ट्रिपल इंजिन सरकार संविधानाच्या विरोधात काम करत आहे. सरकारची मनमानी हद्दपार करण्यासाठी आपला लढा आहे. लाडकी बहीण योजनेच्या जाहिरातीसाठी सरकार कोट्यवधी खर्च करतंय. पण, अनेक बहिणींना अजूनही पैसे मिळालेले नाहीत. सरकारी कार्यक्रमामध्ये विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना डावललं जातंय. पंतप्रधान नरेंद्र मोदी मेट्रोच्या उद्घाटनासाठी पुण्यात येत आहेत. पण, एकाच मेट्रोसाठी सहाव्यांदा कार्यक्रम होत आहे.

■■

# अजित पवारांचा सहानुभूती दाखविण्याचा प्रयत्न

**जयंत पाटील**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विविध ठिकाणी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना विरोधकांवर कठोर प्रहार केले. विरोधकांचा खरपूस समाचार घेताना त्यांनी मांडलेले मुद्दे....**

कुटुंबात फूट पडलेली जनतेला आवडत नाही, याचा अनुभव मी घेतलेला आहे. ती माझी चूक होती, असे अजितदादा बोलल्याचे मीही ऐकले आहे. सध्याचे अजित दादा हे अरोरा नावाच्या कन्सल्टंट सांगतील तसे बोलतात. किंबहुना, अरोराने त्यांना मूळ स्वभाव दाखवण्यास पूर्ण बंदी केली आहे. अजित पवार पहिले सारखे बोलत नाहीत. अरोरा नावाचा कन्स्लटन्ट सांगतो तसेच अजित पवार बोलतात. सल्लागार सांगतात तसे त्यांना बोलावं लागत आहे. अजित पवार हे आता सहानुभूती दाखवण्याचा, मागे झालेल्या चुका दुरुस्त करत आहे, असे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. अरोराने अजित दादांमध्ये परिवर्तन घडवले आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीत मुख्यमंत्री पदासाठी दावा केल्याच्या चर्चा आहे. पण, मला वाटत नाही की ते अशी मागणी करतील. त्यांची मागणी करावी अशी अवस्था आहे, असं ही मला वाटत नाही. निवडणुकीपूर्वी अशी मागणी ते करतील असे मला नाही. ही बाहेर कुणीतरी खोटी बातमी पसरवली असेल. भाजप सर्वात मोठा पक्ष आहे. अनेकांना तिथे मुख्यमंत्री व्हायचे आहे. त्यामुळे ते अजित पवारांना मुख्यमंत्री करतील असं वाटत नाही.

मनोज जरांगे व ओबीसी आंदोलनाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने महाराष्ट्रात असंतोष आहे. 'वंचित'चे नेते प्रकाश आंबेडकर यांनी, शरद पवार हे मनोज जरांगे-पाटील यांच्यासोबत असल्याच्या आरोप केला असला, तरी ते म्हणाले म्हणजे तसेच होत नाही. सध्या कोण कोणाच्या जवळ आहे, असे मुद्दे पुढे आणत गैरसमज पसरविणे चुकीचे आहे. जरांगे-पाटील हे त्यांच्या जिवावर आंदोलन करत आहेत.

बदलापूर प्रकरणातील आरोपीने स्वतःला गोळी मारून घेत आत्महत्या केली. मात्र यात शाळेची पुढील चौकशी थांबविण्यासाठी हे केलेले असावे, यात बाकीचे वाचतील म्हणून यालाच यमसदनी पाठवले असावे अशी शंका वाटते. आम्ही अक्षय शिंदेचे कुठेही समर्थन करत नाही. पण, गाडीत बसलेल्या व्यक्तीचे एन्काउन्टर करण्याची गरज होती का? घटनेच्या पहिल्या दिवसापासून आम्ही अक्षय शिंदेच्या फाशीची मागणी केली आहे. ज्या संस्थेत त्याने हे कृत्य केले, तेथील संस्थाचालक व पदाधिकारी यांनी प्रकरण दाबण्याचा प्रयत्न का केला? यातून त्यांना कोणाला प्रोटेक्ट करायचे होते? पालक पोलिसांकडे गेल्यानंतर गुन्हा नोंदवायला उशीर केला



यात कोणाचा दबाव होता? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने पाटील यांनी उपस्थित केले. एक स्टोरी म्हणजे त्याने पोलिसांची पिस्तूल काढली आणि स्वतःचा शेवट करून घेतला. काही वेळाने दुसरीच स्टोरी बाहेर आल्याचे सांगत याप्रकरणी त्यांनी संशय व्यक्त केला.

महाराष्ट्रातील भाजपची जबाबदारी असलेल्या फडणवीस व बावनकुळे यांच्यावर दिल्लीतील पक्षश्रेष्ठींचा विश्वास कमी झाला आहे. त्यामुळे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे प्रत्येक विभागनिहाय बैठक घेत कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहेत. लोकसभा निवडणुकीपाठोपाठ विधानसभा निवडणुकीतदेखील भारतीय जनता पक्षाची पिछेहाट होत आहे. त्यामुळेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा विभागनिहाय बैठका घेऊन विधानसभेतील पराभवाचा अंदाज घेत आहेत. आपण किती जागांवर पडणार आहोत याचा आढावा शहा यांच्याकडून घेतला जात असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासाठीदेखील हा संदेश आहे. महाराष्ट्रातील भाजपची जबाबदारी फडणवीस आणि बावनकुळे यांच्याकडे असली तरी दिल्लीतील श्रेष्ठींचा त्यांच्यावरचा विश्वास कमी झाला आहे. त्यामुळेच शहा विभागनिहाय विधानसभेतील पराभवाचा अंदाज घेत आहेत. भाजपच्या जवळ जे जातात त्यांना सगळं माफ असतं. मात्र, त्यांच्याविरोधात गेलात, की ते लोक तुमच्या विरोधात बोलायला लागतात.

मंत्रिमंडळ बैठकीत मंत्र्यांमध्येच खडाजंगी उडत आहे. सरकारची तिजोरी साफ झाल्यामुळे अर्थमंत्री अनेक प्रस्ताव नाकारत आहेत. त्यामुळेच मंत्रिमंडळाच्या बैठकीत टोकाची भांडणे होत असून, प्रत्येक आठवड्याला आता संवादाऐवजी भांडणेच होतील. आपल्या देशात संघराज्य पद्धत आहे आणि असे असताना या देशात 'वन नेशन वन इलेक्शन' करून अमेरिकेसारखी राष्ट्राध्यक्ष पद्धत आणण्याचा भाजपाचा डाव आहे. संविधान बदलण्याच्या प्रकारामुळं भाजपाला लोकसभेत मोठा फटका बसला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात निर्माण केलेली लोकशाही रचना मोडून काढायच्या दिशेने 'वन नेशन वन इलेक्शन'चं पाऊल आहे.

लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. आता २०२९ ला आशा प्रकारे 'वन नेशन वन इलेक्शन' घेऊन टाका. यातून आता नवीन गोंधळ तयार करण्याचं काम सुरू आहे. ज्या देशांमध्ये सात टप्प्यात लोकसभा निवडणुका घेतात, त्यांना अशा प्रकारे निवडणुका घेणं शक्य आहे का? देशातील काही राज्यांमध्ये निवडणुका होतात. त्यावेळेस केंद्रातील सरकारला जागरुक राहावं लागतं. या प्रकारच्या मोठ्या घोषणा करणं म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत तरतूद केलीय ती मोडून काढायचं काम आहे. 'वन नेशन वन इलेक्शन' नंतर देशात प्रेसिडेन्शिअल पद्धत आणण्याचा मार्ग आहे. १९७० आणि २०२४ मध्ये देशातली परिस्थिती बदललेली आहे. १९७० साली निवडणुका एकत्रित




झाल्या होत्या.

विधानसभा निवडणुकीत महायुतीतील भाजपाला ५० जागा कमी मिळू शकतात अशा प्रकारचा सर्व्हे समोर आला असल्याचं सांगितलं जात आहे. त्या रिपोर्टविषय मला माहीत नाही. मात्र, तुतारी राष्ट्रवादी काँग्रेसला ज्या प्रकारे प्रतिसाद मिळतोय ते पाहता त्या रिपोर्टमध्ये तथ्य आहे. महाविकास आघाडीच्या जागा वाटपासंदर्भात वेगवेगळ्या बातम्यामध्ये काहीही आलं तरी, विभागवार आम्ही चर्चा करत आहोत. जागा वाटपासंदर्भातील चर्चा अतिशय चांगल्या सुरू आहेत. महाविकास आघाडीत जागा वाटपासंदर्भात कोणतेही मतभेद नाहीत. नागपूरमधील प्रकल्प गुजरातमध्ये गेले, कारण की महाराष्ट्रातील नेतृत्वाची गुजरातमध्ये जाणाऱ्या प्रकल्पाला मागे आणायची ताकद नाही.

■■




## कोल्हापूर जिल्ह्यातील कागलमध्ये ४ सप्टेंबर रोजी झालेल्या ऐतिहासिक सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी आपल्या भाषणात विरोधकांचा घेतलेला समाचार

कागलच्या या गैबी चौकामध्ये अनेकदा जाहीर सभा मी घेतल्या, हजारो लोकांना संबोधित केलं. पण आजची ही गैबी चौकातील सभा जी बघतोय, माझी नजर जाईपर्यंत सगळीकडे माणसंच माणसं आहेत. चौकशी केली की शेवट कुठंय? तर एका अधिकाऱ्यानं सांगितलं, की एसटी स्टँडच्याही पुढं आहे. स्टेजच्या उजव्या हाताला त्यांचा चेहरा दिसत नाही पण इतर प्रचंड गर्दी आहे. याचा अर्थ हा आहे की जे काही परिवर्तन करण्याच्या संबंधीचा निर्णय समरजित घाटगे यांनी घेतला त्याच्या पाठीशी या तालुक्यातल्या सगळ्या वर्गाचे, सगळ्या वयांची सर्वसामान्य जनता पूर्ण ताकदीने उभी आहे आणि त्याची प्रचिती तुम्हा सगळ्यांच्या उपस्थितीने या ठिकाणी दिसतेय.

मी सांगितलं की मी इथं अनेकदा आलोय. आज आमच्या दोन जुन्या सहकाऱ्यांची आठवण मला स्वतःला होते. ते दोघेही माझ्या मंत्रिमंडळात होते, माझ्याबरोबर एक त्यातले लोकसभेत होते. एक महाराष्ट्राच्या विधानसभेत होते. त्यांचा उल्लेख या ठिकाणी करणं माझं कर्तव्य समजतो. सदाशिवराव मंडलिक आणि त्यांच्यानंतर बाबासाहेब कुपेकर.

मला आठवतंय की एक काळ असा होता, १९८० साली माझ्या पक्षाचे ५८ आमदार निवडून आले आणि ५८ पैकी जवळपास सगळे, पाच -सहा सोडले तर पक्ष सोडून गेले. कार्यकर्ते नव्हते, आमदार नव्हते पण जिद्द होती. आणि पुन्हा एकदा पक्षाची उभारणी करायचा निकाल आम्ही लोकांनी घेतला आणि त्याच्यामध्ये पहिल्यांदा आम्हा सगळ्यांच्या खांद्याला खांदा लावून लढण्यासाठी आणि पक्ष उभारण्यासाठी बाबासाहेब कुपेकर आणि सदाशिवराव मंडलिक आम्हा लोकांच्या बरोबर आले आणि पाच वर्षांमध्ये महाराष्ट्राचं राजकारण बदललं. सदाशिवराव लोकसभेत गेले. बाबासाहेब महाराष्ट्राच्या विधानसभेत आले. सहकार खात्याचे मंत्री झाले आणि हे सिद्ध केलं कागलकरांनी, गडहिंग्लजकरांनी, कोल्हापूर जिल्ह्याच्या जनतेने कि सत्तेसाठी कुणी गायब झालं असेल तर या कोल्हापूर जिल्ह्यातला, शाहू राजांचा विचारांचा, स्वाभिमानी माणूस पडेल ती किंमत देईल, पडेल ते कष्ट करेल पण लाचार कधी होणार नाही, हा इतिहास आमच्या दोन सहकारी मित्रांनी दाखवला. त्याची आठवण आज मला या ठिकाणी होतेय.



# लोकहित जपणारी नेतृत्वाची फळी निर्माण करणार

**शरद पवार**

आज या निवडणुकीकडे आम्ही एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघतोय. कारण माझी चिंता आहे महाराष्ट्राची आणि देशाची. चिंता अशासाठी आहे, की या देशामध्ये कष्ट करणारा, आणि काळ्या आईशी इमान राखणारा हा जो शेतकरी वर्ग आहे त्या शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी अधिकार असताना, जबाबदारी असताना आज दिल्ली किंवा महाराष्ट्राचे असो, राज्यकर्त्यांना यत्किंचितही आस्था नाही. दोन दिवसाच्या पूर्वी केंद्र सरकारने निकाल घेतला, विदेशातून गहू आणायचा. काय चाललंय हे? जो देश जगातल्या १८ देशांना गहू देत होता. अन्नधान्य देत होता. राज्य बदललं, मोदी साहेबांचं राज्य आलं. शेती आणि शेतकऱ्यांच्यासंबंधी यत्किंचितही आस्था नाही आणि त्याचा परिणाम आज या देशाचा शेतकरी हळूहळू संकटात जायला लागलाय. आम्हाला परदेशातून धान्य आणून जगायची वेळ या ठिकाणी येते ही स्थिती निर्माण झालीये. त्याचं कारण राज्यकर्त्यांची धोरणं. जगामध्ये दहा वर्षाच्या पूर्वी दोन नंबरचं साखरेचे उत्पन्न भारतामध्ये होतं आणि एक नंबरच उत्पन्न उत्तर प्रदेशच्यानंतर महाराष्ट्रामध्ये होतं. त्या महाराष्ट्रामध्ये एक नंबरचं साखरेचं उत्पादन हा कोल्हापूर जिल्हा करत होता. त्याच्यामध्ये उत्तम कारखानदारी होती.

अनेक वेळा मी बघितलं, की या देशामध्ये सगळ्यात उत्तम कारखाना कोण चालवतं आणि त्या कारखान्याचे नाव काय? तर तो कारखाना घाटगेंच्या नेतृत्वाखाली या ठिकाणी चालणारा हा तुमच्या तालुक्याचा कारखाना होता. अनेक वेळेला आम्ही लोकांनी चांगले कारखाने चालवायला बक्षीसं दिली. माझ्या हातून अनेकदा बक्षीसे दिली. एक दिवशी सांगितलं मी संबंधितांना, की बक्षिस घ्यायचा मक्ता काय फक्त तुमचाच आहे? कारखाना चांगला चालवता खरं आहे. त्यामुळे आम्हाला तुम्हाला बक्षिस द्यावं लागतं, पण आता बक्षिस ठेवायला तुमच्याकडे जागा आहे का? इतकी बक्षिसं तुम्ही मिळवली त्याचं कारण तो कारखाना उत्तमरीतीने चालवला. आज पुन्हा एकदा या देशांमध्ये साखरेची परिस्थिती गंभीर व्हायला लागली आणि कदाचित हे सरकार काही वेगळा निकाल घ्यायची शक्यता आहे.

इथं तुम्ही ऊस पिकवला, साखर तयार केली. आम्हालाही साखर जगात पाठवायची होती. त्या निर्यातीला

आजच्या सरकारने बंदी आणली. साखरेबरोबर इथेनॉल तयार करायला लागले. तुम्ही लोक या ठिकाणी इथेनॉल करता. दोन पैसे अधिक मिळतात या मोदी सरकारनी त्याचा निर्यातीवर बंदी घातली आणि तुमची हे कमी कशी होईल याची पावलं त्या ठिकाणी टाकली. या राज्यामध्ये आणि देशामध्ये तरुणांची संख्या जास्त आहे, कष्ट करायची त्यांची तयारी आहे. कष्ट करण्याचा त्यांचा अधिकार आहे पण दिसतंय काय? या ठिकाणी तरुणांना मदत करणं सोडा पण कष्ट करायचा जो अधिकार आहे तो उद्ध्वस्त करण्याची पावलं आजचं मोदी सरकार टाकतंय.


तुम्ही कदाचित ऐकलं असेल, की दहा दिवसांपूर्वी पुण्याला हजारो तरुण उपोषणाला बसले, संघर्षाला बसले. त्यांचं एवढंच मागणं होतं, की आम्ही शिकलोय आमची काम करण्याची तयारी आहे, काम करण्याचे अधिकार आम्हाला द्या. पण तो अधिकार द्यायला आजचे राज्यकर्ते तयार नाहीत. एवढंच नव्हे तर परदेशातून काही वस्तू आयात करायच्या आणि लोकांना व तरुणांना जो काम करण्याचा अधिकार आहे त्याच्यातून जी संपत्ती तयार होणार आहे तिच्यावर मर्यादा कशी आणायची याबद्दलची पावलं आजचे राज्यकर्ते टाकायला लागले आहेत. कॉन्ट्रॅक्ट नावाची एक पद्धत काढून कष्ट करणाऱ्या तरुणांच्या कष्टाचा अधिकार हे सरकार घालवायला लागलं आहे.

आपल्या देशामध्ये महिलांची प्रतिष्ठा ठेवली जाते. तुम्ही वृत्तपत्रात फक्त वाचा, कमीत कमी दोन ते चार उदाहरणं आणि बातम्या महिलांवरील अत्याचाराच्या असतात. आपण बघितलं की ठाणे जिल्ह्यामध्ये बदलापूरला दोन चिमुरड्या मुलींवर अत्याचार झाले. अत्याचार करणारे काही बदमाश तरुण मंडळी त्यांच्याबद्दल लोकांमध्ये संताप निर्माण झाला, हजारो लोक रस्त्यावर आले, रेल्वे लाईन बंद पाडली. केंद्र सरकार या अत्याचार करणाऱ्या लोकांबद्दल कठोर पाऊल टाकण्याची आवश्यकता असताना जे लोक संताप व्यक्त करण्यासाठी आले त्यांच्यावर खटले भरण्याच्या संबंधीचे काम आजच्या शिंदे सरकारने त्या ठिकाणी केलं. आपल्या भगिनींवर अत्याचार होतो, त्यांचा सन्मान नीट ठेवला जात नाही. त्यासाठी एखादे कुटुंब, एखादा वर्ग एकत्र झाला तर त्यांनी काही गुन्हा केलेला नाही. आई-बहिणींची अब्रू सांभाळण्यासाठी तो संतप्त जमाव रस्त्यावर आला. त्या लोकांना मदत करण्याऐवजी हजारो लोकांवर खटला भरणे आणि त्यांना तुरुंगात टाकण्यासंबंधीचे पाऊल आज त्या ठिकाणी टाकली गेली. आज हे सरकार खऱ्या अर्थाने कष्टकऱ्यांच्या आणि स्वाभिमानी माणसाच्या हिताची जपणूक न करण्याबद्दलचे सरकार आहे.



मालवणला काय झालं? शिवछत्रपतींचा पुतळा त्या ठिकाणी उभा केला होता. सागरी क्षेत्राचे महत्त्व या देशामध्ये पहिल्यांदा कुणाला कळले असेल तर ते शिवाजी महाराजांना कळले. सागरी क्षेत्राचे रक्षण करणे या देशाच्या हितासाठी त्याची गरज आहे ही भूमिका पहिल्यांदा शिवछत्रपतींनी मांडली. सागरी क्षेत्रामध्ये आपलं क्षेत्र कसे उभे करायचे याबद्दलचे काम शिवछत्रपतींनी केले. त्यापद्धतीने मालवण जवळ सिंधुदुर्गाचा किल्ला उभा राहिला. असे अनेक किल्ले शिवाजी महाराजांनी उभे केले. त्यातल्याच किल्ल्यावर छत्रपतींचा पुतळा उभा केला. आपल्याला धक्का बसला की तो उद्ध्वस्त झाला. मुख्यमंत्र्यांनी काय सांगितलं की वाऱ्याचा वेग जास्त होता म्हणून पुतळा पडला. तुम्ही मुंबईला गेलात इंडिया गेट जवळचा भाग आहे तिथे साठ वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हा यशवंतराव चव्हाण यांनी उभा केला. समुद्र जवळ आहे. अखंड वारा असतो. कधीही त्या पुतळ्याला धक्का बसला नाही. इथे पुतळा बसवून एक वर्ष सुद्धा झाला नाही. सहा महिन्यांपूर्वी तो पुतळा बसवला.





देशाचे प्रधानमंत्री आले, त्यांनी त्याचे उद्‌घाटन केले आणि आज तो पुतळा उद्‌ध्वस्त झालेले चित्र  आपल्या सगळ्यांना बघायला मिळतं. त्याचं स्वच्छ कारण मला असे दिसते, की त्या पुतळ्याच्या निर्मितीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. आजचे राज्यकर्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात सुद्धा भ्रष्टाचार करण्यासाठी निर्लज्जपणाची भूमिका घेतात. अशांच्या हातामध्ये महाराष्ट्र द्यायचा नाही हा निकाल तुम्हाला आणि मला घ्यावा लागेल. तो निकाल घ्यायचा असेल तर स्वच्छ आणि चारित्र्यसंपन्न व लोकांच्या हिताची जपणूक करणारी नेतृत्वाची फळी महाराष्ट्रामध्ये निर्माण करणे हा कार्यक्रम आम्ही हातामध्ये घेतलेला आहे.

या कार्यक्रमाच्या पूर्ततेसाठी मला अतिशय आनंद आहे, की समरजित यांनी निर्णय घेतला आणि राष्ट्रवादीमध्ये तुम्हा सर्वांच्या उपस्थितीमध्ये यायचा निकाल घेऊन आज त्याच्यामध्ये ते सहभागी झालेले आहेत. पक्षाच्या अध्यक्ष म्हणून त्यांचे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अंत:करणापासून मी स्वागत करतो. तुम्हा सर्वांना शब्द देतो, तुम्हा सर्वांच्या पाठिंब्यावर त्यांना महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मोठ्या मतांनी तुम्ही पाठवा. मी तुम्हाला सांगतो, महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये ते गेल्यानंतर ते नुसते आमदार राहणार नाहीत. त्यांना हवं ते काम करण्याची संधीही देणार आहे, हा विचार माझ्या मनामध्ये बऱ्याच दिवसांपासून आहे. दुर्दैव असं आहे, की या तालुक्यातून एका व्यक्तीला आम्ही लोकांनी प्रोत्साहित केलं. तुम्ही लोकांनी शब्दाची किंमत दिली व त्यांना सत्ता दिली, सगळं काही दिलं पण प्रसंग येतो, संकट येतात त्यावेळेला संकटाला साथ द्यायची ही जबाबदारी असताना साथ सोडून भलत्याच्या मागे आमचे काही जुने सहकारी गेले. त्यांना त्यांची जागा दाखवण्याचं काम पुढल्या काळामध्ये आपण केल्याशिवाय राहणार नाही. सात-आठ महिन्यांपूर्वी केंद्र सरकारमधल्या ईडी आणि बाकीच्या काही लोकांनी त्यांच्या चौकशा सुरू केल्या. त्यानंतर अस्वस्थ झालेले कुटुंब आणि कुटुंबातील भगिनींनी सुद्धा जाहीरपणाने मागणी केली की आम्हा लोकांना त्रास देण्याऐवजी आम्हाला गोळ्या घाला. ही भूमिका घेणारे लोक अशा यातना कुटुंबांना देणारे जे घटक आहेत त्यांच्या दरवाजामध्ये लाचारी सारखे जाऊन बसले. हा कागलचा इतिहास नाही. कागल बाकी काही सहन करेल पण उभ्या आयुष्यामध्ये लाचारी कधी स्वीकारणार नाही. त्या लाचारीचा स्वीकार ज्यांनी केला त्यांना धडा शिकवण्याचे काम तुम्ही याठिकाणी कराल याची मला खात्री आहे. ते करण्यासाठी आजचा हा प्रवेश अत्यंत महत्त्वाचा आहे हा उद्याचा नवीन इतिहास घडवणार आहे. हा फक्त कागलचा इतिहास नाही तर हा इतिहास कोल्हापूर व महाराष्ट्राचा आहे. महाराष्ट्राच्या इतिहासासाठी व उभारणी करण्यासाठी कागलकर या ठिकाणी हजारोंच्या संख्येने येत आहेत. त्याने आमच्या लोकांचा आत्मविश्वास वाढला. मी तुम्हाला खात्री देतो की राज्य बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. तुमची सामुदायिक शक्ती मनावर घेऊन जे परिवर्तन महाराष्ट्रात करायचे आहे. प्रगत आणि यशस्वी हा महाराष्ट्र करायचा आहे. ते करण्यासाठी तुम्ही मी आणि सगळे सहकारी प्रयत्नांची पराकाष्ठा करू.

# भाजपचे डावपेच जुने होऊ लागले

**व्यंकटेश केसरी**

अयोध्येत राम मंदिराची उभारणी आणि संविधानातील ३७० कलम हटवूनही नरेंद्र मोदी यांना लोकसभेत बहुमत मिळाले नाही तर "एक देश ,एक निवडणूक ' हा भाजपसाठी सत्तेत राहण्याचा हुकुमी एक्का कसा असू शकतो या बद्दल आता कोणी फारसे गांभीर्याने बोलत नाही. कारण ही भन्नाट कल्पना प्रत्यक्षात यायची असल्यास त्याला राजकीय पक्षांची सम्मती पाहिजे आणि त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे लोकांचा दबाव हवा. पण तो दोन्ही दिसत नाही. याबाबत मोदी सरकारने येत्या हिवाळी अधिवेशनात विधेयक आणले तर चित्र स्पष्ट होईल पण जम्मू –काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणूक प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या पक्षाने हा मुद्दा उचलून धरला नाही तर आगामी महाराष्ट्र , झारखंड विधानसभा निवडणूक प्रचारात या प्रश्नावर लोकांचा कौल मागण्याची हिम्मत त्यांच्यात नाही. कारण पक्षांतर, आमदारांची फोडाफोडी, सरकारी यंत्रणेचा गैरवापर व आमिषे दाखवून मागच्या दाराने भाजप महाराष्ट्रात



















सत्तेत आला. आणि हाच प्रयोग झारखंड मध्ये करण्याचा प्रयत्न भाजपच्या अंगलट आला. दिल्ली महानगरपालिकेत सत्ता नाही म्हणून आम आदमी पार्टीच्या नगरसेवकांना फोडण्याचे उघड प्रयत्न भाजप करताना दिसतो.चंदीगड महापौराच्या निवडणुकीत,हिमाचल प्रदेश राज्यसभा निवडणुकीत अशा खेळ्या खेळणाऱ्या भाजपला 'एक देश, एक निवडणूक' पचणार नाही आणि परवडणारही नाही. कारण निवडणुकीत लोकांचा कौल या पक्षाच्या विरोधात गेला तर पाच वर्षे विरोधी बाकावर बसण्याची तयारी नरेंद्र मोदी-अमित शहा यांच्या पक्षाची नाही. त्यांच्या कारकिर्दीत दुसऱ्या पक्षातील किती खासदार, किती आमदार फोडण्यात आले, 'ऑपरेशन कमल' द्वारे किती राज्यात सत्तांतरे झाली यावर खरे तर श्वेतपत्रिका काढण्यात आली पाहिजे.

भाजपची भूक 'एक देश, एक निवडणूक' पुरती मर्यादित नाही. त्याची वैचारिक आणि मानसिक जडण घडण 'एक देश, एक भाषा', 'एक देश,एक नेता', 'एक देश, एक पक्ष' अशी आहे. भाजपला यावेळी लोकसभेत पाशवी बहुमत मिळाले असते, 'चारशेपार' जागा आल्या असत्या तर नरेंद्र मोदी यांनी मंत्री, खासदार, आमदारांसाठी गणवेश घालण्याचा आदेश जारी केला असता. कारण या पक्षाला एक ताल, एक स्वर, एक रंग, एक नेता याचे भारी आकर्षण आहे. 'एक देश, एक निवडणूक' यावर भाजप किती आग्रही आहे या पेक्षा महत्वाचे म्हणजे या पक्षाला,त्याच्या मातृ संघटनेला देशाच्या संविधाना बद्दल असलेल्या मूलभूत शंका आणि भीती . त्यामुळे मिळेल तेंव्हा आणि मिळेल त्यावेळी कोणत्या ना कोणत्या बहाण्याने संविधानाच्या बेसिक स्ट्क्चरशी कशी छेडछाड करता येईल याची चाचपडनी हा पक्ष करताना दिसतो. तसे प्रयत्न अटल बिहारी वाजपेयी सरकारच्या काळात ही झाले होते. नोटबंदी,लॉक डाऊन सारखे अघोरी प्रयोग करण्याचे झटके मोदी सरकारने यापूर्वी लोकांना दिले आहेत पण यावेळी तसे करण्याची शक्ती मोदी सरकारमध्ये नाही.

बेरोजगारी, महागाई, आरोग्य, शिक्षण, महिला सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन यावर आपले लक्ष केंद्रित न करता , वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यातील आव्हाने सोडवण्यासाठी योजना आखण्याऐवजी लोकांचे लक्ष्य दुसरीकडे वळवायचे हे भाजपचे स्ट्रॅटेजी आता जुनी झाल्याने चालत नाही.त्यामुळे निवडणूक प्रचारात 'डबल इंजिन'सरकारचे नाणेही चालत नाही.

तिसऱ्यांदा पंतप्रधान होऊन शंभराहून अधिक दिवस झाले,

# भाजपच्या नव्या अध्यक्ष निवडीचे लांबत चाललेले 'गूढ'

भाजपच्या नव्या अध्यक्षाच्या निवडीच्या लांबणीचे रहस्य आता अधिक गूढ होऊ लागले आहे. या पक्षात अध्यक्षपदाची रीतसर निवडणूक होत नाही आणि निवडही लांबविली जात नाही. तसा या पक्षाचा इतिहासही आहे पण अमृतकाळात सारेच विपरीत होत चालले आहे. खरे पाहता, सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याचा 'विक्रम' करण्याऱ्या नरेंद्र मोदी यांना भाजपचा नवा अध्यक्ष का निवडता येत नाही ? ते सर्वशक्तिमान आहेत, त्यांचा शब्द अखेरचा मानला जातो पण तरिही ते बोलत नाहीत हे च विचित्र आहे. सध्याचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ कधीच संपला आहे. त्यांना केंद्रात मंत्री केले आहे. त्यांना राज्यसभेचा नेता ही करण्यात आले आहे. ते अध्यक्ष असताना त्यांच्या गृह राज्यात म्हणजे हिमाचल प्रदेशात भाजप विधानसभा निवडणुकीत हारली. त्यांची ओळख मोदी यांचे 'होय बा' अशीच राहिली आहे. सारे काही आलबेल असताना , पक्ष सत्तेत असताना भाजपला नवा अध्यक्ष निवडण्यात अडसर कोणाचा ? हे झारीतील शुक्राचार्य कोण ? विश्वगुरू, चाणक्य त्यांच्या समोर का नमतात ? भाजपचा नवा अध्यक्ष नरेंद्र मोदी यांच्या ताटाखालचे मांजर नसावा म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रयत्नशील आहे काय ? असे तर्कवितर्क चालू असतानाच सोशल मीडियात मोदींचे कट्टर विरोधक संजय जोशी यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे. संजय जोशी नागपूरचे , कट्टर स्वयंससेवक. त्यांची नरेंद्र मोदी यांना का धास्ती वाटते ? हे एक गूढच आहे. ते भाजपचे राष्ट्रीय पदाधिकारी होते पण मोदींच्या उदयानंतर त्यांचे पक्षात औषधालाही अस्तित्व शिल्लक ठेवण्यात आले नाही. संजय जोशी यांच्या नावाची चर्चा होणे याचा अर्थच मोदींच्या विरोधकामागे कोणीतरी आहे आणि ती अदृश्य शक्ती आव्हान देत आहे. आता संजय जोशी यांच्या बरोबरच राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे. त्या ही मोदींच्या 'गुड बुक्स' मध्ये नाहीत. त्याला काउंटर म्हणून मोदी संघाच्याच राम माधव किंवा अमित शहा त्यांचे विश्वासू केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना भाजपच्या अध्यक्षपदी बसवतील असे अंदाज व्यक्त होत आहेत. यात सर्वात महत्वाचे म्हणजे भाजपचा नवा अध्यक्ष मोदी भक्त असेल, मोदी विरोधक असेल की तटस्थ असेल ? यावरच पक्षांतर्गत राजकारण पुढच्या काळात रंगणार आहे. लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर नेता निवडी साठी भाजपच्या संसदीय पक्षाची बैठक बोलावण्यात आली नव्हती. त्याला फाटा देण्यात आला . का देण्यात आला , कोण मोदी यांना आव्हान देणार होते ? पण एन.डी.ए. च्या बैठकीत , संसदीय बैठकीत मोदी यांची नेता म्हणून निवड करण्यात आली . म्हणजे खरे डावपेच त्यावेळेपासून सुरु आहेत. आपल्याला आव्हान दिले जात आहे याची जाणीव दस्तुखुद्द मोदी यांना ४ जून ला च झाली होती. पाकिस्तानला पाताळात जाऊन धडा शिकवण्याची भाषा करणारे मोदी आता अतिसावधपणे पक्षांतर्गत खेळी खेळू लागले आहेत.



# मोदींची जादू संपली, शहांची ‘चाणक्यनीति’ इतिहासजमा

**जम्मू –काश्मीर, हरियाणातील विधानसभा निवडणुकीचा ‘निकाल’ आधीच कळल्याने भाजपची महाराष्ट्र वाचविण्याची धडपड सुरु झाली आहे. महाविकास आघाडीच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांना फोडा असा कानमंत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजप नेत्यांना दिल्याच्या बातम्या आहेत . त्या खऱ्या असतील तर निवडणुकीपूर्वीच भाजपने आपली हार मानली आहे ,असा याचा अर्थ निघतो. म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जादू संपली, अमित शहांची चाणक्यनीती इतिहासजमा झाली,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे असून नसल्यासारखे आहेत हे कबुल केल्यासारखे आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीकडे देशाचे लक्ष आहे. यात भाजप नेस्तनाबूत झाला तर ती मोदी युगाच्या अस्ताची सुरुवात समजली जाईल. पुढे येऊ घातलेल्या दिल्ली, बिहार,उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकात जे व्हायचे ते होईल पण केंद्र सरकारच्या कारभारावर , धोरणावर , नियोजनावर याचा काय परिणाम होईल ? भाजपच्या एन.डी.ए. तील घटक पक्षांत त्यांचे भविष्य कसे सुरक्षित राहील याबद्दल चिंतन सुरु होईल आणि त्यातून नवी समिकरणे साकारतील. नरेंद्र मोदी यांचा भाजप निवडणुकीतील विजयासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर फार अवलंबून नाही कारण संघ , त्याचे स्वयंसेवक, सहानुभूतीदार यांच्याकडे भाजपला मतदान करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही तेंव्हा विरोधकांना फोडा,झोडा आणि सत्तेत या , त्यासाठी कोणत्याही स्तराला जा असा अलिखित संदेश देण्यात आला आहे . पण संघ सहानुभूतीदार मतदानासाठी घराबाहेर नाही पडले तर ..... लोकसभा निवडणुकीत असे झाले होते. मोदी आणि शहा यांनी भाजपचा विस्तार करण्यापेक्षा, त्यात टॅलेंट आणण्यापेक्षा , तो सर्वसमावेशक करण्यापेक्षा बाहेरच्यांची खोगीर भरती करण्यावर जोर दिला, त्यांना सत्ता दिली, प्रतिष्ठा दिली म्हणून महाराष्ट्रातला भाजप कार्यकर्ता तसाही नाराज असल्याच्या चर्चा दिल्लीतील खाजगी बैठकीत ऐकायला मिळतात.**



विदेशी दौरेही झाले पण नरेंद्र मोदी यांची कळी खुलत नाही. त्यांचे सरकार काळजीवाहू वाटते. आपल्याकडे बहुमत आहे, सरकार स्थिर आहे, पक्षात आणि सरकारमध्ये आपणास आव्हान नाही, आपण पाहिल्यासारखेच शहेनशहा आहोत हे दाखविण्याचा कितीही प्रयत्न नरेंद्र मोदी आणि त्यांचे पक्ष आणि सरकारमधील निष्ठावंत करत असले तरी कोणत्यातरी गूढ छायेत सरकार आणि भाजप आहे. राजकीय निरीक्षकांच्या अंदाजानुसार आणखी एक अपघात होणार. तो कधी, कसा, कुठून होणार हे सांगणे कठीण आहे पण त्यातून मोदी सरकार वाचले तर पुढची वाटचाल थोडी सोपी जाईल. पण भाजपचा पेटारा रिकामा आहे. "हिंदुत्वाचा अजेन्डा " (अयोध्या, ३७० कलम) राबवूनही त्याचा फायदा होत नसेल तर सामान नागरी कायदा, एक देश, एक निवडणुकीने असा किती लाभ नरेंद्र मोदी यांना मिळणार आहे ?

भारत हे संघ राज्य आहे . शासन –प्रशासनात हिंदीचा वाढता वापर होत असल्याने दक्षिणेतली राज्ये तशीही मोदी सरकारवर नाराज असतातच.. याशिवाय भाजपला हिंदी भाषी राज्यातून ताकत मिळते. तेथे काँग्रेस कमजोर झाल्याचा फायदा भाजपने उठवला पण त्याचे नाणे दक्षिणेत चालत नाही.त्याचे हिंदुत्वही उठत नाही. भाजपसाठी नरेंद्र मोदी हे ‘विश्वगुरू’ असतील पण त्यांच्या नेतृत्वाला अखिल भारतीय पातळीवर

# वरदहस्त काढला तर 'अमित शहा' किती ताकदवान?

नरेंद्र मोदी यांना संकट मोचकाची (ट्रबल शुटर ) गरज नाही. त्यामुळे लोकसभेपासून ते नगरपरिषदांच्या निवडणूका भाजप त्यांच्याच नावावर लढतो. शासन –प्रशासन तेच चालवतात. सरकारमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा नंबर २ चे नेते मानले जातात आणि मोदी नंतर तेच पंतप्रधान होणार अशी कुजबुज सत्तेच्या वर्तुळात चालते .पण शहा यांना आव्हान मिळाले तर 'सर्वसंमत' नेता कोण ? केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांची मोदींचा संकट मोचक होण्याची धडपड चालू आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा हे काँग्रेस मधून भाजपत डेरेदाखल झालेले आपण सर्वाधिक जहाल हिंदुत्ववादी आहोत म्हणून भाजप , संघ परिवाराला पुढच्या मोठ्या भूमिकेसाठी मान्य होऊ शकतो या साठी प्रयत्न करताना दिसतात. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ वगळता भाजपच्या कोणत्याही मुख्यमंत्र्याला स्वतःच्या राज्या बाहेर चेहरा नाही,अपील नाही, भूमिका नाही. मोदींना कोणालाही मर्यादेच्या बाहेर ताकत द्यायची नाही कारण ती दिल्यास ते प्रतिस्पर्धी बनतात, आव्हान देतात. मोदींनी त्यांचा वरदहस्त काढून घेतला तर अमित शहा किती ताकतवान? याचा अदमास घेणे भाजप अंतर्गत चालू आहे. मोदी यांनी महाराष्ट्रात ज्या दोन केंद्रीय मंत्र्यांना निरीक्षक म्हणून पाठविले आहे त्यांनी एकदाही लोकसभेची निवडणूक जिंकली नाही . मोदी राज्यात 'अशाच' लोकांना पदे मिळतात, मोठे केले जातात हे भाजप नेत्यांना कळले आहे पण पचत नाही.




मान्यता मिळत नाही. विरोधी पक्षांच्या सरकारांशी आकसाने वागण्याची त्यांची व भाजपची रीत असल्याने त्यांच्याबद्दल कटुता वाढते आहे. राजकारण हे सत्तेसाठी असते आणि सत्तेतून विकास होतो हे खरे असेल तर त्यांच्या मंत्रिमंडळात जाण्यासाठी एन.डी. ए. मध्ये लॉबिंग का होत नाही ? घटक पक्षांचा इंटरेस्ट मोठी खाती घेण्यात नाही तर आपापल्या राज्यात आहे (आंध्र प्रदेश, बिहार ) . जम्मू –काश्मीर, हरियाणा , पंजाब, तामिळनाडू, केरळ या राज्यात भाजपला मित्र पक्ष नाहीत तर महाराष्ट्र, कर्नाटकातले सध्याचे 'मित्र' बेभरवशाचे आहेत.

जम्मू–काश्मीर,हरियाणा विधानसभा निवडणूक प्रचारात तशी रंगत आली नाही.कारण या निवडणुकीतील खरे खेळाडू स्थानिक आहेत. घटनेतील ३७० कलम हटविल्याने भाजप काश्मीर खोऱ्यात तसाही आरोपीचा पिंजऱ्यात आहे. जम्मू मध्ये पक्षांतर्गत लाथाळ्या आणि चुकीचे उमेदवार लादल्याने भाजप हाय कमांडलाच आव्हान मिळाले.तिथे त्रिशंकू विधानसभा आली किंवा आघाडीचे सरकार आले तरी नव्या सरकारला अनेकप्रश्नी केंदावर अवलंबून राहावे लागते. आणि हरियाणात भाजपकडे राज्यव्यापी नेतृत्व नाही. नवे नेतृत्व निर्माण करण्याच्या प्रयत्न गेल्या दहा वर्षात झाला नाही. ती च जातीय समीकरणे,त्याच निवडणुकीनंतर होणाऱ्या आघाडया या पुढे राजकारण सरकत नाही. त्यामुळेच निवडणूक प्रचाराच्या मध्यात भाजप श्रेष्ठींनी महाराष्ट्रात लक्ष घातले.

नरेंद्र मोदी, अमित शहा आणि भाजपची भाषा आता जुनी होत चालली आहे. जुने आरोप नव्याने उगळल्याने निवडणुकीत लोकांना उत्साह येत नाही, तरुण निरुत्साही बनतात तर फ्लोटिंग मतदार मतदान करण्यासाठी उदासीन राहतात. हे लोकसभा निवडणुकीतील मतदानात दिसून आले. ही राजकीय पक्षांसाठी धोक्याची घंटा आहे.

भाजप अध्यक्षाच्या निवडीचे गूढ रहस्यमय बनू लागले.

■■

# Nanded City, Pune
*The Maximum City*

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

## प्रत्येक घराला एक मन असतं.
## प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

### आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

### CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

### जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by MAGARPATTA CITY
*The pride of Pune*

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

# सामूहिक शक्तीच्या जोरावर सरकारला त्यांची जागा दाखवू

**शरद पवार**



मी आज दुपारी मुंबईमध्ये एका सभेच्या निमित्ताने होतो. धो-धो पाऊस होता. मला चिंता होती की इथं सभा होणार की नाही? पण कालच देशाचे प्रधानमंत्री पुण्याला यायचे होते. पण पाऊस आला म्हणून त्यांनी पुण्याचा दौरा रद्द केला. मी बापूसाहेब पठारे यांना कॉन्टॅक्ट केला. म्हणलं अहो सभा होणार आहे की नाही? त्यांनी सांगितलं, प्रधानमंत्री येवोत न येवोत. आपली सभा होणार आणि मोठ्या संख्येने होणार, पाऊस आला तरी होणार. आणि मला आनंद वाटतो, या ठिकाणी आल्यानंतर प्रचंड संख्येने तुम्ही या ठिकाणी हजर आहात हे पाहिल्यानंतर तुम्हा सगळ्यांच अभिनंदन करणं मी माझं कर्तव्य समजतो.

काही ठिकाणी निवडणूक चालू आहेत. केंद्र सरकारने ठराव केला, की सबंध देशांमध्ये निवडणूक एका वेळेला घेणार. चांगली गोष्ट आहे. विधानसभा असो, लोकसभा असो, महाराष्ट्र असो, कर्नाटक असो, उत्तर प्रदेश असो, जम्मू-काश्मीर असो, केरळ असो, आंध्र असो, सगळ्यांची निवडणूक एकाच दिवशी, एका वेळेला घेण्याचा निर्धार केंद्र सरकारने केला. ठराव केला मंत्रिमंडळात. असा निर्णय झाला आणि काल निवडणुका जाहीर झाल्याच्या नंतर सांगितल काय? सांगितलं, की काश्मीर, हरियाणा वेगळा. महाराष्ट्र वेगळा. सगळ्या निवडणुका घेण्याचे धोरण जाहीर केलं मग का तुम्ही वेगळी भूमिका घेताय? त्याच स्पष्ट कारण असं आहे. एक लोकांना फसवाफसवीचं राजकारण आजचे राज्यकर्ते करतायंत.

आज मोदी साहेब ठिकठिकाणी जातात. काल ते होते हरियाणामध्ये. त्याच्या आधी होते जम्मूमध्ये आणि भाषण काय केलं तिथं? देशाच्या हिताची जपणूक करणं ही भूमिका सांगितली असती तुम्ही तर म्हणलं असतं ठीक आहे. बेकारीचा प्रश्न कसा सोडवणार हे त्यांनी सांगितलं असतं तर आम्ही कौतुक केलं असतं. महागाई कशी कमी करता येईल हे सांगितलं असतं तर आम्ही कौतुक केलं असतं. कायदा आणि सुव्यवस्था कशी ठेवणार हे सांगितलं असतं तर आम्ही त्यांच कौतुक केलं असतं. पण सांगितलं काय? सांगितलं, की या देशामध्ये तीन पिढ्या राज्य करतायंत. तीन पिढ्या घालवल्या पाहिजे. कुठल्या तीन पिढ्या? जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि आजच्या काळामध्ये विरोधी पक्षनेते राहुल गांधी. ह्या लोकांचे योगदान नाही देशात? स्वातंत्र्याच्या आधी आयुष्याचे अकरा-बारा वर्ष जवाहरलाल नेहरू तुरुंगात होते. शेजारच्या अहमदनगर जिल्ह्यामध्ये एक किल्ला आहे. ८ ऑगस्ट १९४२ ला काँग्रेसच अधिवेशन मुंबईमध्ये होतं. महात्मा गांधींनी चले जाव असा नारा दिला. गांधींना पकडलं. आगाखान पॅलेसला आणून इथं ठेवलं. जवाहरलाल नेहरूंना पकडलं. शेजारच्या अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये ठेवलं. मौलाना अबुल



कलाम आझादांना पकडलं. त्यांना अहमदनगरला ठेवलं. अनेक राष्ट्रीय नेत्यांना त्या ठिकाणी ठेवलं. आपल्या आयुष्याची १४ वर्षे जवाहरलाल नेहरू तुरुंगात होते, कशासाठी? हा देश स्वतंत्र करण्याच्यासाठी. १९४७ साली तो स्वतंत्र झाला. त्यांनी हा देश लोकशाहीच्या पद्धतीने चालेल अशा प्रकारची कारवाई केली आणि संबंध जगाच्या समोर एक आदर्श ठेवला. जी व्यक्ती बारा वर्षे तुरुंगात जाते. देशाला स्वतंत्र मिळायला खस्ता खाते. आणि स्वातंत्र्याचा अर्थ लोकांच्या जीवनात येईल यासाठी १५ ऑगस्ट नंतर प्रयत्नांची पराकाष्टा करते, त्यांच्यावर टीका करता?

इंदिरा गांधींच्या वर टीका? काय केलं नाही इंदिरा गांधींनी? पाकिस्तानने मस्ती करायचा प्रयत्न केला. इंदिरा गांधींच्या राज्य हातात होत देशाचं. एक भगिनी, त्यांनी सांगितलं सगळ्या जगाला, की भारत सगळ्यांची दोस्ती ठेवू इच्छितो पण आमचा वाट्याला कोणी गेलं तर त्याला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. पाकिस्तानला हा भरोसा नव्हता. त्यांनी मस्ती केली. इंदिरा गांधींनी लष्कराला सूचना दिल्या आणि एका पाकिस्तानचे दोन देश केले. बांगलादेश वेगळा. पाकिस्तान वेगळा केला. या



देशाची ताकत दुनियाला दाखवली. हे इंदिरा गांधींचा कर्तृत्व होतं. गरिबीच्या हितासाठी या भगिनी आयुष्यभर झगडल्या. संघर्ष झाला. त्यांना गोळ्या घातल्या, प्राण दिले देशासाठी आणि नरेंद्र मोदी म्हणतायंत त्यांनी काय केलं? राजीव गांधी तिसरी पिढी. आधुनिकतेचा विचार त्यांनी मांडला. विज्ञानाचा पुरस्कार केला. हा देश जगातील शक्तिशाली देश कसा होईल याची काळजी केली. त्यांच्यावर हल्ला झाला तामिळनाडूमध्ये. त्यांची हत्या करण्यात आली. किती त्याग करायचा? एका घरामध्ये नेहरू १४ वर्षे तुरुंगात, इंदिरा गांधी हत्या, राजीव गांधी हत्या. ज्या कुटुंबामध्ये तीन तीन पिढ्या देशाच्या साठी देतात अशा लोकांच्यावर नरेंद्र मोदी टीका करतात? त्यांना वाटलं पाहिजे ही साधी माणसं नव्हती त्यांनी देशासाठी सगळं केलं आणि म्हणून आज या देशाच्या समोर एक वेगळं चित्र कसे येईल, राज्य समृद्धीच्या रस्त्यावर कसे जाईल याची लोकांनी काळजी घेतली पाहिजे.

महाराष्ट्राचा चेहरा आम्हाला बदलायचा आहे. आता शिंदे साहेबांचं राज्य आहे. त्याच्या आधी देवेंद्र फडणवीसांचं राज्य होतं. काय केलं यांच्या राजवटीत? मी स्वतः तुम्हा लोकांच्या पाठिंब्याने चार वेळा राज्याचा मुख्यमंत्री होतो. आमचे अनेक सहकारी मंत्रिमंडळात होते. सत्तेचा वापर राज्याचा चेहरा बदलण्यासाठी करायचा असतो हे आम्ही दाखवलं. एकेकाळी मी जेव्हा लोकसभेला उभा होतो बारामती मतदारसंघातून. त्यावेळी हा भाग माझ्या मतदारसंघात होता. त्यावेळेला लोकसभेला तुम्ही लोकांनी मला निवडून दिलं. देशाच्या संरक्षण धोरणाची जबाबदारी माझ्यावर सोपवली. देशाचं अन्न, शेती याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. या देशामध्ये परदेशातून धान्य आणावं लागत होत. आज जगातील १८ देशांना धान्य देण्याची ताकद या देशातल्या शेतकऱ्यांनी केली. देशाची जबाबदारी आम्हा लोकांवर होती. हा देश आम्ही बदलला. आज मी काय बघतो? त्यावेळची खराडी आणि आजची खराडी जमीन अस्मानाचा फरक आहे. आज इथं वेगळ चित्र आहे..

आम्ही लोकांनी काम केलं. छोटे कारखाने कसे वाढवायचे? आयटी इंडस्ट्रीज कशा वाढवायच्या? यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते तेव्हा पिंपरी चिंचवडला एमआयडीसी काढली, टाटाचा कारखाना आणला, बजाजचा कारखाना आणला, किर्लोस्करचे कारखाने आणले. अनेक कारखाने चव्हाण साहेबांनी आणले आणि देशामध्ये, महाराष्ट्रामध्ये पुणे व पुण्याचा परिसर हा औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा राहिला, हजारो लोकांना काम दिलं. माझ्याकडे महाराष्ट्राची सूत्रं आली. आम्ही वेगळ्या दिशेला महाराष्ट्राला नेण्याचा प्रयत्न केला.

आज खराडीच्या आजूबाजूला आयटी इंडस्ट्री दिसते,

हजारो लोक या ठिकाणी राहतात. एकेकाळाचे आमचे सगळे सहकारी कोणी पठारे असतील, गलांडे असतील, अन्य असतील या सगळ्यांचे वास्तव्य या भागामध्ये होते. आज या भागामध्ये पाहिल्यानंतर आयटी इंडस्ट्रीमध्ये गेल्यानंतर तुम्हाला आणि मला सबंध देशातले कानाकोपऱ्यातले लोक आज या ठिकाणी येतात. एकट्या खराडीमध्ये जवळपास शिरूर तालुका असो, पारनेर असो या भागातले ३० ते ४० हजार लोक आज या ठिकाणी राहतात, कष्ट करतात. कष्ट करण्यासाठी सर्व साधनं निर्माण करून देणे हे काम आम्ही लोकांनी करून दिले. खराडी एवढ्या पुरती नाही हा विचार आम्ही अनेक ठिकाणी केला. हिंजवडी केली, चाकण केला. आज तुम्ही चाकणला जाऊन या चाकणचा चेहरा बदलला. एकेकाळचे चाकण आणि आजचे चाकण जमीन आसमानचा फरक आहे. रांजणगाव बघा. एक दिवशी मी नगरमधून येत होतो. बापूसाहेब थिटे म्हणून आमचे सहकारी होते, आता ते हयात नाहीत. माझ्या गाडीत होते. रांजणगावला रस्त्याने जमीन पाहिली. मी गाडी थांबवली आणि बापूसाहेबांना विचारलं ही जमीन कोणाची आहे? त्यांनी सांगितलं अमुक अमुक लोकांची आहे. काय पिकं घेतात? म्हणे पाण्याचा बंदोबस्त नाही पिकं काही घेत नाहीत. पुण्याला आलो आणि कलेक्टरला सांगितलं रांजणगावची जमीन ताब्यात घ्या तिथे आपण उद्योग काढू. लोकांची बैठक घेतली, रांजणगावच्या लोकांना विचारलं. जमीनची किंमत तुम्हाला काय पाहिजे? त्यांनी सांगितलं पाच हजार रुपये एकर इतकी किंमत आम्हाला पाहिजे. मी कलेक्टरला सांगितलं दहा हजार द्या. ते पाच मागताहेत दहा द्या. तिथे मला उद्योग करायचा आहे. आज तुम्ही रांजणगावला गेलात, गणपतीचे दर्शन होते तसेच जगातले चांगले उद्योग आज रांजणगावला आलेले आहेत. हिंजवडी, चाकण, रांजणगाव, खराडी, भिगवन, बारामती, इंदापूर, जेजुरी या सगळीकडे उद्योग सगळीकडे हाताला काम हा चेहरा बदलला कोणी? आम्ही लोकांनी बदलला. तुम्ही सत्ता दिली त्या सत्तेचा वापर केला.

आज ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी काय केलं पुण्यामध्ये? मी देशाच्या कामासाठी दिल्लीला जातो. पार्लमेंटचा सभासद आहे म्हणून दिल्लीला जातो. महाराष्ट्राची वर्तमानपत्रं मागून घेतो, टीव्ही लावतो. काय बघायला मिळतं? पुण्याची चौकशी केली तर लोक सांगतात, पुण्याचे वैशिष्ट्य काय? कोयता गँग. कोयता गँग. विद्येचे माहेरघर हे पुणं. टेल्कोसारखा कारखाना, या पुण्यात बजाज सारखा कारखाना हे पुण्याचे वैशिष्ट्य, किर्लोस्करांचे कारखाने हे पुण्याचे वैशिष्ट्य आणि आजच्या राज्यकर्त्यांनी पुण्याचे वैशिष्ट्य काय केले? कोयता गँग. आत्ता भाषणामध्ये कोणी सांगितलं, की जर अलीकडच्या काळामध्ये नवी पिढी काय करतात मला माहित नाही. कसल्या तरी गोळ्या असतात ते खाल्लं तर एकदम चंद्रावर जातो आणि ते चंद्रावर जाण्याचा उद्योग आज पुण्याच्या भागांमध्ये व्हायला लागला आहे. आजचे राज्यकर्ते कोयता गँग असो, ड्रग्ज व्यवहार असो याचा विस्तार पुणे आणि पुण्याच्या आजूबाजूला करत आहेत. यामुळे पुणे आणि पुण्याची नवी पिढी ही उद्ध्वस्त होणार या प्रकारचे चित्र या ठिकाणी दिसते. आज हा प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे.



मध्यंतरी वाचलं एक आमदार अशा कामांमध्ये वेगळ्या पद्धतीने लोकांना मदत करतो. आता मी येताना बघितलं मोठे मोठे बोर्ड होते. आमचा दमदार आमदार. काय दमदार आहे? चौकशी केली, की हा आमदार दमदार आहे म्हणून काय भानगड काय? नाव काय त्याचं? टिंगरे. अरे बाबा तू सांगतो तू कुणाच्या तिकिटावर निवडून आला? त्या वेळेला तुझ्या पक्षाचा नेता कोण होता? त्या वेळेला हा पक्ष कोणी काढला? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना ही कोणी केली? सबंध हिंदुस्थानला माहित आहे त्या पक्षाच्या वतीने तुला संधी दिली काम करावं अशी अपेक्षा केली. तू सोडून गेला, ठीक आहे तुझा काय बंदोबस्त करायचा हे लोक करतील त्याची चिंता त्या ठिकाणी नाही. पण निदान चुकीच्या गोष्टींना पाठिंबा देऊ नको. प्रचंड मोठा अपघात झाला. दोन काही तरुण मुलं एका इम्पोर्टेड गाडीतून चालली काय आणि समोरून स्कूटर वर दोन तरुण मुलगा आणि मुलगी जात असताना त्यांना उडवलं काय जागच्या जागेवर त्यांची हत्या काय होते? उद्ध्वस्त होतात आणि अशा वेळेला जे जखमी झाले त्यांना मदत करण्याऐवजी हा दिवटा आमदार पोलीस स्टेशनला जातो. याच्यासाठी मतं मागितली होती? मतं मागितली ती राष्ट्रवादीच्या

नावाने मागितली, मतं मागितली ती शरद पवारच्या नावाने या ठिकाणी मतं मागितली आणि लोकांनी श्रद्धेने मतदान केलं. त्या श्रद्धेचं उत्तरदायित्व तुम्ही या पद्धतीने देता? ज्या लोकांना आणि ज्या कुटुंबातील लोकांना सत्तेचा माज चढला चुकीची गोष्ट तरुण पिढी करते, ड्रग्जच्या आहारी जाते. १०० च्या वेगाने गाड्या चालवतात तरुणांना उद्ध्वस्त करतात अशा लोकांच्या पाठीशी तुम्ही उभे राहता. हा आमदार दमदार आमदार म्हणायचा? शरम वाटली पाहिजे लोकांचा प्रतिनिधी सामान्य लोकांचे जीवन उद्ध्वस्त करणारी जे कोणी असतील त्यांच्या मदतीने जे काही करता येईल तर अशा लोकांच्या संबंधी काय निकाल घ्यायचा? हे बघितलं पाहिजे.

माझ्या वाचनामध्ये आलं पुण्याचा पोलीस आयुक्त.



पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी जाहीरपणाने प्रेसमध्ये सांगितलं की या ठिकाणी अगरवाल यांना मदत करण्यासाठी अनेकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पणाने मदत केली त्यांच्याबद्दलची कारवाई केली जाईल आणि त्याच्यामध्ये सांगत असताना सांगितलं की आमदार टिंगरे यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असल्याचे या ठिकाणी दिसते. पोलीस अधिकारी सांगतो पुण्याचा पोलीस आयुक्त सांगतो हा आमदार दमदार? या पद्धतीने या चुकीच्या लोकांना खतपाणी घालतो त्यांना मदत करतो अशा लोकांनी तुमच्यापुढे पुन्हा येऊन मत मागण्याची भूमिका घेतो? एकतर पक्ष सोडला, लोकांना दिलेला शब्द मोडला. ज्या पक्षाच्या निशाणीवरून तुम्ही आलात आज पक्ष घेऊन पळून गेलात. मोठ्या गमतीचे लोक आहेत. पळाले तर पळाले पक्ष घेऊन पळाले. खूण घेऊन पळाले आणि आता पुन्हा एकदा तुमच्यापुढे मत मागण्यासाठी येत आहेत. मी तुम्हाला एवढेच सांगू इच्छितो आम्ही लोकांनी ठरवलं आणि आम्ही म्हणजे मी स्वतः. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार, दुसरं उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालची शिवसेना आणि तिसरं काँग्रेस पक्ष. नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालचा काँग्रेस पक्ष. या तिन्ही पक्षांचे लोक एकत्र आम्ही आलो आहोत. महाविकास आघाडीची स्थापना केली. त्या महाविकास आघाडीच्या रूपाने मत मागायला आम्ही गेलो. लोकसभेच्या निवडणुकीत आमचे ३१ खासदार निवडून आले आणि देशामध्ये एक प्रकारचा विक्रम केला. आम्ही लोक एकत्र आलो तर काय होऊ शकतं? हे चित्र या ठिकाणी दिसलं आणि हे यश तुम्ही लोकांनी दिलं. माझी तुम्हा लोकांना विनंती आहे ही आघाडी आजही आम्ही कायम ठेवली. मी तुम्हाला शब्द देतो या आघाडीचा एक सहकारी म्हणून आम्ही काहीही करू , पण एकीने महाराष्ट्राचे चित्र बदलण्याच्यासाठी तुम्हा लोकांच्या समोर कार्यक्रम देऊ. समाजातले जे काही प्रश्न असतील मग ते बेकारीचे असतील, महागाईचे असतील, अन्य असतील त्या सगळ्या प्रश्नांकडे लक्ष दिले जाईल.

लेक माझी लाडकी ठीक आहे, मुलगी लाडकी असते. मीही मुलीचा बाप आहे. माझी मुलगी लाडकी असली तर त्याच्यात काही चुकीचे नाही आणि ती तिचे काम करते. सहा वेळेला तुम्ही लोकसभेत निवडून दिलं आणि म्हणून कोणी लेक लाडकी म्हणत असेल त्याला आमचा विरोध नाही. पण तिला तुम्ही पैसे देणार माझं म्हणणं स्पष्ट आहे जी काही तुम्हाला मदत करायची आहे ती करा. लोकांना जी काही मदत घ्यायची आहे ती घ्या. पण आज गरज कशाची आहे? आज गरज या मुलींना संरक्षण देण्याच्या संदर्भात आहे. बदलापूरला प्रकार झाला त्या ठिकाणी लहान मुलींच्यावर अत्याचार होतात, मुलींच्या वर अत्याचार बदलापूरला होतात. तुम्ही रोजचे वर्तमानपत्र काढा. रोजच्या वर्तमानपत्रांमध्ये कुठे ना कुठेतरी मुलींच्या वर अत्याचार होतो या बातम्या येतात. जे मुलींना संरक्षण देऊ शकत नाहीत, त्यांचे अत्याचार थांबवू शकत नाहीत ते काय मुलींच्या बद्दल भलं करणार? आणि म्हणून मुलींच्या नावावर तुम्ही मत मागता त्यांना मदत करा त्यावर माझी तक्रार नाही पण मुलींचे रक्षण करण्याच्या बद्दलची जबाबदारी राज्यकर्त्यांना टाळता येणार नाही आणि याच पद्धतीने आमच्या आया बहिणींच्या कडे बघण्याचा दृष्टिकोन आत्ताचा सरकार जर करणार असेल तर तुम्हा सगळ्यांच्या सामूहिक शक्तीच्या जोरावर या सरकारला त्यांची जागा दाखवणं हे ऐतिहासिक काम उद्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपण मिळून करू ही खात्री या ठिकाणी तुम्हा सर्वांना देतो.

■■

गद्दार आमदारांना धडा शिकवा आणि पुन्हा एकदा २०१९ ला जो इतिहास घडवला तोच इतिहास पुन्हा घडवा. नव्याने इतिहास घडवण्याची जबाबदारी आपण सगळ्यांनी घ्यायची आहे. म्हणून आज आम्ही सगळे आपल्या दारात आलेले आहोत. राज्यात विकासकामे होत नाही म्हणून लोकं त्रस्त झाले आहेत. पैसे दिल्याशिवाय काम होत नाहीत. त्यामुळं लोकसभा निवडणूक झाल्यानंतर सरकार घाबरलं आणि घाबरलेल्या सरकारने आपल्या तिजोरीचे दार काढून बाजूला ठेवलं. जाहिराती करून सरकारला समाधान नाही. त्यामुळं सरकारच्या कामाची माहिती देण्यासाठी घराघरात जाहिरात केली जात आहे.

सगळ्यांनी एकमताने काम केलं पाहिजे, आता एवढी जण आहेत, चार पाच जण मिळून सरकार चालवत आहेत. तरी त्यांना यश येत नाही. आगामी विधानसभेसाठी उमेदवार निवडणं अवघड आहे. म्हणून आपण सगळ्यांनी किती क्षमतेने माणसं गोळा केलेली आहे, हे बघण्यासाठी देखील शिवस्वराज्य यात्रा ऐन गणपतीचा महोत्सव चालू असताना आम्ही सगळे आपल्या दारात घेऊन बघण्याचा प्रयत्न करतोय. आनंददायी बाब म्हणजे जेवढे पुरुष आहेत बहुतेक तेवढ्याच महिला तुम्ही गोळा केलेल्या आहेत. महाराष्ट्रातलं युतीचं सरकार घालवण्यासाठी तुम्हा सगळ्यांचा आशीर्वाद मिळाला पाहिजे. लहान मुलं मुली शाळेत जातात त्यांच्यावर अत्याचार कोणी करणार नाही, याची खात्री आम्ही महाराष्ट्राला देऊ. आज लाडक्या बहिणीच सुरक्षित नाही. ही समाजात पसरलेली भावना कमी करण्याचा आम्ही प्रयत्न करू.

आपण ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जातो, जिल्हा रुग्णालयात जातो ती उत्तम सेवा तिथे तुम्हाला मिळाली पाहिजेत. तुमच्या सगळ्या शेतीच्या पाण्याचे प्रश्न असतील,

# गद्दारांना धडा शिकवा नव्याने इतिहास घडवा

**जयंत पाटील**



स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार! राष्ट्रवादी

आता धापेवाडा सिंचन योजना प्रलंबित आहे. मी या खात्याचा मंत्री असताना बऱ्याच बैठका झाल्या प्रकल्पाला गती देण्याचं काम केलं, फॉरेस्टचे काही प्रश्न होते पण या सगळ्या योजना पूर्ण झाल्यानंतर शेतकरी सुजलाम सुफलाम होईल.

हेलिकॉप्टर खरेदी करणाऱ्याला सूट आणि गाडी, मोटरसायकल, सायकल खरेदी केलं तर त्याच्या २८ टक्के १८ टक्के किंवा २४ टक्के कर सरकार लावत आहे. महाराष्ट्राची महागाई कमी झाली पाहिजे. तुमच्या शेतीमालाला चांगला दर मिळाला पाहिजे. कपाशीला चांगला दर मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणारे महाराष्ट्रातलं सरकार असलं पाहिजे. अतिवृष्टी होते, सरकार इकडं बघत नाही आणि मग सरकारच्या सभा होतात सामान्य माणसे यांच्या सरकारच्या सभांना जायला बंद झालेली आहेत. लोकसभेला तुम्ही काय केलं? तर भाजपला सत्तेतून घालवण्यासाठी मतदान केले.

भाजपला सत्तेतून घालवण्यासाठी कारण काय तर हे सरकार भारतीय जनता पक्ष हा पक्ष या देशांमध्ये घटनेतल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घालून दिलेल्या तरतुदी बदलण्याचा, घटना बदलण्याचं काम करणार होतं. पण काहीही करून भाजपचं सरकार आलं नाही. दुसऱ्या दोन पक्षांना मदत घेऊन यांनी केंद्रात सरकार स्थापन केले. उमेदवार हा महाविकास आघाडीच्या संमतीने तुतारी वाजवणारा माणूस उभा राहिला तर ते चिन्ह घराघरापर्यंत पोचवण्याचं काम देखील तुम्ही केलं पाहिजे.

अजितदादांनी काही दिवसांपूर्वी घरं फोडणं योग्य नाही. मी ती चूक केली अशी कबूली दिली. पश्चाताप झाल्याचे दादा कुठल्या मूडमध्ये बोलले हे मला माहिती नाही. आत्राम कुटुंबात जो वाद झाला त्यावर त्यांना स्वतः आलेल्या अनुभवावर ते बोलले असावे. आमच्या पठ्ठ्याने एक डाव





राखून ठेवला आहे. अजित पवार यांच्या स्वभावामध्ये बदल झाला असून आम्हाला सोडून गेल्यानंतर हा बदल झाला आहे. अजिददादा यांच्यासोबत आपण अनेक वर्षे काम केले. त्यांचा मूळ स्वभाव चांगला ठावूक आहे. दादा एकदा बोलले की तो अंतिम शब्द असतो. ते आपले शब्द कधी मागे घेत नव्हते. मात्र आता राजकीय परिस्थिती बदलली आहे. त्यांचा मूळ स्वभाव दाखवायला आणि बिनधास्त बोलायला बंदी घालण्यात आली आहे. अरोरा नावाचा कन्सल्टटंट त्यांनी नियुक्त केला आहे. तो जे सांगतो तेच ते बोलतात. हे अजितदादा खरे नाही. दादा आणि त्यांचा स्वभाव उभ्या महाराष्ट्राला माहिती आहे.

केंद्रातील सरकारला सत्तेतून खेचायचे असेल तर आधी महाराष्ट्रातील सरकार खाली खेचावे लागेल. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत जनतेने परिवर्तनाचा निर्धार केला आहे. लोकसभेत ज्या पद्धतीने नाशिक, दिंडोरीत महाविकास आघाडीची पाठराखण केली, त्याच पद्धतीने विधानसभा निवडणुकीतही आशीर्वाद द्या. राज्यातील सरकार थकबाकीदार बनले आहे. विकासकामे ठप्प झाले असून, केवळ प्रसिद्धी केली जात आहे.

कुठल्याही नैसर्गिक आपत्ती अथवा बाजारभाव घसरल्यास शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव मिळाला किंवा आर्थिक नुकसान झाले तर कुठल्याही आंदोलनाची किंवा अधिवेशनाची वाट न पाहता बाधित शेतकऱ्यांना आधारभूत किमतीनुसार भरपाई देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली जाईल.

भाजपने राज्यात शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडत विरोधी पक्ष कमकुवत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, जनतेनं त्यांना लोकसभेत धडा शिकवला. महाविकास आघाडीला मोठे यश मिळवून दिले. आता राज्यातही सरकार जाणार या भितीनं विविध योजना जाहीर करत आहेत. मात्र, जनतेचा या सरकारवर अजिबात विश्वास राहिलेला नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीलाच जनता सत्ता देईल.

राज्य सरकारकडे लाडक्या बहिणींना देण्यासाठी पैसे नाहीत. त्यामुळे राज्य सरकारने रिझर्व्ह बँकेकडे सव्वा लाख कोटींचे कर्ज मिळण्यासाठी प्रस्ताव पाठवला असून ‘खिशात नाही दमडा आणि मला बाजीराव म्हणा’ अशी राज्य सरकारची गत झाली आहे. पंजाबमध्ये अफगाणिस्तानमधून कांदा आणून मोदी-शहांनी शेतकऱ्यांच्या कांद्याचे पानिपत केले. शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळू नये, अशी भाजपची मानसिकता आहे. शेतमालाचा दर वाढला तर महागाई वाढते, असे त्यांना वाटते. वीज, स्टील, सिमेंट, खतांच्या किमती वाढल्या तर महागाई वाढत नाही असे त्यांना वाटते.

जम्मू-काश्मिर आणि हरियानाची निवडणूक चालू आहे. मात्र, साहेब महाराष्ट्रात ठाण मांडून बसले आहेत. पण, साहेबाला हे माहीत नाही, की औरंगजेबदेखील २६ वर्षे महाराष्ट्रात राहिला तरी त्याला मराठी राज्य मोडता आलं नाही. शहा-मोदींनी कितीही आढावा घेतला तरी त्यांनाही महाराष्ट्र जिंकता येणार नाही. महाराष्ट्रात शिवसेना मोठी होती. राष्ट्रवादी काँग्रेस मोठी होती. त्यांना फोडण्याचे पाप भाजपने केले असून त्याचा प्रचंड राग महाराष्ट्राच्या माणसांमध्ये आहे. त्यामुळे भाजपचा पराभव करण्याचे काम ते येत्या विधानसभा निवडणुकीत करतील.

महायुतीबरोबर गेलेले हजारो कोटींच्या गप्पा करत आहेत. मात्र, या सगळ्या फक्त वर्क ऑर्डर आहेत. टेंडर झाले तरी बिले होणार नाहीत. तीन वर्षांपासून ठेकेदारांची ६० हजार कोटींची बिले त्यांना देता आलेली नाहीत. पुढची बिले देण्यासाठी त्यांच्या तिजोरीत पैसे तर पाहिजेत. लोकसभेच्या निकालानंतर घाबरलेल्या राज्य सरकारने राज्याची सगळी तिजोरीच उघडी करून दिली असून सरकारची पत गेली आहे.

बदलापूर घटनेतील संशयित आरोपीचा मृत्यू झाल्याचा खेद नाही. मात्र, लहान मुलीवर अत्याचार घडलाच नाही, असा नकार देणाऱ्या संस्थाचालकांच्या चौकशीचे काय आणि संबंधित पोलिसांवर कारवाई होणार की नाही. बदलापूर घटनेबाबत संस्थाचालक असा काही प्रकार घडलाच नाही असा बनाव करत होते आणि पीडितेचे नातेवाईक पोलिस ठाण्यामध्ये गेल्यानंतर तेथील पोलिस गुन्हा दाखल करण्यास नकार देत होते. या सर्वांची चौकशी सरकार करणार का?

नाशिकला दत्तक घेणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकही प्रकल्प दिला नाही. याउलट नाशिकमधील एमडी कारखाने मुंबईच्या पोलिसांनी उद्ध्वस्त केले. नाशिकच्या पोलिसांना ही हिम्मत दाखवता आली नाही. बॉश कंपनीतील कामगाराने सहकुटुंब आत्महत्या केल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. परंतु, नाशिकमध्ये आयटी पार्क न उभारता आल्यामुळे येथील युवक पुणे व बंगळूरला नोकरीसाठी जात आहेत. नाशिककरांची फसवणूक झाली आहे.

लोकसभा निवडणुकीची मतमोजणी झाल्यानंतर सरकार खडबडून जागं झालं आणि घाबरलं पण. हे घाबरलेलं सरकार आता या राज्यामध्ये पाहिजे त्या वस्तू, पाहिजे त्या गोष्टी, आश्वासनं आज देतंय. आणि म्हणून या महाराष्ट्रातल्या जनतेला म्हणेल ते आज मिळू शकतं. तुम्ही चंद्र मागितला तर चंद्रही आणून देतील. तुम्ही कपडे मागितले तर अंगावरचे कपडेही काढून देतील. पण माझी लाडकी खुर्ची सोडणार नाही अशी भावना आहे. त्यामुळं आमच्या आया-बहिणींना गैरसमज होईल, की ते तुम्हाला म्हणतायंत, की लाडकी बहीण, लाडकी बहीण. पण हे दोन महिन्यांपुरतंच आहे. पण, खरा लाडका भाऊ तुमचा आज महाराष्ट्रामध्ये विरोधी पक्षात बसलेला आहे. त्या विरोधी पक्षाची सत्ता आणली तर महाराष्ट्रातल्या लाडक्या बहिणींना आज जे तकलादूपणानं वेगवेगळ्या मार्गानं जे देण्याचं काम चालू आहे, ते त्यांच्यापेक्षा अधिक जास्त आणि अधिक चांगली व्यवस्था महाराष्ट्रात आणण्याचं काम आम्ही करू.

या देशातला शेतकरी जगला तर हा देश जगेल ही मानसिकता भारतीय जनता पक्षाची नाही. यूपीए सरकारच्या काळात तत्कालिन कृषी मंत्री शरदचंद्र पवार साहेब यांनी मात्र शेतमालाची आधारभूत किंमत वाढावी यासाठी सदैव प्रयत्न केले. आज शेतकऱ्यांचं मानसिक खच्चीकरणं करण्याच काम सुरू आहे. अशा परिस्थितीत तुतारी हातात घेतल्याशिवाय आपण मतदारसंघात निवडून येणार नाही, अशी भावना बड्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची बळावते आहे. पवार साहेब देतील तो आपला उमेदवार असं समजून काम करायचं आहे. तुतारी वाजवणाऱ्या माणसाला अचानक महाराष्ट्रात प्रचंड मागणी आलेली आहे. पवार साहेबांच्याकडं जर तुम्ही दोन तास जाऊन बसलं तर तुम्हाला कळेल. परवा एक मोठा नेता आपल्या पक्षात यायची इच्छा व्यक्त करत होता. त्यांना म्हटलं, की तुमचं तिथं सर्व काही व्यवस्थित चाललंय की मग कशाला पक्ष बदलतांय. तर त्यांनी सांगितलं, की मतदारसंघात फिरल्यानंतर सगळेजण म्हणतायंत, की तुतारी घ्या तुतारी. नाहीतर काही खरं नाही. तुतारी घेतल्याशिवाय आपण महाराष्ट्रात विजयी होणार नाही असं अनेक मतदारसंघातल्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना वाटायला लागलंय, हीच शरद पवारांची ताकद आहे. पवार साहेबांची ही ताकद दाखविण्याचं काम तुम्ही सर्वांनी करावं अशी अपेक्षा व्यक्त करतो.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार यांच्या वतीने व सर्व राज्यातील कार्यकर्त्यांच्या वतीने मी आभार मानतो की त्यांनी आमच्या पक्षातील सर्व दोष काढून घेतले आणि ते स्वतःकडे घेतले आहे. आणि यामुळेच लोकसभेच्या निवडणुकीमध्ये आम्हाला चांगली यश मिळाले.

सर्व नेते एकत्र असताना मागील लोकसभा निवडणुकीत राज्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे चार खासदार राज्यात निवडून आले होते. मात्र सर्वजण सोडून गेले. आता आमचे आठ खासदार निवडून आले आहे आणि याचे श्रेय आम्ही मोदी आणि शहा यांना देतो. लोकसभेच्या निवडणुकीच्या पूर्वी भाजप नेते देशात व राज्यात काय तोऱ्यामध्ये वागत होते हे सर्वांनी पाहिले. मात्र लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर त्यांच्या बूथ कमिट्या कोठे वाहून गेल्या हे देखील समजले नाही. याचे कारण ईडी सारख्या संस्था सांभाळणाऱ्यांना माणसे सांभाळता आली नाहीत. आणि शरद पवार यांनी मात्र आजपर्यंत माणसे जपली त्यामुळे हे यश मिळाले. यावेळी त्यांनी राज्यामध्ये सुरू असलेल्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर कोरडे ओढले तसेच सध्या रिझर्व्ह बँकेकडून आठ लाख कोटी रुपयांचे यापूर्वीच कर्ज घेतलेले असताना पुन्हा आणखी नवीन कर्जाची मागणी या सरकारने केली आहे याचा अर्थ आम्ही सत्तेवरून जाणार आहोत परंतु जाताना राज्याची वाट लावून जाणार अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळं अशा या सरकारला सत्तेतून खाली खेचण्याचं काम आपल्याला करायचंय.

महायुती सरकारमुळे राज्यातील परिस्थिती अतिशय वाईट बनली आहे. ठेकेदार कहता है मे भिकारी हुँ. अफसर कहता है मै पुजारी हूँ. आजकाल सत्ता पक्ष के नेता कहने लगे मै तो व्यापारी हुँ, जनता कहती मैं बिचारी हुँ. जळगाव जिल्ह्यात शिवसेनेच्या पाच आमदारांना निवडून दिल्यानंतर जनतेला वाटलं होतं की आम्ही काहीतरी शिवसेनेचे वाघ निवडून दिले. ५० खोके एकदम ओके आणि वाघांचे झाले बोके. राष्ट्रवादीचा एक आमदार आणि जळगाव जिल्हा शरद पवार यांच्या ताकतीवर निवडून आला मात्र मंत्री पदाच्या खुर्चीसाठी त्यांनी गद्दारी केली.

जर तुम्हाला गुजरातची चाकरी करायची असेल तर मत मागायला इकडे कशाला येता? गुजरातमध्ये जा. बहीण जर लाडकी आहे तर ती सुरक्षित सुद्धा असली पाहिजे. आज सुरक्षिततेचा हक्क तिला मिळाला पाहिजे. सध्याचे सरकार कसं चाललं आहे तुम्हाला माहिती आहे. या ठिकाणी अधिकाऱ्यांवर कुणाचा वचक नाही. जळगाव जिल्ह्यातल्या सहा आमदारांनी गद्दारीचा वार हा जनतेच्या काळजावर केला आहे. याचे उत्तर जळगाव जिल्ह्यातल्या जनतेला द्यावे लागेल. सीमेचा रक्षण करणारा जवानाच्या एका भावी पत्नीचे पोलीस स्टेशनमध्ये लैंगिक शोषण करण्यात आलं. भारतीय जनता पार्टीची सत्ता असलेल्या राज्यात हे झालं. गद्दार आमदार म्हणत होते की आम्ही हिंदूंसाठी केली आणि अत्याचार होतो का तेव्हा कुठे गेले होते यांचे हिंदुत्व. तेव्हा लाज वाटली नाही का तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श सांगणारा या महाराष्ट्रात दोन चिमुकलींवर अत्याचार होतो. तेव्हा तुम्ही गप्प कसे? हिंदुत्व सांगणारे तुम्ही, मग तुम्हाला का नाही बोलता आलं? गृहविभागाचा निषेध करतो.

# ५० खोके एकदम ओके आणि वाघांचे झाले बोके

**अमोल कोल्हे**



शिवस्वराज यात्रा ही स्वाभिमानासाठी काढलेली यात्रा आहे. मी प्रफुल्ल पटेल यांच्यावर बोलणे एवढा मोठा नेता मी नाही. ते राष्ट्रीय पातळीवरचे नेते आहेत. प्रफुल्ल पटेल साहेब, आपसे तो ये उम्मीद न थी. गोंदिया व भंडारामध्ये भेल प्रकल्प आणि विमानतळ प्रकरण असो, याबाबत जनतेने पाहिलं आहे. म्हणूनच दोन्ही जिल्ह्यातील लोकांना पवारसाहेबांवर विश्वास आहे आणि त्यानुसार जयंत पाटील जागेचं ठरवतील.

अजित पवार यांच्याकडून मुख्यमंत्री पदाची मागणी भाजप पक्षश्रेष्ठींकडे केल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे येऊ नको म्हटलं तरी कोणत्या गाडीत बसू अशी अवस्था अजित पवार गटाची झाली आहे. महायुतीच्या सर्व्हेमध्ये अजित पवारांना फक्त १२ जागा मिळतील, मग बाकीच्या २८ आमदारांचे काय करायचे हा प्रश्न त्यांच्या डोळ्यासमोर असल्याने दादांनी बिहार पॅटर्ननुसार मुख्यमंत्रीपदाची मागणी केली असेल. शरद पवारांसोबत जे ठामपणे उभे राहिलेत त्याच्याविषयी प्रश्न नाही. परंतु जे आता वारा बघून उड्या मारण्याच्या तयारीत आहेत. त्यांच्याबाबत त्या ठिकाणचे कार्यकर्ते आणि पवारसाहेब निर्णय घेतील.

नागपूर अपघात प्रकरणी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलांची गाडी आहे. मात्र या प्रकरणात सत्ताधारी उडवाउडवीची उत्तरं देत आहेत, हे आपल्या महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. पुणे प्रकरण असो की वसई प्रकरण असो, नेत्याच्या मुलांनी एखादी घटना केली तर त्या प्रकरणावर पडदा टाकण्यात येतो. तसेच या प्रकरणावर सुद्धा अशाच प्रकारे महायुती सरकार पडदा टाकत असेल तर हे सरकार सर्वसामान्य नागरिकांचे नाही असा लोकांच्या समज होईल. ज्यांनी गुन्हा केला अशांवर कठोर कारवाई व्हायला






पाहिजे.

शेतकरीविरोधी तीन काळे कायदे परत आणण्याची भाषा कंगना रणावतसारख्या भाजपच्या खासदार करू लागल्या आहेत, ही अतिशय चिंताजनक गोष्ट आहे. अशा या शेतकरीविरोधी सरकारला धडा शिकविण्याची वेळ आता आली आहे. महाराष्ट्रातली जनता येत्या विधानसभा निवडणुकीत नक्कीच ही संधी सोडणार नाहीत. सिन्नर तालुक्यात आठ वर्षांच्या चिमुरड्याला बिबट्या उचलून नेतो. माझ्या मतदारसंघातही आजच एका चिमुरड्याला बिबट्याने उचलून नेले आहे. निष्पाप लेकरांचे बळी जात असतानाही राज्य शासनाला त्याचे सोयरसुतक नाही. बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी केरळच्या धर्तीवर राज्य आपत्ती घोषित करून बिबटे प्रजनन नियंत्रित करण्यावर भर देण्याची आवश्यकता असताना सत्ताधारी केवळ राजकारण करण्यात गुंतले आहेत. त्यामुळेच त्यांना धडा शिकविण्यासाठी आता जनतेनं पुढं आलं पाहिजे.

गेल्या लोकसभा निवडणुकीत हाताला काम हाच खरा राम हे नाशिक आणि अयोध्येतील जनतेनं दाखवून दिलं आहे. महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन घडवा म्हणजे शरद पवार दिल्लीत परिवर्तन घडवतील. गृहमंत्र्यांच्या नागपूर जिल्ह्यात २४० दिवसांमध्ये २१३ बलात्कार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे लाडकी बहीण योजना राबविणाऱ्या सत्ताधाऱ्यांना महिलांच्या मताशी फक्त देणेघेणे आहे. त्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही पावले उचलली जात नाहीत हे वास्तव आहे आणि त्याचा









जनतेनं विचार केला पाहिजे.

पक्ष फुटीनंतर अनेकांना वाटलं, की आता संपलं. पण, ८४ वर्षांचा एक योद्धा हार मानायला तयार नव्हता. त्या योद्ध्याचं नाव आदरणीय शरद पवार साहेब. महाराष्ट्रातल्या राजकीय जाणीव असलेल्या माणसाला हे जाणवायला लागलं, की विधानसभेत जायचं असेल तर तुतारी हातात घेतल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळं महाविकास आघाडीचं सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. लोकसभेला मतांची झाली कडकी, म्हणून सत्ताधाऱ्यांना बहीण झाली लाडकी. स्वार्थाच्या अंध:कारावर निष्ठेनं विजय मिळवता येतो हे तुम्ही लोकसभा निवडणुकीत दाखवून दिलंत. आता विधानसभेलाही तोच कित्ता गिरवायचा आहे.

देशातील जनतेला भाजपने ईडी काय असते हे दाखवले आणि या संस्थेमुळेच साहेबांचे बोट धरून राजकारणात आलेल्यांनी त्यांची बोट सोडले. आणि त्यांची अवस्था किती वाईट भाजपने केली आहे हे आता सर्व जनता पाहत आहे.

दिल्लीत गुबूगुबू वाजलं, की इथं माना डोलावणारे नंदी बैल मंत्रिपदाच्या खुर्च्यांवर बसलेत याचं वाईट वाटतं. विकासासाठी तिकडे गेलेल्यांनी कांदा निर्यातबंदीवर एक शब्ददेखील काढलेला नाही. जो आपल्या सुख–दु:खात नाही, त्याच्या वरातीत आपण येत्या निवडणुकीत नाचायचं नाही. भारतीय जनता पक्षानं आपल्या ताटात माती कालवली. त्यांची काळी पापं विसरू नका व या निवडणुकीत त्यांना सुट्टी देऊ नका. आगामी निवडणुकीत धनशक्तीचा पराभव आपल्याला जनशक्तीनेच करावा लागेल. महाराष्ट्रातील सरकार जर आपण बदललं, तर आपला वस्ताद दिल्लीचं सरकार हलविल्याशिवाय राहणार नाही. ठराविक लोकांना निधी देऊन मतं खरेदी करण्याचं पाप महायुती सरकार करत आहे. पण, महाराष्ट्राला गद्दारी मान्य होत नाही हे लोकांनी लोकसभेत दाखवून दिलं. विधानसभेलाही आपल्याला तेच करायचंय.

■■

घाबरलेला माणूस त्याची घबराट कळू नये म्हणून वेगवेगळे बहाणे करु लागतो. त्याला कळत असते की या बहाणेबाजीला लोक भुलणार नाहीत परंतु अस्तित्व राखण्याची केविलवाणी धडपड तो करीत राहतो. अशीच अवस्था भाजपची म्हणजे भाजपची सर्वेसर्वा जोडगोळी आहे तिची झालेली आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात गद्दारांच्या मदतीने चोरलेली सत्ता हातची जाऊ नये यासाठी या जोडगोळीने प्रयत्नांची पराकाष्ठा चालवली आहे. या धडपडीतच त्यांच्या संभाव्य पराभवाची कल्पना येते. भाजपचे स्वघोषित चाणक्य, निवडणूक तज्ञ उर्फ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विदर्भातील आपल्या भेटीत त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगितले की उध्दव ठाकरे आणि शरद पवारांना रोखण्यासाठी विदर्भातल्या ४५ जागा जिंकणे आवश्यक आहे आणि त्यादृष्टीने कामाला लागा. महाराष्ट्राची विधानसभा जिंकण्यासाठी भाजपची जिवापाड धडपड सुरु आहे. त्यासाठी त्यांनी आकाशपाताळ एक करण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्राची निवडणूक पूर्ण ताकदिनिशी लढण्यासाठी आणि त्यासाठी पक्षाकडे असलेली सर्व साधनसामग्री पणाला लावता यावी यासाठी या सर्वोच्च जोडगोळीने हरयाणाबरोबर महाराष्ट्राची निवडणूक घेण्याचे टाळले. अन्यथा एक देश व एक निवडणुकीसाठी कंबर कसलेल्या दैवी अवताराला हरयाणाच्या बरोबरीने महाराष्ट्र आणि झारखंडची निवडणूक घेण्यास हरकत नव्हती. परंतु यशाची खात्री नसल्याने त्यांनी महाराष्ट्र व झारखंडच्या निवडणुका हरयाणा व जम्मू-काश्मीरबरोबर घेण्याचे टाळले. यावरुनच त्यांच्या गमावलेल्या आत्मविश्वासाची खात्री पटते. त्याचबरोबर एक देश एक निवडणूक यासाठीचा या दैवी अवताराचा आग्रह किती खोटा आणि ढोंगीपणाचा आहे हेही या खोटारडेपणावरुन दिसून येते. मतदारांनी देखील हा खोटारडेपणा ओळखण्याची वेळ आली आहे.

**दुर्दैवाने मोदी आता खेळ्या करण्याच्या अवस्थेत राहिलेले नाहीत. पंतप्रधान म्हणून त्यांनी आतापर्यंत केलेले तीन प्रमुख निर्णय त्यांना माघारी घ्यावे लागले आहेत. त्यामध्ये भारतीय प्रशासकीय सेवेला (आयएएस) डावलून नोकरशाही म्हणजेच प्रशासनात थेट सरकारला अनुकूल असलेल्या अधिकाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय त्यांना मागे घ्यावा लागला. प्रसारण सेवा नियमन विधेयक देखील त्यांना मागे घ्यावे लागले आणि वक्फ बोर्डाचे विधेयकही त्यांना संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याची पाळी आली. थोडक्यात मोदी-शहा जोडगोळीला आता त्यांच्या अपंगत्वाची जाणीव होऊ लागली आहे.**

गेल्या काही काळातील घडामोडींवर नजर टाकली असता या जोडगोळीची सद्दी संपण्यास सुरुवात झाल्याचे स्पष्ट दिसून येते. या जोडगोळीच्या जुलमी आणि अत्याचारी व मनमानी कारभाराला त्यांच्या पक्षातलेच लोक कंटाळले असल्याचे दिसून येते. गेली दहा वर्षे या जोडगोळीने हम करे सो कायदा या एककल्लीपणे पक्षाबाबत निर्णय केले. सरकारमधील निर्णयही केले. परंतु अति तेथे माति हा नियम या जोडगोळीच्या लक्षात आला नसावा. सातत्याने या जोडगोळीने आपलाच हेका चालविल्याने त्यांच्याच पक्षातले निष्ठावंत आता त्यांच्या विरोधात उभे ठाकताना दिसू लागले आहेत. या जोडगोळीने गेल्या दहा वर्षात वेगवेगळे पक्ष फोडण्याचा सपाटा लावला होता आणि या बाहेरच्या पक्षातील फुटीर व गद्दारांची त्यांनी भाजपमध्ये खोगीरभरती केली. आता या बाहेरुन आलेल्या लोकांना सामावून घेण्यासाठी आणि त्यांनी पुन्हा बंडखोरी करु नये यासाठी या जोडगोळीने त्यांना तिकिटवाटपात झुकते माप देण्यास सुरुवात केली. यामुळे निष्ठावंत भाजप कार्यकर्ता बिथरणे अपेक्षित होते. परंतु सुरुवातीच्या काळात या जोडगोळीची पक्षात व पक्षाबाहेर दहशत होती. त्यामुळे निष्ठावंत अन्याय होऊनही तो निमूटपणे सहन करीत असत. परंतु २०२४च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी या जोडगोळीला अशी काही झणझणीत चपराक मारली की त्यांच्यासमोर तारे चमकले आहेत. तरी गुर्मी कायम आहे. त्यामुळे जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी तिकिटवाटप करताना या जोडगोळीने त्यांच्या चमच्यांना तसेच बाहेरुन आयात केलेल्या फुटीरांना तिकिटे देण्याची नेहमीची पध्दत अवलंबिली. परिणामी जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील राज्यातच यांच्या पक्षात बंडखोरी झाली. ती इतकी की अनेक निष्ठावंतांनी राजीनामे देऊन टाकले. यानंतर बहुधा या जोडगोळीची गुर्मी थोडीफार उतरली असावी. या जोडगोळीला प्रथमच पक्षाच्या खऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या संतापापुढे माघार घेणे भाग पडले. जाहीर केलेल्या उमेदवारांची यादी मागे घ्यावी लागली. त्यानंतर या यादीत अपेक्षित फेरफार करुन ती जाहीर करण्यात आली.

हे एक उदाहरण झाले. हरयाणातही या जोडगोळीला निष्ठावंतांच्या मागण्यांनी हैराण होण्याची पाळी आली. हरयाणात निवडणुकीची प्रक्रिया सुरु असतानाच तेथील एक कट्टरपंथी भाजपनेते अनिल विज यांनी भाजपला बहुमत मिळाल्यास ते मुख्यमंत्रीपदावर दावा ठोकणार असे जाहीर करुन टाकले. हरयाणात देखील भाजपने काही फुटीरांना तिकिटे देताना पक्षातल्याच काहीजणांवर अन्याय केल्याचे आता उघडकीस आले आहे. आठ विद्यमान आमदारांना तिकिटे नाकारुन भाजपने बाहेरुन आलेल्यांना तिकिटे दिली आहेत. एक मंत्री रणजित चौटाला यांनाही तिकिट नाकारले.



# गमावलेला आत्मविश्वास, निसटती पकड, संपलेली सद्दी

**अनंत बागाईतकर**

आता या सर्वांनी भाजपला रामराम ठोकून बंडखोरी करुन निवडणूक लढविण्याचे ठरविले आहे. यातील दोघे काँग्रेसमध्ये गेले आहेत. ज्या नव्या बाहेरच्या आठजणांना भाजपने तिकिटे दिली आहेत त्यांच्या मध्ये बलात्कारी व खुनी बाबा रामरहीम याला तुरुंगातून सहा ते सात वेळा पॅरोल देणारा जेलर सुनील सांगवान याचा समावेश आहे. आताही निवडणुकीच्या निमित्ताने या खुनी व बलात्कारी रामरहीमला सोडण्यात आले आहे. आता तो कुणाचा प्रचार करणार हे सांगण्यासाठी भविष्यवेत्त्याची गरज नाही. लोकसभा निवडणुकीच्या वेळीही या रामरहीम नावाच्या गुंड बाबाला सोडण्यात आले होते आणि त्याने भाजपसाठीच प्रचाराचे काम केले. मात्र त्याचा उपयोग होऊ शकला नव्हता. आता विधानसभा निवडणुकीच्या वेळी हा खुनी व बलात्कारी बाब काय चमत्कार घडवतो ते पहावे लागेल. या उदाहरणांवरुन हे लक्षात येईल की निवडणुकीतील विजयासाठी भाजपची ही जोडगोळी किती खालच्या थरापर्यंत जाऊ शकते हे लक्षात यावे.

या जोडगोळीला पक्षाच्या पातळीवरही चांगलाच विरोध सुरु झाला आहे. त्यामुळे दोघेही चांगलेच अस्वस्थ आहेत. विशेषतः पक्षाची पालक संघटना रा.स्व.संघाने या जोडगोळीला काहीसा लगाम लावण्याचे ठरविले असावे. कारण या दोघांची मनमानी रोखण्यासाठी आता संघाने पक्षाध्यक्षपदी त्यांचा माणूस असावा असा आग्रह धरल्याचे समजते. दिल्लीत यासंदर्भात सुरु असलेल्या चर्चेनुसार नरेंद्र मोदींचे कट्टर विरोधक व प्रतिस्पर्धी आणि संघांचे एक ज्येष्ठ नेते संजय जोशी यांच्या



नावाची भाजपचे संभाव्य अध्यक्ष म्हणून चर्चा सुरु आहे. संजय जोशी यांचे नाव कानावर पडले तरी मोदी यांना इंगळ्या डसत असतात. आता हे संजय जोशी कोण हे प्रथम समजून घ्यावे लागेल. संजय जोशी हे कट्टर संघ प्रचारक आहेत. संघाने प्रचारक आणि संघटक म्हणून त्यांच्याकडे गुजरातची जबाबदारी दिली होती. गुजरातमध्ये भाजपची सत्ता येण्यापूर्वीचे ते दिवस होते. त्यामुळे संजय जोशी यांनी भाजपच्या व संघाच्या प्रचार प्रसारासाठी रात्रंदिवस कष्ट घेतले होते. त्यावेळी मोदी हे फारच कनिष्ठ होते. परंतु गुजरातमध्ये भाजपची पाळेमुळे रोवण्याचे आणि भाजपला जे चांगले दिवस आले त्यासाठीची राजकीय मशागत करण्याचे श्रेय संजय जोशी यांना दिले जाते. त्यावेळी मोदी यांचे जोशी यांच्याबरोबर मैत्रीसंबंध होते. परंतु राजकीय महत्वाकांक्षेपेक्षा राजकीय लालसेने पेटलेल्या मोदींना संजय जोशी यांचा गुजरातमध्ये अडसर वाटू लागला होता. केशुभाई पटेल यांच्यानंतर मुख्यमंत्रीपद आपल्याला मिळावे म्हणून त्यांनी




जी राजकीय फील्डिंग लावण्यास सुरुवात केलेली होती त्यामध्ये संजय जोशी यांचा अडसर दूर करणे याला सर्वोच्च प्राधान्य होते. संजय जोशी यांचा काटा काढायचा कसा यासाठी मोदी आणि त्यांचे साथीदार योजना आखू लागले होते. हे काम काळजीपूर्वक करावे लागणार होते कारण संजय जोशी यांची गुजरातमधील भाजप व संघ परिवारात अत्यंत मोठी लोकप्रियता होती. ती लोकप्रियताच नष्ट करण्यासाठी डाव टाकण्याचे ठरविण्यात आले.

संजय जोशी हे एक आदर्श संघ प्रचारक मानले जात. मोदींची आणि त्यांची मैत्री असली तरी दोघांचे स्वभाव भिन्न होते. मोदींना छानछोकी आणि जगातल्या सर्व उत्कृष्ट गोष्टींचे वेड आहे. कपडे, पादत्राणे आणि झकपक राहणीमानाची त्यांना विलक्षण आवड आहे. संजय जोशी हे बरोबर उलट्या स्वभावाचे आहेत. एवढ्या मोठ्या पदावर राहूनही ते रेल्वेच्या साधारण वर्गातूनच प्रवास करीत असत आणि अत्यंत साधी व संन्यस्त राहणीमानाची आवड असलेले ते आहेत. त्यांच्यात आणि मोदींमध्ये मूलभूत फरक हा की ते अत्यंत मितभाषी आहेत. केवळ अत्यंत निकटच्या विश्वासू वर्तुळातच ते खुलतात. तसेच प्रसिध्दीपासून आणि झगमगाटापासून शेकडो मैल दूर राहणारा



हा माणूस आहे. याउलट मोदी आहेत हे भारत अनुभवत आहे. प्रसिध्दीची, प्रसिध्दीच्या प्रकाशझोताची हव्यास व लालच असलेला हा माणूस आहे. आजुबाजुला चापलूस साथीदार असतील तर मग विचारायलाच नको. त्यामुळेच मोदींना जोशी यांचा अडसर वाटणे स्वाभाविक होते. केशुभाई यांच्यानंतर मुख्यमंत्रीपद मिळाल्यानंतर संघ आणि भाजपने जोशी यांना राष्ट्रीय पातळीवरील संघटन सचिवपदी नियुक्त केले. याला काही कारणे होती. संजय जोशी यांनी मोदी यांना मुख्यमंत्री करण्यास विरोध केला होता. मोदी हे संघप्रणित विचारसरणीनुसार काम न करणारे नेते असल्याचे त्यांनी भाजप श्रेष्ठींना सांगितलेले होते. परंतु त्यावेळी त्यांची शिफारस विचारात घेण्यात आली नव्हती. परंतु मोदी यांना मुख्यमंत्रीपद दिल्यास जोशी यांच्याकडे गुजरातची जबाबदारी कायम राखणे शक्य होणार नाही कारण त्यामुळे राज्यात दोन सत्ताकेंद्रे तयार होतील तसेच दोघेही एकमेकांच्या विरोधात असल्याने राज्यात संघर्ष निर्माण होईल हे लक्षात घेऊन संजय जोशी यांना राष्ट्रीय पातळीवर जबाबदारी देण्यात आली आणि गुजरातमधून बाहेर काढण्यात आले होते. परंतु जोशी यांना मानणारे असंख्य स्थानिक कार्यकर्ते आणि नेते गुजरातमध्ये होते आणि त्यांच्याकडून जोशी यांना सर्व माहिती मिळत असे. आपल्या साध्या राहणीने आणि प्रसिध्दीच्या झोतापासून लांब राहण्याच्या सवयीमुळे जोशी यांनी सामान्य कार्यकर्त्यांमध्ये विलक्षण मोठे स्थान प्राप्त केले होते आणि त्यांच्याकडून त्यांना देशातल्या सर्व मोठमोठ्या भाजप नेत्यांबद्दलची माहिती मिळत असे. यामुळेच बड्याबड्या प्रस्थापित भाजप नेत्यांना संजय जोशी यांची धास्ती वाटायला लागली होती. हा अडसर किंवा संभाव्य धोका दूर करणे हाच या मंडळींसमोर एकमेव पर्याय होता आणि त्या दृष्टीने ते कामाला लागले. २००५ मध्ये भाजपच्या रौप्यमहोत्सवानिमित्ताने मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सवर झालेल्या महाअधिवेशनात संजय जोशी आणि एका महिलेमधील शृंगारिक संभाषणाच्या टेप्सची कॅसेटच भाजपच्या जमलेल्या प्रतिनिधींमध्ये वितरित करण्यात आली. तसेच एक दोन महिलांबरोबरच्या त्यांच्या काही दृष्यांची सीडी देखील अधिवेशनात वाटण्यात आली होती. यामागे कुणाचा हात होता हे ओळखायला भविष्यवेत्त्याची किंवा फार मोठी बुध्दी असण्याची गरज नाही. या दोन्ही महिलांनी आठदहा दिवसांनंतरच या सीडीचा इन्कार केला आणि त्या देखील रा.स्व.संघाशी निगडित कुटुंबातील असून त्यांच्याकडे जोशी यांची येजा असल्याचे सांगितले. जोशी हे आदरणीय व्यक्ती असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान मागाहून मिळालेल्या माहितीनुसार जोशींना बदनाम करण्यासाठी सापळा लावून हे प्रकार करण्यात आल्याचे समजले. त्याचबरोबर संबंधित महिलांना गप्प राहण्यासाठी चांगल्या नोकऱ्यांची वगैरे आमिषेही दिली गेल्याची माहिती निष्पन्न झाली होती. थोडक्यात संजय जोशी यांना बदनाम करण्यासाठी भाजपमधील त्यावेळी उदयोन्मुख असलेल्या नेत्यांना त्यांचा अडथळा वाटू लागल्याने त्यांनी एकप्रकारे कारस्थान करुनच जोशी यांचा काटा काढला ही माहिती विश्वासार्ह वाटू लागली आहे.

जोशी यांना या अधिवेशनातच बडतर्फ करण्यात आले. परंतु त्यांच्या चारित्र्याची खात्री असलेल्यांनी हा बनाव असल्याचे म्हणण्यास सुरुवात केली. परंतु मुद्दाम होऊन हा प्रकार जगजाहीर करण्यामुळे जोशी यांनी मुकाट्याने माघार घेण्याचे ठरविले. त्यांनी राजीनामा दिला व ते दिल्लीला राजधानी एक्सप्रेसने निघाले. परंतु त्यावेळी मिळालेल्या माहितीनुसार आक्रमक नरेंद्र मोदींनी त्यांना राजधानी एक्सप्रेसने दिल्लीला जाण्यास मज्जाव केला. जोशींना जबरदस्तीने विमानाने दिल्लीला पाठविण्यात आले. कारण राजधानी एक्सप्रेस गुजरातमार्गे जात असल्याने जोशींचे तेथे स्वागत झाले आणि त्यांच्या सहानुभूतीदार कार्यकर्त्यांनी गोंधळ केला तर त्याची बातमी व्हायला नको या धास्तीने मोदी व त्यांच्या साथीदारांनी जोशींना राजधानीऐवजी विमानाने जाण्यास भाग पाडले होते. मोदींना जोशींची ॲलर्जी किती असावी याची आणखी एक घटना २०११-१२ मध्ये घडली. उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीसाठी त्यावेळचे भाजप अध्यक्ष नितिन गडकरी यांनी संजय जोशी यांना उत्तर प्रदेशात सक्रिय होऊन मदत करण्याची विनंती केली होती. त्यानुसार जोशी सक्रिय झाले. परंतु गुजरातचे मुख्यमंत्री असलेल्या मोदींना ते रुचले नाही. त्यांनी चक्क उत्तर प्रदेश निवडणुकीच्या प्रचारात सहभागी होण्याचे नाकारले. त्यांनी



भाजपचा प्रचार केला नाही. त्या निवडणुकीत भाजपला सत्ता मिळाली नाही आणि त्याचे भांडवल करुन मोदींनी पुन्हा एकदा संजय जोशी यांच्याविरुध्द रान उठवून त्यांना भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतूनही राजीनामा देण्यास भाग पाडले होते. मोदींमध्ये खुनशीपणा किती काठोकाठ भरला आहे याचे हे उदाहरण आहे. २०२४ मध्ये भाजपला बहुमत देखील मिळू शकलेले नाही त्यावेळी मोदींनी हरण्याची जबाबदारी का स्वीकारली नाही आणि उलट कोडगेपणाने पंतप्रधानपदावर ते आरूढ का झाले असा प्रश्न कुणी त्यांना विचारला तर त्यांना इंगळ्या डसतील. परंतु त्यांच्या भयाने अनेकजण बोलण्यास धजावत नाहीत.

परंतु इतिहासातील भुते भविष्यात तुम्हाला कधी ना कधी पछाडायला लागतात. तसेच आता मोदी-शहा जोडगोळीचे होऊ लागले आहे. रा.स्व.संघाने २०२४च्या निवडणुकीत आखडता हात घेतला. त्यानंतर देखील त्यांनी मोदींच्या काही निर्णयांना विरोध करुन वेगळी भूमिका घेतली. मोदींच्या अनेक वादग्रस्त दाव्यांबाबत (आपण दैवी अवतार असणे वगैरे) रा.स्व.संघाने जाहीरपणे विरोधाची भूमिका घेतलेली आढळते. त्याचबरोबर संघ विचारसरणी अनुसरणाऱ्या मंडळींना प्रमुख स्थान मिळणे आवश्यक आहे कारण पक्ष वाट चुकत असल्याचे स्पष्टपणे संघातर्फे सूचित करण्यात आले आहे. त्यामुळेच आता भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांचे पद रिकामे होणार असल्याने त्या पदावर संघ विचारसरणीशी एकनिष्ठ असलेल्या व्यक्तीची निवड केली जावी असा आग्रह संघातर्फे धरला जात आहे. सध्याचे अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा हे मुदतवाढ मिळाल्याने त्या पदावर आहेत. परंतु त्यांची मुदत किती वाढविणार हा प्रश्न आहे आणि त्यामुळेच आता मोदी-शहा जोडगोळीवर संघ विचारसरणी अनुसरणाऱ्या व्यक्तीची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करण्यासाठी दबाव येऊ लागला आहे. त्यामुळेच जोडगोळी विलक्षण अस्वस्थ आहे. वरील पार्श्वभूमि समजल्यानंतर आता पुन्हा अनेक वर्षांनंतर राजकीय वनवासात असलेल्या संजय जोशी यांच्याकडे भाजपचे अध्यक्षपद दिले जावे अशी चर्चा सुरु झाल्यानंतर जोडगोळीची झोप उडणे स्वाभाविकच आहे. मध्य प्रदेशातील भाजप वर्तुळातून संजय जोशी यांचे नाव अध्यक्षपदासाठी पुढे केले जात असल्याची माहिती मिळते. मात्र ज्या कुणी हे नाव चालविले आहे त्या वर्तुळास या जोडगोळीच्या दुखऱ्या नसा चांगल्या माहिती आहेत आणि त्यामुळेच आता हे नाव पुन्हा चर्चेत आणण्यात आले आहे आणि त्यामुळेच जोडगोळी देखील या प्रकारामुळे हैराण आहे. कारण त्यांच्या एककल्ली आणि हुकमुशाही कार्यपध्दतीच्या विरोधातच कुणीतरी हा प्रकार जाणीवपूर्वक केलेला आहे याची जाणीव त्यांना निश्चितपणेच आहे. परंतु आता ते निर्णायक आणि हुकुमशाही करण्याच्या स्थितीत नसल्याने त्यांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे. आता त्यांच्या शेवटाची ही सुरुवात असल्याचे वाटू लागले आहे.



या पार्श्वभूमीवरच केंद्रीय रस्ते व महामार्गमंत्री नितिन गडकरी यांनीही धाडसी विधाने करण्यास सुरुवात केलेली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात गडकरी हे थेट संघाचे प्रतिनिधी असल्याचे मानले जाते. किंबहुना संघाच्या पाठबळामुळेच ते त्यांचे मंत्रिपद टिकवून आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. परंतु गडकरी यांनी आता जाहीरपणे सरकारच्या कामकाज पध्दतीवर देखील टीकाटिप्पण्या करण्यास सुरुवात केली आहे. अलीकडच्या काळात त्यांनी सरकारला (म्हणजे कुणाला हे सांगण्याची गरज नाही) घरचाच आहेर देताना लोकांना मूर्ख समजू नका आणि बनवूही नका असा जाहीर सल्ला दिला. आणखी एका कार्यक्रमात त्यांनी त्यांना पंतप्रधानपदाचा प्रस्ताव करण्यात आल्याचे गुपितही सांगितले. मोदींच्या मंत्रिमंडळातला सहकारी अशी विधाने करण्याचे धाडस कसे करतो हा प्रश्न पडू शकतो पण त्यांनी ते धाडस केले आहे.

या सर्व घडामोडी घडत असताना या जोडगोळीने पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी मध्य प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री व आता केंद्रात कृषिमंत्री असलेल्या शिवराजसिंग चौहान यांचे नाव सुचविण्याचा प्रयत्न केला परंतु संघाने ते नाव अमान्य केल्याचे समजते. चौहान यांनी केंद्रात गेल्यानंतर मोदींची ज्या पध्दतीने चापलुसी करण्यास सुरुवात केली आहे ती पाहता संघाने नाराज होऊनच त्यांच्या नावावर फुली मारल्याचे समजते. मोदींशी संघर्षाची भूमिका अपेक्षित नसली तरी संघ विचारसरणीशी सुसंगत आणि सरकारपासून स्वतंत्र अशी भूमिका घेणारा अध्यक्ष असावा अशी संघाची अपेक्षा असल्याचे कळते. असे सांगण्यात येते

की संघाने उघडउघड आता मोदी-शहा जोडगोळीच्या विरोधात भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसारच त्यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांचेही नाव सुचविण्यात आल्याची माहिती मिळत आहे. संघ आणि मोदी-शहा जोडगोळी दरम्यानचे संबंध फारसे सुखकारक राहिलेले नाहीत ही काही फारशी लपून राहिलेली बाब नाही. गडकरी ज्या खुलेपणाने बोलू लागले आहेत ते पाहता त्यांना संघनेतृत्वाकडून काही संदेश देण्यात आला असावा असे अनुमान काढण्यास जागा आहे. त्यामुळे कदाचित गडकरींचे नाव देखील पक्षाध्यक्षपदासाठी पुढे येऊ शकेल आणि ते तसे आल्यास कुणाला आश्चर्य वाटायला नको. याठिकाणी हेही नमूद करायला लागेल की गडकरी हे पक्षाध्यक्ष होते आणि त्यांच्याकडेच दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची जबाबदारी कायम ठेवण्याचे ठरलेले असताना कटकारस्थाने करुन त्यांचे अध्यक्षपद काढून घेतले गेले होते. गडकरी यांच्याकडे अध्यक्षपद कायम ठेवण्याचे स्पष्ट झाल्यानंतर लगेचच काही हितसंबंधी मंडळींनी त्यावेळच्या काँग्रेस सरकारमधील मित्रांच्या मदतीने गडकरी यांच्या पूर्ति संस्थेवर आर्थिक गैरव्यवहाराची कारणे दाखवून छापे टाकण्याचा प्रकार केला होता. त्या वादामुळे त्यांना अध्यक्षपद सोडावे लागले. मग त्यांच्याजागी मोदींसमोर गुडघेटेकू असलेल्या राजनाथसिंग यांना पुन्हा अध्यक्ष करण्यात आले. त्यानंतर राजनाथसिंग यांना केंद्रीय मंत्रीपद देऊन मोदींचे साथीदार अमित शहा यांना पक्षाध्यक्ष करण्यात आले होते. ही घडामोडींची मालिका पाहूनच मोदी त्यांना अनुकूल असलेल्या व्यक्तीच त्यांच्या आजुबाजुला कशा राहतील हे पहात असतात आणि त्यानुसारच खेळ्या खेळत राहतात हे लक्षात येईल.




दुर्दैवाने मोदी आता खेळ्या करण्याच्या अवस्थेत राहिलेले नाहीत. पंतप्रधान म्हणून त्यांनी आतापर्यंत केलेले तीन प्रमुख निर्णय त्यांना माघारी घ्यावे लागले आहेत. त्यामध्ये भारतीय प्रशासकीय सेवेला (आयएएस) डावलून नोकरशाही म्हणजेच प्रशासनात थेट सरकारला अनुकूल असलेल्या अधिकाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय त्यांना मागे घ्यावा लागला. प्रसारण सेवा नियमन विधेयक देखील त्यांना मागे घ्यावे लागले आणि वक्फ बोर्डाचे विधेयकही त्यांना संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याची पाळी आली. थोडक्यात मोदी-शहा जोडगोळीला आता त्यांच्या अपंगत्वाची जाणीव होऊ लागली आहे.

लोकसभेत भाजपलाच पूर्ण बहुमत नसल्याने त्यांना पाठिंब्यासाठी इतर राजकीय पक्षांच्या कुबड्या घ्याव्या लागल्या आहेत. त्यामुळे त्यांना मनमानी कारभार करणे फारसे सोपे राहिलेले नाही. त्याचबरोबर विरोधी पक्ष एकजूट आणि मजबूत असल्यानेही सरकारला त्यांची दखल न घेता बेमुर्वतखोरपणा करणे पहिल्यासारखे सोपे राहिलेले नाही. आता विरोधी पक्षांचे म्हणणे देखील त्यांना ऐकणे भाग पडू लागले आहे.

एकीकडून पालकसंस्था रा.स्व.संघाचा दबाव, सरकारमध्ये काम करताना पूर्ण बहुमताअभावी आलेले राजकीय अपंगत्व आणि दिवसेंदिवस जनतेमध्ये घसरत चाललेली प्रतिमा अशा चक्रात ही जोडगोळी सापडलेली आहे. त्यांना या चक्रातून सुटका करुन घेण्याचा मार्ग सापडेनासा झाला आहे. दरवेळी विरोधी पक्ष हे पाकिस्तानचे हस्तक आहेत अशी टीका करुन मोदी-शहा चेष्टेचा विषय होत चालले आहेत. सरकारवरही त्यांची अपेक्षित पकड राहिलेली नाही. बांगला देशात ज्या पध्दतीने सत्तांतर झाले त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्या ते जगातले महान सुरक्षा तज्ञ असल्याच्या दाव्याच्या चिंधड्या उडाल्या आहेत. बांगला देशातील घटनांची पूर्वकल्पना किंवा पूर्व अनुमान करण्यात भारतीय गुप्तचर संस्था अपयशी ठरल्या हे आता जगजाहीर झाले आहे. चीनने बळकावलेला पूर्व लडाखमधील टापू परत मिळविण्याबाबतच्या वाटाघाटी अजुन चालूच आहेत. त्यामुळे आता या जोडगोळीचे सार्वत्रिक अपयश हे लोकांसमोर स्पष्टपणे दिसू लागले आहे. छातीठोक साहसवादाच्या यांच्या गोष्टी म्हणजे निव्वळ वल्गना आणि बोलघेवडेपणा असल्याचे लोकांच्या लक्षात यायला लागले आहे. त्यामुळेच आता महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यातली सत्ताही हातून गेल्यास यांच्या राजकीय दुर्गतीला पारावार राहणार नाही. त्यामुळेच या जोडगोळीची महाराष्ट्रात काहीही कारस्थान करुन सत्ता हस्तगत करण्याचे मनसुबे चालू झालेले आहेत. परंतु तुम्ही जे पेरता तेच उगवते. भाजपने देशात जागोजागी गद्दारी, फुटीरता यांची बीजे पेरली आणि आता त्या बीजांना फळे येऊन ती भाजपच्या घशात अडकू लागली आहेत. ज्याप्रमाणे इतर राज्यांमध्ये निष्ठावंतांना डावलून या जोडगोळीने पक्षाचा पराभव ओढवून घेतला त्याचीच पुनरावृत्ती ते महाराष्ट्रात करु पहात आहेत. एकदा ठेच लागूनही त्यांना शहाणपण आलेले नाही. त्यामुळे मतदारच या जोडगोळीला घडा शिकवतील हे निश्चित.

■■



गेल्या अडीच वर्षांहूनही अधिक काळ रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध चालू आहे. तर इकडे पश्चिम आशियामध्ये इस्त्रायल व अरब (पॅलेस्टाइन) यांच्यातील नरसंहारालाही एक वर्ष होत आले आहे. भारताचे पंतप्रधान नरेन्द्र मोदी आपल्या रशिया भेटीनंतर युक्रेनचाही दौरा करून आले आहेत तर अमेरिकेसह पाश्चात्य राष्ट्रे युद्धसमाप्तीसाठी इस्त्रायलवर दडपण आणत आहेत. युद्ध विरामाची शक्यता तर दोन्हीकडे वर्तवली जाते आहे. खरोखरच होईल का ही युद्धसमाप्ती? का हे भाकित केवळ मृगजळच ठरेल?



# गाझापासून युक्रेनपर्यंतचा नरसंहार

प्रभाकर खोले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी म्हणजे जुलै २०२४ मध्ये मॉस्कोचा दौरा करून रशियाचे अध्यक्ष पुतिन यांची भेट घेतली. भारताचा जुना मित्र रशियाशी लष्करी व व्यापारी करार करून मोदी पुतिन यांची गळाभेट घेत असतानाच तिकडे रशियन लढाऊ विमाने युक्रेनमध्ये रुग्णालयावर बॉम्बहल्ले करत होती आणि त्यात कित्येक लहान मुले मृत्युमुखी पडली. मोदी-पुतिन भेटीच्या पार्श्वभूमीवर रशियन विमानांनी केलेल्या



या अमानुष कृत्याचे पडसाद जगभर उमटले. विशेषतः रशियावर आर्थिक निर्बंध व बहिष्कार घालणारी अमेरिका व इतर पाश्चात्य राष्ट्रांनी सडकून टीका केली तर युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी तर याची एक मानवताविरोधी कृत्य म्हणून संभावना केली.

सुमारे सव्वाचार कोटी लोकसंख्या आणि सहा लाख वर्ग किलोमिटरहूनही अधिक क्षेत्रफळ असलेला युक्रेन हा युरोपमधील (रशियानंतर) दुसऱ्या क्रमांकाचा दुसरा देश. १९९१ च्या अखेरीस पूर्वीच्या सोव्हिएत युनियनमधून (गोर्बाचोव्ह यांच्या कृपेने) बाहेर पडून स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्माण व घोषित झालेल्या युक्रेनचे सोव्हिएत युनियनचे उत्तराधिकारी असलेल्या रशियाशी (रशियन फेडरेशन) कधीच पटले नाही. युक्रेनच्या तिप्पट म्हणजे एक कोटी ७१ लाख वर्ग किलोमीटर एवढ्या आकाराच्या (जगात सर्वात) मोठ्या रशियाची लोकसंख्याही युक्रेनच्या तिपटीहून जास्त म्हणजे साडेचौदा कोटी आहे. आणि युक्रेनमधील रशियन नागरिकांच्या हितसंबंधांच्या रक्षणाच्या नावाखाली रशियाकडून युक्रेनच्या कुरापती काढणे सतत चालू आहे.

## क्रिमियामधील आक्रमण

या डावपेचांचाच एक भाग म्हणून काही वर्षांपूर्वी युक्रेनच्या क्रिमिया या प्रांतावर आक्रमण करून रशियाने तो ताब्यात घेतल्या. त्यामागे ओडेसा हे बारमाही बंदर ताब्यात घेण्याचा हेतू होताच, परंतु तेथील रशियनांना रशियामध्ये परत यावयाचे आहे. हे कारणही पुढे गेले होते. क्रिमिया गिळंकृत केल्यावर रशियाने तेथील नागरिकांना रशियन नागरिकत्व आणि रशियाचे पासपोर्ट देणेही सुरू केले.

अर्थात ही बाब अमेरिकाप्रकृती पाश्चात्य राष्ट्रांना रुचली नाही, तसेच युक्रेनला ही पचनी पडली नाही. भारत तेव्हाही तटस्थ राहिला व भारताने तेव्हाही रशियन आक्रमणाचा निषेध केला नाही वा रशियाविरोधी ठरावाच्या बाजूने मतदान केले नाही. मात्र त्यानंतर युक्रेनच्या झेलेन्स्की सरकारने युरोपियन युनियन या युरोपच्या आर्थिक महासंघात तसेच अमेरिकेच्या अधिपत्याखालील 'नाटो' (नॉर्थ अॅटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन) या लष्करी संघटनेमध्ये प्रवेश घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या. आपल्या थेट सीमेवर नाटोसारखी पाश्चिमात्य लष्करी संघटना युक्रेनमध्ये येऊन बसणे रशियाला मूळीच मानवणारे



नव्हते. युक्रेनच्या नाटोप्रवेशाच्या विरुद्ध रशियाने अनेक वेळा इशारे दिले, धमक्याही दिल्या परंतु त्यांना दाद न देता युक्रेन व पाश्चात्य राष्ट्रांनी आपले उद्योग चालूच ठेवले आणि ते निमित्त पुढे करून रशियाने फेब्रुवारी २०२२ मध्ये युक्रेनविरुद्ध सर्वंकष युद्ध पुकारले.

## युद्धात दोघांचीही अपरिमित हानी

तीस महिन्यांहूनही अधिक काळ चाललेल्या या युद्धामध्ये दोन्ही देशांची अपरिमित हानी आणि फार मोठ्या प्रमाणावरती विध्वंस झाला आहे. एकट्या रशियाचे नव्वद हजारावर सैनिक (अदिकृतरित्या) मारले गेले असून युक्रेनचा आकडाही तेवढाच मोठा आहे. तोफा, रणगाडे, चिलखती वाहनांसह जमिनीवर आणि अत्याधुनिक लढाऊ विमानांच्या अविरत बॉम्ब हल्लानंतर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे आकाशातून

चाललेल्या या अग्निवर्षावामध्ये दोन्ही देशातील नागरी वस्त्या, शाळा, इस्पितळे, इमारती असे सर्व बेचिराख झाले असून हजारो नागरिक, विशेषतः स्त्रिया, वयस्क व बालके जिवाला मुकली आहेत. लाखो नागरिक बेघर झाले आहेत.



दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडल्या असून अमेरिकेच्या आर्थिक (व लष्करी) मदतीवर युक्रेन तग धरून आहे. अमेरिका व पाश्चात्य देशांच्या आर्थिक निर्बधांमुळे रशियाचीही आर्थिक नाकेबंदी झाली आहे. खनिज तेल व नैसर्गिक गॅस हा रशियाच्या निर्यातीचा फार मोठा भाग आहे. त्यावरच बंदी आल्याने (त्याचा फटका पश्चिम युरोपलाही बसत असला तरी) रशियन अर्थव्यवस्था मदांवली आहे. (अर्थात रशियाकडून स्वस्तात कच्चे तेल आणि गॅस खरेदी करून भारताने त्याचा फायदा उठवला आहे, तसाच चीननेही!) रशियाची अर्थव्यवस्था डबघाईला येण्याचे आणखी एक मोठे कारण म्हणजे शस्त्रास्त्रविक्रीत झालेली प्रचंड घट. एक म्हणजे रशियातील शस्त्र व दारूगोळा निर्मिती कारखाने हे निर्बंध व कच्च्या मालाच्या अभावाने थंडावले आहेत, तर विमाने, रणगाडे, जहाजे यांच्या निर्मितीस लागणारी इंजिने व सुटे भाग तयार करणारे कारखाने युक्रेनमध्ये असल्याने तेथून होणारा पुरवठा ठप्प झाला आहे.

याची झळ भारतालाही लागली आहे. भारतीय सैन्यदले अजूनही ६५.७० टक्के रशियन बनावटीच्या सामुग्रीवर अवलंबून आहेत व त्यातले महत्त्वाचे भाग तयार करणारे कारखाने युक्रेनमध्येच आहेत. त्यामुळेच भारतीय सैन्य व हवाई दलाच्या विमानांना व इतर यंत्रसामुग्रीला लागणारी इंजिने व सुटे भाग यांचा पुरवठा थांबला आहे. याचा विपरीत परिणाम भारतीय सैन्याच्या कार्यक्षमतेवर व युद्धतयारीवर होऊ लागला आहे. (मोदींच्या युक्रेन भेटीमध्ये या पुरवठ्यावरही चर्चा झाली अशी वार्ता आहे.)

## अमेरिकन शस्त्रास्त्रे वरचढ ?

युक्रेनच्या मदतीला अमेरिकन आर्थिक सहाय्य तर आहेच परंतु आधुनिक अमेरिकन शस्त्रास्त्रे विमाने, ड्रोन व इतर सामुग्रीही येत आहे. त्याच्या जोरावर प्रतिचढाई करून युक्रेनने रशियाचा काही भूभागही व्यापला आहे. रशियाने ड्रोन व क्षेपणास्त्रे यांसह केलेल्या हल्ल्यामध्ये अमेरिकन एफ-१६ या आधुनिक विमानांनी कारवाई करून अनेक क्षेपणास्त्रे व ड्रोन उध्वस्त केली. त्यामुळे रशियाच्या चढाईला चांगलीच खीळ बसली. आता तर ही विमाने युक्रेनला रशियाच्या भूभागामध्ये खोलवर आक्रमण करण्यासाठी व हल्ल्यांसाठी वापरण्याचीही परवानगी द्यावी अशीही मागणी डेन्मार्क या 'नाटो' च्या सदस्य देशाने अमेरिकेकडे



केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या अमेरिकन विमाने व शस्त्रास्त्रांपुढे रशियन युद्धसामुग्री कमी पडत असल्याचे दिसत असल्याने मग रशियानेही ''जर युक्रेनची विमाने व क्षेपणास्त्रांना रशियात दूरवर हल्ले करायला परवानगी दिली तर मग हे युद्ध फक्त युरोपपुरते मर्यादित न राहता त्याचा प्रसार जगभर होऊन त्याची परिणती तिसऱ्या महायुद्धातही होऊ शकेल,'' असा इशाराही दमछाक झालेल्या रशियाने दिला आहे. दरम्यान, युक्रेनने रशियाची एक पाणबुडी बुडवली, विमानतळ उध्वस्त केले तर तेलसाठेही उडवून लावले.

## भारतीयही युद्धात सामुग्री संपुष्टात

दरम्यान रशियामध्ये सैनिकांचा मोठा तुटवडा युद्धभूमीवर जाणवत असल्याने रशियामध्ये शिक्षण व कामासाठी आलेल्या परकी तरुणांनाही जबरदस्तीने युद्धभूमीवर पाठवले जात असल्याची प्रकरणे निदर्शनाला आली आहेत. भारतामधूनही उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरियाना, राजस्थान, गुजरात आदी राज्यांमधून नोकरीसाठी एजंटांनी रशियात पाठवलेले कामगार तसेच काही विद्यार्थ्यांनाही अशा तऱ्हेने फसवून युक्रेनविरुद्ध लढायला पाठवले गेल्याची उदाहरणे आहेत. त्यांचा आकडाही निश्चितपणे माहिती नाही. पण अशा फसवणूक झालेल्यांना परत आणण्याची मागणी त्यांच्या कुटुंबियांकडून केली जाते आहे. युक्रेन युद्ध सुरु झाले तेव्हा तिथे अडकून पडलेल्या हजारो भारतीय विद्यार्थ्यांना, विशेषतः विद्यार्थी डॉक्टरांना पोलंडमार्गे सुखरुप परत आणण्याचे दिव्य सरकारला पार पाडावे लागले होते. आताही आणखी एक सत्व परीक्षा !

रशियामध्ये असलेल्या इतरही परदेशी मंडळींना भरती करून युद्धात पाठविणाऱ्या घटना घडत आहेत तसेच तिथे काही भाडोत्री सैन्यपथकेही लढाईत उतरली आहेत. युक्रेनतर्फेही फ्रेंच व इतर युरोपीय नागरिक लढत असल्याच्या बातम्या आहेत.

दोन्ही बाजूंना जसा सैनिकांचा आणि त्यातही प्रशिक्षित सैनिकांचा तुटवडा भासतो आहे, तसाच दारुगोळा शस्त्रास्त्रे आणि सुटे भाग यांचाही, अब्जावधींनी लागणाऱ्या विविध प्रकारच्या बंदुकांच्या गोळ्या, तोफगोळे, रणगाड्यांचे गोळे, बॉम्ब, क्षेपणास्त्रे तसेच सुटे भाग अशा प्रत्येक गोष्टीची तीव्र टंचाई तिथे जाणवते आहे. आणि आता शस्त्रास्त्र निर्यातीमध्येही मोठा वाटा असणारा देश म्हणून पुढे येणारा भारतही या निर्यातीमध्ये मोठ्या प्रमाणावर उतरला आहे.

## युद्धबंदी : भारताचा पुढाकार ?

तीस महिन्यांहूनही अधिक काळ चाललेल्या या युद्धाने दोन्ही देशांची पुरती दमछाक झाली आहे. 'काही दिवसात हे युद्ध संपवून टाकू' या हिशोबाने आक्रमण केलेल्या रशियाला युक्रेन चिवट प्रतिकार करत त्वेषाने (इतरांच्या सहाय्याने) प्रतिहल्लेही चढवत आहे. रशियन शस्त्रासामुग्री, विमाने व युद्ध अवजारे व सिद्धतेतील त्रुटी यामुळे उघड्या पडल्या आहेत, तर पाश्चात्य म्हणजे अमेरिकन तंत्रज्ञान फारच वरच्या दर्जाचे असल्याचे सिद्ध झाले आहे. चीन, उत्तर कोरिया याचा टेकू असला तरी रशियन अर्थव्यवस्था दिवाळखोरीमध्ये निघाली आहे. दोन्ही देशांचे प्रचंड नुकसान झाले असून तेल, गॅस, यंत्रसामुग्री व इतर उत्पादने थांबल्याने साऱ्या जगालाच इंधन टंचाई व भाववाढ यांची झळ लागली आहे. स्वतः रशिया आणि युक्रेन हे देश तर कित्येक पिढ्या मागे पडले आहेत. त्यांच्या विस्कळीत





अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्यासाठी आता त्यांना किमान २५ ते ३० वर्षे द्यावी लागतील आणि तीही कोणत्याही युद्धाशिवाय !

रशियाने युक्रेनचा १५ टक्के भूभाग व्यापला आहे तर युक्रेननेही रशियाचा १५०० चौरस किलोमीटर प्रदेश ताब्यात घेतला आहे. शिवाय परस्परांचा फार मोठा प्रदेश दोघांनीही उध्वस्त करून टाकला आहे. त्यामुळेच आता दोन्ही देशांना काही करून हे युद्ध संपुष्टात आणायचे आहे. रशियाचा आक्रमणाचा हेतू काही प्रमाणात साध्य झाला असला तरी युक्रेननेही चिकाटी दाखवत मित्र देशांच्या सहाय्याने उलट प्रतिकाराची चुणूकही दाखवून दिली आहे. हे युद्ध आहे अशा प्रकारे कुणालाच जिंकताच येणार नाही, याबाबत सगळ्या जगासकट दोन्ही देशांची खात्री झाली आहे आणि एकमेकांच्या काही युद्धकैद्यांची देवाणघेवाण करून दोन्ही देशांनी आपली लवचिकता व बदललेली भूमिका जगाला दाखवून दिली आहे.

रशियाचा पूर्वापार मित्र आणि पाश्चात्यांनाही एक लोकशाही देश म्हणून जवळचा वाटणाऱ्या भारताला दोन्ही देशात युद्धविराम घडवून आणण्याची संधी आहे. रशियाचे इतर दोन घनिष्ट मित्र म्हणजे चीन व उत्तर कोरिया. त्यातला चीन हा पूर्णपणे स्वार्थाचे राजकारण करणारा तर उत्तर कोरियामध्ये एकाधिकारशाही आहे. चीन सध्या आर्थिक अस्वस्थतेच्या घेऱ्यात आहे आणि या दोन्ही देशात लोकशाही नाही. त्यामुळे समेटासाठीची मदार भारतावर आहे. मोदी यांनी आपल्या रशिया भेटीमध्ये युद्ध थांबवण्याबाबत नक्कीच चर्चा केली असणार. तसेच कोणत्याही भारतीय पंतप्रधानाने ३१ वर्षानंतर दिलेल्या पहिल्या भेटीमध्ये नरेंद्र मोदी यांनी झेलेन्स्की यांना,



त्याआधी पोलंडच्या पंतप्रधानांना सांगितल्याप्रमाणे केलेल्या ''भारत कोणत्याही पक्षाच्या नव्हे, तर शांततेच्या बाजूने आहे.'' या खुलाशामुळे झेलेन्स्की यांनाही निश्चितच आधार वाटला असणार. याचवेळी मोदी यांनी त्यांच्याबरोबर संरक्षण, व्यापार, उत्पादन वगैरे क्षेत्रांसाठी चार करारही केले.

## युक्रेनची अपेक्षा, बायडेनशी संपर्क

मोदी यांनी आपल्या युक्रेन दौऱ्याची माहिती अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांना दूरध्वनी करून दिली. ''युक्रेनमधील संघर्ष संपुष्टात यावा यासाठी आम्ही सारे भारताकडे बघत आहोत.'' हे अमेरिकेचे राजकीय प्रतिनिधी माइक हँकी यांचे ताजे उद्गारही यासंदर्भात बरेच काही सांगून जातात.

मोदींच्या उद्गारांनी प्रत्यक्ष भेटीने आणि केलेल्या विविध करारांमुळे युक्रेनच्या भारतासंबंधी गैरसमजांपैकी काही दूर झाले असले तरी या सर्व घडामोडींमध्ये भारताची निश्चित भूमिका काय, हा प्रश्न झेलेन्स्की यांना पडणे स्वाभाविक आहे. तसेच हा सर्व खटाटोप करण्यामागचा भारताचा हेतू कदाचित त्यांना उमगला नसेल. पण मोदींच्या भेटीने हे संशय दूर करण्याची आणि रशिया-युक्रेन युद्धविरामाच्या वाटाघाटींना बदलण्याची पहिली पावले तर नक्कीच उचलली गेली आहेत.

या महिन्यात म्हणजे सप्टेंबरमध्ये झेलेन्स्की अमेरिकेत जातील. (मोदीही संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीसाठी जाणार आहेत) तिथे झेलेन्स्की अमेरिकन अध्यक्ष जो बायडेन व इतर नेत्यांशी वाटाघाटींच्या मुद्द्यांवर चर्चा करतील. झेलेन्स्की व पुतीन यांच्या युद्धविराम वाटाघाटींमध्ये वास्तव वरचष्म्याचा मुद्दा निश्चितच प्रमुख असेल. परंतु त्यामध्ये झेलेन्स्की यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या बाबी म्हणजे युक्रेनी सैन्याने रशियाच्या कुर्स्क या विभागावर मिळवलेला ताबा, पुढे अशा आक्रमणांना बळी पडू नये म्हणून युक्रेनच्या संरक्षणाची तजवीज व जागतिक स्थान तसेच युक्रेनच्या आर्थिक पुनरुत्थानासाठीची रुपरेषा इत्यादी.

जागतिक राजकीय पटलावरील ही प्रमुख पात्रे भारतादी मध्यस्थ देश, चीन वगैरे पडद्याआडून हालचाली करणारी प्रभावी राष्ट्रे आणि (इस्रायल-हमासमध्ये नाही तर निदान) या भागात शांततेची पुनिर्स्थापना करण्याचे व त्यायोगे शांतता स्थापनेत कायमचे स्थान (व कदाचित नोबेल शांतता पुरस्कार) मिळवण्याचे बायडेन यांचे प्रयत्न यावर या सर्वांचे यश अवलंबून आहे. अन्यथा ही शक्यताही एक मृगजळच ठरण्याचीही भीती आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी २३ सप्टेंबर रोजी चिपळूण येथील सभेत उपस्थितांना केलेले मार्गदर्शन....**



बऱ्याच दिवसातून आज तुम्हा सगळ्यांच्या समोर बोलायची संधी मला मिळाली. चिपळूणला आलो आणि मला काही लोकांची आठवण झाली. महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मी पहिल्यांदा १९६७ साली निवडून गेलो. त्या दिवसापासून आजपर्यंत ५५ वर्षे विधानसभा, लोकसभा, राज्यसभा असेल कुठे ना कुठेतरी मी सातत्याने काम करतो. त्या काळात अनेकांचे माझे जिव्हाळ्याचे संबंध आले. त्याच्यातील जेष्ठ लोकांची आठवण करायची म्हटल्यावर कोकण आणि विशेषतः चिपळूण याची आठवण मला झाल्याच्या नंतर एक नाव माझ्या पुढे पहिल्यांदा येतं आणि त्यांचं नाव बाळासाहेब सावंत. पी.के सावंत आणि आम्ही लोकांनी एकत्र काम केलंय. मला ज्येष्ठ होते पण एक अत्यंत स्वच्छ चारित्र्याचा, अतिशय निष्ठावान अशा प्रकारचा संबंध महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केलेला आणि महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचलेला अशी व्यक्ती म्हणून बाळासाहेबांची आठवण ही त्या ठिकाणी आम्हा लोकांना होते.

अनेक आमचे मित्र इथे होते. आज इथे येण्याच्या आधी नाना जोशींच्या घरी जाऊन आलो. नाना आमचे जुने सहकारी होते. सागर कोकणाच्या  घराघरांमध्ये पोहोचलेल एक वृत्तपत्र



# महायुती सरकारमध्ये भ्रष्टाचाराचा प्रचंड सुळसुळाट

**शरद पवार**

होतं आणि एक प्रकारच स्वच्छ आणि स्पष्ट लिखाण हे त्याचं वैशिष्ट्य होतं आणि त्यामुळे नानाची आठवण होणं साहजिकच आहे. आणखीन एक माझे सहकारी होते. कष्ट करणारा साधा कार्यकर्ता होता आणि त्याचं नाव बाळ म्हात्रे. बाळ म्हात्रे आमच्या सोबतचे सहकारी होते. अशा अनेकांसोबत मी याठिकाणी काम केलं. गोविंदराव निकम आणि मी देशाच्या लोकसभेमध्ये बरोबर होतो. एका संघटनेमध्ये काम करत होतो, महाराष्ट्रामध्ये राज्य सहकारी बँक ही मोठी बँक आहे आणि त्या बँकेमध्ये अध्यक्षपद कुणाला करावा? हा प्रश्न आम्हा लोकांच्या समोर आला. मी राज्याचा प्रमुख होता आणि हे सांगितलं की हे काम द्यायचं असेल तर गोविंदरावांना त्या ठिकाणी अध्यक्ष करा. गोविंदराव निकमांना त्या ठिकाणी अध्यक्ष करायची भूमिका आम्ही लोकांनी त्या काळामध्ये घेतलेली होती. या अनेकांची साथ मला स्वतःला मिळाली. म्हणून ही सगळी जीवाभावाची माणसं, लोकांच्या हिताची जपणूक करण्याची भूमिका घेणारी माणसं. आज त्यातील लोक नाहीयेत पण त्यांचा आदर्श तुम्हा सगळ्यांच्या समोर आणि आम्हा लोकांच्या समोर आहे. मला आनंद आहे की ते ज्या पद्धतीने काम करत होते त्याच पद्धतीने काम करण्याच्यासाठी



आज या ठिकाणी नवीन कर्तृत्ववान आणि दृष्टी असलेला नेता तयार होतोय की ज्याचं नाव प्रशांत यादव, हे या ठिकाणी मी जाहीर केलं तर त्यामध्ये काही चुकीचं होणार नाही. आणि म्हणून आम्हा लोकांची, माझा प्रयत्न असतो नवीन नवीन लोक तयार करायचे. त्यांना संधी द्यायची त्यांच्यामार्फत महाराष्ट्राचा चेहरा बदलेल कसा? याची काळजी घ्यायची. अनेक लोक साथ देतात. काही लोक निघून जातात. त्याची काही चिंता करायची नसते.

आता येताना मी एक बोर्ड वाचला. माझ्याबद्दलचा होता आणि माझ्या नावाने होता. त्याच्यात लिहिलं होतं माझा फोटो आणि मला दाखवलं आणि मी येतोय असं लिहिलं होतं. दोन दिवसापूर्वी इथं सभा झाली. सभेमध्ये एकाने सांगितलं की तो येतोय अजून. माझी त्यांना विनंती ही आहे, की मी केलंय मी त्यामुळे नेव्ही सुद्धा एकेकाळी माझ्या हाताखाली होती. त्याच्या वरिष्ठातल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला विचारलं, हे कशामुळे झालं? ते म्हणले, की राज्य सरकारला विचारलं, राज्य सरकारने सांगितलं की वारा जास्त आला आणि वाऱ्यामुळे पुतळा पडला. तुम्ही मुंबईला जाता. शिवाजी पार्कला गेला असाल. शिवाजी महाराजांचा पुतळा तिथे आहे. गेट ऑफ इंडियाच्या समोर शिवाजी महाराजांचा पुतळा आहे आणि हे पुतळे ८० वर्षाच्या पूर्वी उभारले . समुद्राच्या जवळ आहे, भरपूर वारा आहे. त्या पुतळ्याला कधी धक्का बसला नाही आणि सिंधुदुर्गचा पुतळा पडतो. वाऱ्यामुळे? काय चाललंय हे? स्वच्छ शब्दांमध्ये कळतंय की पुतळ्याच्या उभारण्यासाठीसुध्दा भ्रष्टाचार या ठिकाणी झाला. महाराजांचा पुतळा आणि तिथेसुद्धा पैसे खायला तुम्ही सोडत नाही.



येतोय म्हटल्यावर आलो आणि इथून रायगडला जाणार आहे. त्यामुळे मी रोह्याला येतोय की आणखी कुठे येतोय त्याचा पत्ता लवकरच कळेल. त्याला फारसा वेळ लागणार नाही हे मला या ठिकाणी सांगायची गरज आहे.

आज ज्यांच्या हातात सत्ता आहे. त्या सत्तेचा वापर योग्य पद्धतीने केला जात नाही. असे राज्य पातळीवर असो किंवा केंद्र पातळीवर असो. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये छत्रपतींचा पुतळा उभा केला आणि तो पडला. आम्ही चौकशी केली. सरकारच्या वतीने आम्हाला सांगण्यात आलं. मी नेव्हीला विचारलं. एकेकाळी देशाचा संरक्षण मंत्री म्हणून मी काम कशी लोकं आहेत. महाराज आपल्या सैन्याला, आपल्या अधिकाऱ्याला आदेश द्यायचे. त्यांनी आदेश दिला की तुम्ही खेड्यापाड्यात जात असाल तर शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाच्या देठालासुद्धा हात लावू नका. त्याचं रक्षण करा. अठरापगड जातीच्या लोकांना घेऊन जा. या सगळ्यांच्या हिताची जपणूक ही तुमची माझी जबाबदारी आहे आणि हे खरे रयतेचं राज्य आहे. हा आदेश ही भूमिका घेणारे शिवछत्रपती आणि आज त्यांचा पुतळा उध्वस्त होतो आणि एक प्रकारच चित्र संबंध देशांमध्ये वाईट होतं याचा अर्थ भ्रष्टाचार कुठल्या लेव्हलला पोहोचलाय?

मी काल सातारला आलो आणि सातारला हेलिकॉप्टरने आलो मी. नंतर मला कराडला जाऊन इथे यायचं होतं. माझी एक सवय आहे. वेळ असला तर मी शक्यतो गाडीने प्रवास करतो. का? तर आजूबाजूचं पिक बघता येतं. रस्त्यात लोक भेटतात. काही निवेदन देतात. त्या निवेदनामध्ये त्यांचे काही प्रश्न असतात. लोकांशी बोलता येतं. एकंदर विकास कसा झाला हे बघता येतं. रस्ते कसे आहेत ते बघता येतं आणि म्हणून मी ठरवलं की हेलिकॉप्टर माझ्याकडे होतं आणि सांगितलं त्यांना की आज दुपारी चिपळूणला या. हेलिकॉप्टरच्या पायलटने सांगितलं. तुम्ही चिपळूणला जाणार? म्हणल हो. मग हेलिकॉप्टर नाही घेऊन जात? नाही म्हणलं मला गाडीनं जायचंय. त्यांनाही आश्चर्य वाटलं. मी गाडीने आलो. आणि कराड ते चिपळूण प्रवास केला. त्याचा शेवटचा भाग सोडला तर महाराष्ट्रामध्ये इतके खराब रस्ते कुठेही नाहीत. आजची चिपळूणहून कोणी जर कराडला जात असेल, एखादा पेशंट कराडच्या हॉस्पिटलला न्यायचा असेल. तर माझी खात्री आहे या रस्त्याने गेल्याच्यानंतर पेशंट निम्मा 'या' रस्त्याने गेल्याशिवाय राहणार नाही. याचा अर्थ मी चौकशी केली. तिथं लोकांना विचारलं. काही अधिकाऱ्यांना विचारलं. रस्ते इतके खराब कसे? त्यांनी सांगितलं साहेब.. हे रस्ते तीनदा दुरुस्त झालेत. आणि तीनदा दुरुस्त झाल्याच्या नंतर आज असे आहेत. याचा अर्थ स्वच्छ आहे. सरकारने धोरण आखली, पैसे पुरवले पण ते पैसे योग्य कामासाठी पोहोचले नाहीत.



चार दिवसापूर्वी पुण्यामध्ये एक अपघात झाला. तुम्ही कदाचित बघितला असेल. अपघात कसला झाला? महानगरपालिकेचा एक ट्रक पुण्याच्या रस्त्याने जात होता आणि जात असताना तो एका खड्ड्यात पडला. अख्खा ट्रक खड्ड्यात पडला मी तो रस्ता अलीकडे राज्य सरकारच्या धोरणात नवीन केलेला होता. रस्त्याने जाणारा ट्रक त्या रस्त्यात खड्डा तयार होतो आणि त्या खड्ड्यात पडतो याचा अर्थ काय? याचा अर्थ स्वच्छ आहे या लोकांना कुठे आणि किती भ्रष्टाचार करावा याच्या मर्यादा राहिलेल्या नाही. याची किंमत शेवटी तुमच्यासारख्या नागरिकांना द्यावी लागते. माझ्यासारखा व्यक्ती गाडीने प्रवास करतो म्हणून माझ्यासारख्याला हे कळतं इथून पुढे मुंबईला गेल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री असो , त्यांचे अधिकारी असोत त्यांच्या नजरेवर ही गोष्ट आणल्याशिवाय राहणार नाही. आज तुमचे रस्ते खराब झालेले आहेत त्याला काही अर्थ नाही. त्याच्या दुरुस्तीबद्दलचा निकाल हा घ्यावा लागेल.

अनेक प्रश्न आपल्या सगळ्यांच्या समोर आहेत. सत्ता येते आणि जाते. सत्ता ज्याला मिळते त्यांनी संयम ठेवायचा असतो. सत्ता असेल तर जमिनीवर पाय ठेवायचे असतात. सत्ता नसेल तर चिंता करायची नसते. काम करत राहायचं असतं. या जिल्ह्यात काय झालं माहिती नाही. हा जो जुना जिल्हा आहे या जुन्या जिल्ह्यामध्ये एक मुख्यमंत्री होते. ते मुख्यमंत्री सिंधुदुर्गचे होते आणि अलीकडे मी बघतो. मी

मुख्यमंत्री होतो, माझ्या घरात एक मुलगी आहे. आज देशाच्या पार्लमेंटमध्ये चांगलं काम करणारी व्यक्ती म्हणून तिचा लौकिक आहे, विनम्रपणा हे तिचं वैशिष्ट्य आहे. पण मी अलीकडे बघतो सिंधुदुर्ग जिल्ह्याने एक मुख्यमंत्री केला. माझ्याबरोबरही त्यांनी काम केलं. त्यांच्याबद्दल मला काही म्हणायचं नाही. पण त्यांचे चिरंजीव ज्या पद्धतीने बोलतात हल्ली, ज्या पद्धतीने टीकाटिप्पणी करतात मी महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कुठल्या मुख्यमंत्र्यांची पुढची पिढी या प्रकारची झालेली पाहिलेली नाही. आज त्या लोकांची भाषा ही कशा प्रकारची भाषा आहे? समाजामध्ये सगळ्या जातीचे धर्माचे लोक राहतात. एक होतात आणि त्यांना त्यांची जागा ही दाखवल्याशिवाय राहणार नाहीत. आज ही स्थिती या ठिकाणी आहे. त्यांना दोष द्यावा की नाही हे मला कळत नाही.

त्याचे कारण आठ दिवसाच्या पूर्वी देशाचे प्रधानमंत्री काश्मीरला गेले. आणखी काही ठिकाणी प्रचाराला गेले. त्यांचा अधिकार आहे, मत मागायचा त्यांचा अधिकार आहे, त्यांची भूमिका मांडायचा अधिकार आहे. प्रधानमंत्री ही एक संस्था आहे आणि तिचा सन्मान ठेवणं ही तुमची माझी सगळ्यांची जबाबदारी आहे आणि ती काळजी आम्ही लोक घेत असतो. पण प्रधानमंत्र्यांनी सुद्धा सामान्य लोकांची अन्य



भारत हे राष्ट्र सगळ्या जातीच्या भाषेच्या धर्माच्या लोकांचंय. इथे हिंदू आहेत, इथे मुस्लिम आहेत, इथे शिख आहेत, इथे ख्रिश्चन आहेत आणि तुमच्या राज्याच्या एका केंद्रीय मंत्र्यांची मुलं मुस्लिम समाजाच्या संबंधी ज्या पद्धतीचे जाहीर भाष्य पुन्हा पुन्हा करतात. त्याला आवर घालण्याचे काम केले जात नाही. याउलट त्यांनी बोलावं याची काळजी घेतली जाते. याचा अर्थ स्वच्छ हा आहे की सत्ता ही डोक्यामध्ये गेलेली आहे आणि ज्या वेळेला सत्ता डोक्यात जाते, त्यावेळी लोक घटकांची प्रतिष्ठा ठेवली पाहिजे. प्रधानमंत्री गेले त्या ठिकाणी काश्मीरमध्ये एक विशिष्ट स्थिती आहे. काश्मीरच्या सीमेवर पाकिस्तानची सीमा आहे त्यामुळे आपल्याला नेहमी त्या भागामध्ये खबरदारी घ्यावी लागते, लोकांना एकत्र ठेवावं लागतं. प्रधानमंत्री त्या ठिकाणी गेले. निवडणूक प्रचार, तिथे काँग्रेस पक्ष आणि फारूक अब्दुल्लांचा पक्ष दोन्ही एकत्र निवडणूक लढवत आहेत. एकत्र निवडणूक लढवायला गेले त्या ठिकाणी प्रधानमंत्री यांनी जाऊन विकासाचे काम मांडले

असते मी समजू शकलो असतो. एखादं धोरण चुकीचं असतं त्याच्यासाठी टीका केली तर मी मान्य केलं असतं. प्रधानमंत्री गेले आणि सांगितलं की काँग्रेस पक्ष हा नक्षलवाद्यांचा पक्ष आहे, काँग्रेस पक्ष हा गुंडांचा पक्ष आहे, काँग्रेस पक्ष हा भ्रष्टाचाऱ्यांचा पक्ष आहे.

मोदी साहेबांना विनंती मी करणार आहे उद्या पार्लमेंटला जाईल त्या वेळेला मीटिंग करणार आहे की या देशाच्या स्वातंत्र्याच्या साठी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने प्रचंड त्याग केला. त्या त्याग करणाऱ्यांच्या मालिकेमध्ये नेहरू परिवाराला विसरू शकत नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवाहरलाल नेहरू






यांनी नवीन हिंदुस्तान उभा करण्यासाठी जे योगदान दिलं हा या देशाच्या इतिहासाचा भाग आहे. जवाहरलाल नेहरू गेल्याच्या नंतर इंदिरा गांधींनी दुनियेमध्ये या देशाची प्रतिष्ठा जी वाढवली ती आम्ही कधी विसरू शकत नाही. एका महिलेने दुनियेमध्ये या देशाची इज्जत वाढवली.

मला आठवतंय, मी एक दिवशी रशियामध्ये गेलो होतो आणि रशियामध्ये गेल्याच्या नंतर तिथल्या एका अधिकाऱ्याने मला एक गोष्ट सांगितली इंदिरा गांधींच्या बद्दल. काय गोष्ट होती? इंदिरा गांधी प्रधानमंत्री होत्या, त्या गेल्या रशियाला. रशिया आपला मित्र. पद्धत अशी असते की एका देशाचा प्रधानमंत्री दुसऱ्या देशात ज्यावेळेला जातो त्यावेळेस त्याच्या स्वागताला त्या देशाचा प्रधानमंत्री येतो. इंदिरा गांधी उतरल्या मास्कोच्या विमानतळावर. त्यांना घ्यायला एक उपमंत्री आला. मंत्री सुद्धा नाही. कॅबिनेट मंत्री नाही. प्रधानमंत्री नाहीच. तिथं प्रधानमंत्र्यांसाठी उतरायची जी जागा आहे त्याला क्रेमलिन म्हणतात. तो मोठा राजवाडा आहे. इंदिरा गांधींची व्यवस्था तिकडे केली होती. इंदिरा गांधी उतरल्या विमानातून त्यांच्या स्वागताला कोणी नव्हतं. भारताचे राजदूत त्या ठिकाणी होते त्यांना सांगितलं इंदिरा गांधींनी माझी व्यवस्था कुठे आहे? त्यांनी सांगितलं क्रेमलिनमध्ये रशियाच्या सरकारने केली. इंदिरा गांधींनी विचारलं, तुमचं घर कुठे आहे? ते म्हटले त्याच्याजवळच आहे. त्यांनी सांगितलं, की क्रेमलिनला जायचं नाही. भारताचा राजदूत जिथे राहतो तिथे राहायचं. गाडी तिथे घ्या. त्यांची गाडी भारताच्या राजदूताच्या घरी गेली आणि त्या ठिकाणी इंदिरा गांधी तयार झाल्या. तिथं राजदूताच्या घराच्या जवळ भारताचे अन्य अधिकारी असतात त्यांच्या मुलांना

इंदिरा गांधींनी बोलावलं आणि त्यांच्या मुलांच्या बरोबर खेळत बसल्या. तिथं रशियाचे प्राईम मिनिस्टर वाट बघत होते आणि या मुलांशी खेळत होत्या. शेवटी रशियाच्या प्राईम मिनिस्टर यांनी त्यांचे डेप्युटी प्राईम मिनिस्टर यांना भारताच्या राजदूताच्या घरी पाठवलं आणि इंदिरा गांधींची माफी मागितली की तुमचं स्वागत आम्ही राजशिष्टाचाराप्रमाणे केलं नाही. इंदिरा गांधींनी त्यांच्या प्रधानमंत्र्यांना सांगितलं प्रश्न इंदिरा गांधींचा नाही. मी ८० कोटी भारतीयांचा प्रतिनिधी म्हणून इथे आलेली आहे. त्यांचा जर अपमान असेल तर मला कशाचीही किंमत नाही. सगळं मीच सोडायला तयार आहे. पण हिंदुस्थानच्या ८० कोटी लोकांची इज्जत ही माझ्या दृष्टीने जास्त महत्त्वाची आहे.



ही भूमिका इंदिरा गांधींनी केली. त्या इंदिरा गांधींची हत्या झाली आणि आज देशाचे प्रधानमंत्री म्हणतात की या कुटुंबाने देशाला लुटलं. राजीव गांधींनी देशासाठी सगळं काही दिलं त्यांची हत्या त्या ठिकाणी झाली आणि हे झालं असताना सुद्धा ते गेल्यानंतर त्यांच्या पत्नी सोनिया गांधी की ज्यांच्या विरुद्ध आम्ही लोकांनी काही राजकीय भूमिका घेतली होती पण या देशाच्या हिताचा प्रश्न आला तर सोनिया गांधींनी परदेशात परत जायचा विचार कधी केला नाही. त्यांनी विचार केला की या देशाची बांधिलकी ठेवायची आहे. त्या व त्यांची पुढची पिढी आज या देशाचा विचार करत आहे. एवढा त्याग करणारी, देशाच्या संबंधी आस्था ठेवणारी ही पिढी असताना प्रधानमंत्री म्हणतात ही भ्रष्टाचाराची टोळी आहे, भ्रष्टाचाराचे घर आहे. माझ्यासारख्याला आश्चर्य वाटतंय की देशाचा प्रधानमंत्री कसं या पद्धतीने बोलू शकतात?

त्यामुळे साहाजिकच आहे ज्यांच्या हातात सत्ता आहे त्या सत्तेचा गैरवापर केला जातोय. त्या सत्तेचा गैरवापर करून तुमच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याची जी जबाबदारी आहे त्याच्याकडे लक्ष दिलं जात नाही. त्यासाठी आज या देशामध्ये परिवर्तनाची गरज आहे आणि ती परिवर्तनाची गरज काही प्रमाणात तुम्ही लोकांनी भागवली. तर लोकसभेच्या निवडणुकीमध्ये प्रधानमंत्री देशात जात होते ४०० पार ४०० च्या खाली नाही या प्रकारच्या जागांचा हिशोब मांडत होते. ते चारसौ पार ही भाषा बोलणारे प्रधानमंत्री त्यांना भारताच्या जनतेने २४० जागा दिल्या. आज चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार या दोन मुख्यमंत्र्यांची मदत झाली नसती तर दिल्लीचे मोदींचे सरकार हे तयार झाले नसते. पण तरीही अजूनही यातून काही शिकलं पाहिजे त्या प्रकारची भूमिका घेतली जात नाही. तशा प्रकारची पावलं टाकली जात नाहीत. म्हणून आज आपल्याला एका वेगळ्या निवडणुकीला जावं लागेल. आता देशाची निवडणूक झाली या निवडणुकीमध्ये महाराष्ट्राच्या जनतेने चांगली साथ आम्हा लोकांना दिली. याचा अर्थ लोकांना आमची भूमिका पटलेली आहे आणि म्हणून मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जातोय आणि सांगतोय की तुम्ही देश पातळीवर योग्य निकाल घेतला आता महाराष्ट्र नीट करायचा असेल, प्रगतीच्या रस्त्यावर न्यायचा असेल रस्ते आणि बाकीच्या गोष्टी सुधारायच्या असतील तर महाविकास आघाडी काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालचा शिवसेना पक्ष आणि अन्य छोटे पक्ष आम्ही सगळेजण एकत्रपणाने जाऊन हा शब्द देतो की तुमच्या साथीच्या जोरावर देशाचे महत्त्वाचे राज्य म्हणून महाराष्ट्र केल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

साधी गोष्ट आहे माझ्याकडे राज्याची सूत्र होती कोकणासाठी काहीतरी करावं अशी चर्चा होती. एक निकाल मी घेतला रोजगार आणि फळबाग त्याचं परिणाम काय दिसलं? मी अनेकदा हेलिकॉप्टरने जात असतो इथून गोव्याला किंवा या भागात आणि ज्या वेळेला माझे हेलिकॉप्टर कोकणातून जाते आणि नजर खाली जाते सगळे डोंगर काजूची झाड आहे, आंबा त्या ठिकाणी आहे, हिरवगार आहे. चित्र बदललेलं आहे हे बदलू शकलं त्याचं कारण रोजगार आणि फळबाग

योजना हीच त्या ठिकाणी राबवली.

आज कोकणाचा चेहरा बदलायचा असेल तर फलोद्योग असो, मत्स्य व्यवसाय असो, कारखानदारी असो आणि त्याचबरोबर अन्य छोटे मोठे उद्योग यासंबंधीचा आग्रह असेल याकडे अधिक लक्ष द्यायची गरज आहे आणि त्यामुळे माझी खात्री आहे कोकणाचा चेहरा बदलल्याशिवाय राहणार नाही. इथला माणूस हा कष्ट करणारा आहे तो दाखवत नाही पण कष्टाच्या बाबतीत तो कधी माघार घेत नाही. म्हणून कष्ट करणारा माणूस जो आहे त्याला घामाची किंमत तुम्ही दिली तर तो आणखी कष्ट करेल आणि महाराष्ट्राला मोठं करेल आणि त्यासाठी हे कार्यक्रम घेण्याच्या बद्दलची आज आणखी








आवश्यकता आहे. आणखी एक क्षेत्र आहे ते म्हणजे पर्यटन त्या पर्यटनामध्ये उत्तम सुविधा या ठिकाणी दिली तर या ठिकाणी आणखी विकास हा झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी आजचे राज्यकर्ते बदलले पाहिजेत आणि हेच काम उद्याच्याला आपल्याला करायचा आहे.

मला आनंद आहे की प्रशांत यादव यांच्यासारखा एक तरुण कार्यकर्ता इथे काहीतरी बदल करतोय. चाळीस हजार, पन्नास हजार लिटर दूध चिपळूण आणि आजूबाजूला होतं त्याच्यावर प्रक्रिया करणारी प्रशस्तीत अशी कंपनी उभी होते त्या कंपनीत तयार झालेला माल हा ठीक ठिकाणी जातो आणि लोक आज कटाक्षाने या मालाबद्दल एक चांगली भूमिका मांडतात. कोल्हापूरला तुम्ही गेलात गोकुळ सारखी योजना आहे त्यातून खेड्यापाड्यातल्या लोकांची संसार सुधारले. तुम्ही त्या ठिकाणी वारणा नगरला गेलात तर वारणासारखी योजना आज त्या ठिकाणी झाली तिथलं अर्थकारण बदललं. आज तसंच रत्नागिरी जिल्ह्याचे अर्थकारण बदलायला प्रशांत यादव जे काही कष्ट करत आहेत त्या कष्टाच्या पाठीशी तुमची माझी सगळ्यांची शक्ती ही उभी केली पाहिजे हे काम विस्तारित झालं पाहिजे. आपल्या भागाचा चेहरा हे बदलतं का हाताला काम कसं मिळेल हे बघितलं पाहिजे. ते करण्यासाठी आम्हा लोकांची पूर्ण ताकद ही त्यांच्या व तुमच्या मागे राहील हा शब्द जाहीरपणाने या ठिकाणी देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र..!

■■

श्रीलंकेने पहिल्यांदा मार्क्सवादी-लेनिनवादी विचाराच्या सामान्य घराण्याचा अनुरा कुमारा दिसनायके यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडला. ते मार्क्सवादी असले तरी त्यांचे राजकारण सर्वांना सोबत घेण्याचे राहिले आहे. भारतीय माध्यमात दिसनायके यांचा विजय अनपेक्षित होता, अश्या स्वरूपाचं विश्लेषण करण्यात आलं आहे. पण हे खरं नाही. भारतीय पत्रकारांना श्रीलंकेत घडणाऱ्या गोष्टींबद्दल फारशी माहिती नसल्याचे यातून सिद्ध होतं. श्रीलंकेच्या लोकांना आणि मला दिसनायके यांचा विजय अपेक्षित होता. निवडणुकीच्या काळातील काही सर्वेक्षणात देखील दिसनायके पुढे असल्याचं सांगण्यात आलेलं. दिसनायके यांच्या विरोधात प्रचंड धनशक्ती असलेले तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष रनिल विक्रमासिंघे, सजीव प्रेमदासा, माजी राष्ट्राध्यक्ष महिन्दा राजपक्षे यांचा मुलगा नमल राजपक्षे यांचा त्यांनी पराभव केला. अजूनही आर्थिक संकटातून पूर्णपणे बाहेर न आलेल्या श्रीलंकेसाठी दिसनायके यांचा विजय महत्त्वाचा आहे. २०२२ च्या आर्थिक संकटात भारताने श्रीलंकेला चार अब्ज डॉलर एवढी मदत केली होती, हे दिसनायके यांच्या लक्षात असेलच. ५ फेब्रुवारीला भारताने दिसनायके यांच नवी दिल्ली येथे लाल गालिचा टाकून स्वागत केलं होतं. दिसनायके आणि त्यांच्या पक्षाच्या एका शिष्टमंडळाला भारताने तेव्हा आमंत्रित केलं होतं. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल आणि इतर काही नेत्यांना ते भेटले होते. ही भेट देखील बरंच काही सांगून जाते. ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे डोवाल, राष्ट्राध्यक्ष विक्रमासिंघे, दिसनायके, प्रेमदासा आणि नमल यांना वेगवेगळे भेटले होते. श्रीलंकेची निवडणूक भारतासाठी किती महत्त्वाची होती हे त्यातून स्पष्ट होतं. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात शेजारी बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांना देश सोडून पळून जावं लागलं. नवीन सरकारवर खालेदा झिया यांच्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी आणि जमात-ए-इस्लामीचा प्रभाव असल्याने तिथली सरकार भारताच्या बाजूची नाही. नेपाळात साम्यवादी के.पी.



# श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांचा विजय अपेक्षितच

जतीन देसाई

शर्मा ओली पंतप्रधान आहेत. दिसनायके यांच्या जनता विमुक्ती पेरामुना (जेव्हीपी) पक्षाचा भारताशी जवळचा संबंध राहिलेला नाही. पण आताची परिस्थिती वेगळी आहे. त्यांना त्यांच्या परराष्ट्र धोरणात भारत आणि चीनमध्ये समतोलपणा ठेवावे लागेल.

'एकेडी' म्हणून ओळखले जाणारे दिसनायके आणि त्यांच्या पक्षाची २०२२ च्या "अर्गालया" त (सिंहली भाषेत संघर्ष) महत्त्वाची भूमिका होती. तेव्हाच्या राष्ट्राध्यक्ष गोताबाया राजपक्षे यांना देश सोडून पळून जावं लागलं. त्या आंदोलनातील अनेक नेते आज नॅशनल पीपल्स पावर (एनपीपी) या आघाडी सोबत आहेत. जेव्हीपी त्यात सर्वात मोठा पक्ष आहे. एनपीपी सातत्याने आर्थिक प्रश्नाबद्दल भूमिका घेऊन बोलत आहे. जेव्हीपीच्या शिस्तबद्ध कार्यकर्त्यांनी लोकांच्या समस्यांना अधिक महत्त्व दिले. जेव्हीपीची एक मर्यादा आहे. त्यांचा इतिहास हिंसेचा आहे. १९७१ आणि १९८८ ते १९८९ मध्ये दोनदा जेव्हीपीने सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न केले. परंतु त्यात त्यांना यश मिळालं नाही. ७०,००० ते ८०,००० लोक त्यात मारली गेली. तेव्हा त्यांचा प्रभाव सिंहला समाजापुरता मर्यादित होता. वस्तुस्थिती ही आहे की श्रीलंकेत सिंहला समाजाचे वर्चस्व आहे. या निवडणुकीचा अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल की अल्पसंख्याक तमिळ समाजाचे वर्चस्व असलेल्या उत्तर आणि उत्तर-पूर्व श्रीलंकेत दिसनायके पेक्षा प्रेमदासाला अधिक मत मिळाली आहेत. कोलंबो, हम्बनटोटा, व दक्षिण श्रीलंकेत दिसनायके यांना मोठी आघाडी मिळाली. राजपक्षे घराण्याचा दक्षिण श्रीलंकेवर प्रभाव असायचा. २००९ मध्ये महिन्दा राजपक्षे राष्ट्राध्यक्ष असताना लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम (एलटीटीई) ला चिरडून टाकण्यात आलेलं. या निवडणुकीत नमल राजपक्षेला २.५ टक्के देखील मत मिळाली नाही. याचा अर्थ राजपक्षे घराणं श्रीलंकेच्या राजकारणातून संपलं असा होतो. पण, राजकारणात कोणीही कायमचा संपत




नसतो. एकेकाळी महिन्दा राजपक्षे श्रीलंकेत सर्वात शक्तिशाली होते. आता त्यांचा राजकीय प्रभाव संपला आहे. सत्ता कायम एका व्यक्तीकडे राहत नाही. सत्ता सोबत येत असलेल्या अहंकारानी त्यांना संपवलं, हे लक्षात ठेवलं पाहिजे.

दिसनायके यांना ४२.३१ टक्के, समागी जना बालावेगाया (एसजेबी) पक्षाच्या प्रेमदासा यांना ३२.७६ टक्के आणि विक्रमासिंघे यांना १७ टक्के मतं मिळाली. काही तमिळ स्वयंसेवी संघटनानी पी. आरियानेथिरान यांना निवडणुकीत उतरवलेलं. त्यांना जेमतेम १.७ टक्के मतं मिळाली. दिसनायके यांना एनपीपीच्या इतर घटक पक्षांची मदत झाली हे उघड आहे. गेल्या निवडणुकीत मात्र तीन टक्के मत मिळालेले एकेडी 'जायंट किलर' ठरले. सामान्य लोकांच्या प्रश्नाला त्यांनी सातत्याने महत्त्व दिलेलं. राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर पंतप्रधान म्हणून हरिणी अमारासूर्या या उच्चशिक्षित महिलेची त्याने निवड केली. श्रीलंकेच्या त्या तिसऱ्या महिला पंतप्रधान आहेत. १९६० मध्ये पंतप्रधान झालेल्या सिरिमाओ भंडारनायके जगाच्या पहिल्या महिला पंतप्रधान होत्या. त्यानंतर चंद्रिका कुमारतुंगे पंतप्रधान झाल्या होत्या आणि आता हरिणी अमारासूर्या.

युनायटेड नॅशनल पार्टीचे (युएनपी) नेते असले तरी









विक्रमासिंघे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवलेली. त्याला काही कारण आहेत. २०२० मध्ये युएनपीत फूट पडलेली आणि मोठ्या संख्येत बाहेर पडलेल्या नेत्यांनी एसजेबी या पक्षाची स्थापना केली होती. श्रीलंकेला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आपण केलेल्या प्रयत्नाला जर आपण अपक्ष म्हणून उभे राहिलो तर व्यापक पाठिंबा मिळेल असं त्यांना वाटत होतं. एसजेबीचे उमेदवार होते सजित प्रेमदासा. श्रीलंकेचे माजी अध्यक्ष रणसिंघे प्रेमदासा हे त्यांचे वडील होते. रणसिंघे प्रेमदासाची हत्या १९९३ मध्ये ते राष्ट्राध्यक्ष असताना करण्यात आली होती. नमल राजपक्षे श्रीलंका पोडुजना पेरामुना या पक्षाचे उमेदवार होते.

या निवडणुकीत देशाची अर्थव्यवस्था हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता. त्याला कारण होतं २०२२ मधलं आर्थिक संकट. गोताबाया राजपक्षे तेव्हा राष्ट्राध्यक्ष होते. २०१९ मध्ये ते निवडून आलेले. पर्यटन व्यवसायावर श्रीलंका मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. निसर्गाने संपन्न असलेल्या श्रीलंकेत दरवर्षी लाखो पर्यटक येत असतात. करोनामुळे पर्यटकांची संख्या प्रचंड प्रमाणात कमी झाली. श्रीलंकेने पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक प्रयत्न केले पण त्या काळात जगभर पर्यटन






व्यवसाय संकटात सापडला होता. २०२१ मध्ये आयात खर्च कमी करण्यासाठी सरकारने खताच्या आयातीवर बंदी घातली आणि २० लाखाहून अधिक शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास भाग पाडले. घाईघाईने घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाले. श्रीलंका मोठ्या प्रमाणात चहा निर्यात करते. निर्यात कमी झाली. सरकारी निर्णयामुळे शेतमालाचे उत्पादनही कमी झाले. आर्थिक संकट निर्माण झालं. पेट्रोल सह सर्व वस्तूंची टंचाई जाणवायला लागली आणि महागाई भरमसाठ वाढली. लोक रस्त्यावर उतरली. राष्ट्राध्यक्षाच्या बंगल्यावर लोकांनी कब्जा केला. भारतातही लोकांनी वृत्तवाहिन्यांवर ते दृश्य पाहिलं. जुलै २०२२ मध्ये गोताबाया देशाच्या बाहेर पळून गेले. हे आंदोलन स्वयंस्फूर्त होतं. जेव्हीपी आणि एनपीपीचे कार्यकर्ते त्यात सक्रिय होते. श्रीलंकेचा विचार केल्यास २०२२ अत्यंत महत्त्वाचं वर्ष ठरलं. त्यानंतर हंगामी पण अनुभवी विक्रमासिंघे यांनी राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली आणि बऱ्याच प्रमाणात परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात त्यांना यशही मिळालं. भारताने तेव्हा श्रीलंकेला मोठ्या प्रमाणात मदत केलेली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) कडून देखील मदत मिळाली. साहजिकच त्यात काही अटी होत्या. दिसनायके त्या अटी बाबतीत आयएमएफसी परत वाटाघाटी करण्याची शक्यता आहे.

श्रीलंकेचा वांशिक संघर्ष मिटवण्याच्या दृष्टीने २९ जुलै १९८७ मध्ये भारताचे पंतप्रधान राजीव गांधी आणि श्रीलंकेच्या अध्यक्ष जे. आर. जयवर्धने यांच्या सह्याने भारत-श्रीलंका शांतता करार करण्यात आला. करारानुसार राज्यघटनेत १३वी दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर प्रांतीय परिषदेची रचना करण्यात आली. त्या परिषदांना पोलीस, शिक्षण, गृहनिर्माण, आरोग्य सारख्या विषयांची जबाबदारी देण्यात आली. परंतु राष्ट्राध्यक्षांकडे प्रचंड सत्ता असल्याने प्रांतीय परिषदेचा फारसा फायदा झाला नाही. पोलिसांबद्दल तर त्याचा कधी अंमल करण्यात आला नाही. सुरुवातीला तमिळ बहुसंख्याक असलेल्या उत्तर आणि उत्तर-पूर्व प्रांताचं एकमेकात विलीन करण्यात आलं. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे २००७ मध्ये परत दोन वेगळे प्रांत करण्यात आले. आश्चर्य म्हणजे या घटना दुरुस्तीला सिंहला आणि एलटीटीई या दोघांनी विरोध

केलेला. सिंहला लोकांचं म्हणणं होतं की तमिळ लोकांना या अंतर्गत खूप काही देण्यात आले आहे तर आपल्या पदरी फारसं काही पडलं नसल्याचे एलटीटीईचे म्हणणे होते. जेव्हीपीने त्याच्या विरोधात सशस्त्र बंड केलं होतं. मात्र तमिळ नॅशनल एलायन्सला (टीएनए) वाटत होतं की ही एक चांगली सुरुवात आहे. तमिळ अतिरेकी आणि कट्टर सिंहलाना या कराराला अपयश मिळावं असं वाटत होत. करारावर सही करण्याच्या आदल्या रात्री राजीव गांधी यांना एलटीटीईचे सर्वेसर्वा व्ही. प्रभाकरन आणि एंन्टन बालसिंघम भेटलेले. बालसिंघम यांनी तेव्हा काही पत्रकारांना एलटीटीईनी करार मान्य करायचे ठरवलं असल्याचं सांगितलेलं. मात्र जाफना येथे परत गेल्यानंतर प्रभाकरन यांनी भूमिका बदलली. संपूर्ण शस्त्रबंदीसाठी श्रीलंकेला मदत करण्याकरिता भारताने इंडियन पीस कीपिंग फोर्स पाठवलेलं. मार्च १९९० मध्ये भारतीय सैन्याला परत बोलवण्यात आलं पण तोपर्यंत भारताचे जवळपास हजार जवान शहीद झाले होते. नंतर प्रभाकरन यांनी आत्मघाती पथकाच्या मदतीने राजीव गांधी यांची हत्या केली. विक्रमासिंघे यांनी निवडणूक प्रचारात आपण निवडून आल्यास १३व्या घटनादुरुस्तीचा अंमल करू, असं आश्वासन दिलेलं. सिंहला समाजात, प्रामुख्याने, जनाधार असल्याने दिसनायके यांनी या मुद्द्यावर भाष्य करण्याचं टाळलेलं. आता एनपीपी कशाप्रकारे १३ व्या घटनादुरुस्ती कडे पाहते आणि त्याचा अंमल करते याकडे भारताचे लक्ष असेल.

या व्यतिरिक्त, नवीन सरकार चीनशी कश्या स्वरूपाचे संबंध ठेवणार याकडे देखील भारताचं लक्ष असणार. चीनच्या महत्त्वाकांक्षी बोल्ट अँड रोड इनिशिएटिव्हचा श्रीलंका भाग आहे. श्रीलंकेचा मोठ्या प्रमाणात व्यापार भारत आणि चीन सोबत आहे. एकेडी यांना दोघांमध्ये समतोलपणा ठेवावे लागणार. राजपक्षेच्या काळात श्रीलंकेने चीनला अधिक महत्त्व दिलं होतं. मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुईझ्झु यांनी निवडणूक प्रचारात भारताच्या विरोधात प्रचार केला होता. मात्र आता त्यात बराच बदल झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी समारंभासाठी ते आले होते. त्याच स्वरूपाने डाव्या विचाराचे असले तरी दिसनायके संपूर्णपणे चीनच्या बाजूने भूमिका घेणार असं मानणे चुकीचे आहे. भारताचे श्रीलंकेतील उच्चायुक्त संतोष झा यांनी दिसनायके यांचा विजय झाल्यानंतर लगेच त्यांना भेटून भारताच्या वतीने त्यांच अभिनंदन केलेलं.


रनिल विक्रमासिंघे


सजीव प्रेमदासा


नमल राजपक्षे

जेव्हीपीची स्थापना १४ मे १९६५ ला सात तरुणांनी केली होती. त्याचं नेतृत्व रोहन विजेवीरा नावाच्या तरुणाकडे होतं. क्रांतिकारी चे गव्हेरा त्या सर्वांचा आदर्श होता. मार्क्सवादाचा सर्वांवर प्रभाव होता आणि सशस्त्र क्रांतीचं स्वप्न होत. १९७१ च्या ५ एप्रिलला श्रीलंकेच्या ७४ पोलीस स्टेशनवर जेव्हीपीने हल्ला केलेला. अनेक पोलीस स्टेशनवर त्यांनी कब्जा देखील केलेला. नंतर, सरकारने त्यांच आंदोलन चिरडून टाकलं. १९७१ च्या पहिल्या बंड्याच्या वेळेस जेव्हीपीची भूमिका साम्राज्यवाद विरोधी होती. भांडवलशाही संपवण्याचं त्यांच स्वप्न होतं. परंतु नंतर त्यात बदल व्हायला सुरुवात झाली. ते अधिक सिंहला राष्ट्रवादी झाले. तमिळ यांच्या स्वशासनाच्या मागणीला जेव्हीपीने विरोध केलेला. काही वर्षासाठी जेव्हीपीवर बंदी आणण्यात आलेली. १९८८-८९ मध्ये पण सशस्त्र क्रांतीचा प्रयत्न करण्यात आला. त्यातही यश मिळालं नाही. हजारो लोक या दोन्ही बंडात मारले गेले. रोहन यांच १३ नोव्हेंबर १९८९ ला पोलीस कस्टडीत मृत्यू झालं. दिसनायके यांचा चुलत भाऊ जेव्हीपीमध्ये सक्रिय होता. १९८८ च्या बंडात प्रेमदासा सरकारने केलेल्या कारवाईत त्याचा मृत्यू झालेला, सोमवंशा अमरसिंघे नावाच्या अन्य नेत्याला पळून जाण्यात यश मिळालेलं. काही वर्षांनी श्रीलंकेत परत येऊन जेव्हीपीला नवीन दिशा देण्याचा दृष्टीने त्यांनी प्रयत्न केला. जेव्हीपीला पक्षाचं स्वरूप देऊन अमरसिंघे यांनी त्याला मुख्य प्रवाहात आणलं. व्ही. पी. सिंग आणि भारतामुळे आपल्याला श्रीलंकेतून आधी पळून जाणं शक्य झालं होतं, अशी कबुली अमरसिंघेने दिली होती. त्यामुळे देखील जेव्हीपीचा भारताचा विरोध थोडा मवाळ झाला होता. अमरसिंघे नंतर २०१४ मध्ये जेव्हीपेचे नेतृत्व दिसनायके यांच्याकडे आलं. त्यांनी पक्षाला व्यापक जनाधार मिळवून दिला. या निवडणुकीच्या प्रचार दरम्यान दिसनायके यांनी भारत, चीन आणि पाश्चिमात्य देशाशी सतत संपर्क ठेवला होता. आजची जेव्हीपी १९७१ आणि १९८८-८९ पासून वेगळी आहे. अनुभवातून जेव्हीपी बदलली आहे. आता जगात कुठेही सशस्त्र क्रांती होऊ शकत नाही, याची

त्यांना जाणीव झाली आहे. १९९० च्या दशकात बदललेल्या जेव्हीपीचा जनाधार, प्रामुख्याने, सिंहला समाज राहिला. १९९४ च्या संसदीय निवडणुकीत जेव्हीपीचा एका बैठकीवर विजय झालेला. २००१ मध्ये १६ जागेवर जेव्हीपीचा विजय झालेला. दिसनायके यांनी २०१५ मध्ये काही राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था, विचारवंत इत्यादीनां एकत्र आणून एनपीपीची स्थापना केली होती. त्यानंतर एनपीपीच्या झेंड्याखाली ते निवडणुका लढवायला लागले. २०१८ मध्ये तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष मैत्रीपाल सिरिसेना यांनी पंतप्रधान विक्रमासिंघे यांची पंतप्रधानपदावरुन हकालपट्टी केली तेव्हा दिसनायके यांनी त्याचा विरोध केलेला. त्यांनी म्हटलं दक्षिण आणि उत्तर



श्रीलंकेत अनुक्रमे सक्रिय असलेल्या जेव्हीपी आणि टीएनएनी एकत्र काम केलं पाहिजे. अत्याचारी सरकारांमुळे दक्षिण आणि उत्तरेला खूप नुकसान झालं आहे,.असं त्यांनी म्हटलेलं. त्यांच राजकारण सर्वसमावेशक होत हे यातून स्पष्ट दिसतं. श्रीलंका आणि शेजारील राष्ट्रांसाठी हे महत्त्वाचे आहे.

भारतीय माध्यमाने सुरुवातीला श्रीलंकेच्या निवडणुकीला फारसं महत्त्व दिलं नाही. अलीकडे काही शेजारी राष्ट्रात घडलेल्या घटनेनंतर खरंतर भारतीय माध्यमाने अधिक महत्त्व द्यायला पाहिजे होत. विक्रमासिंघे सहज निवडून येतील, असंच अनेकांना वाटत होतं. श्रीलंकेच्या लोकांना मात्र तसं वाटत नव्हतं. इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ पॉलिसी नावाच्या श्रीलंकेच्या प्रतिष्ठित संस्थेने निवडणूकीच्या प्रचार काळात केलेल्या सर्वेक्षणात दिसनायके इतरांच्या खूप पुढे आहेत हे दिसून आलेलं. पहिल्या राउंड मध्ये कोणी निवडून येणार नसल्याने मतमोजणी दुसऱ्या पसंतीच्या मोजणीवर जाईल, असेही त्यांच्या सर्वेक्षणात आढळलं. इन्स्टिट्यूटच्या सर्वेक्षणात दिसनायके यांना ४८ टक्के, प्रेमदासा यांना २५ टक्के आणि विक्रमासिंघे यांना २० टक्के मतं मिळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. एका अन्य वेबसाईटने ९ ते १६ सप्टेंबर दरम्यान केलेल्या सर्वेक्षणात दिसनायके यांना ४० टक्के, प्रेमदासा यांना २९ टक्के आणि विक्रमासिंगे यांना २५ टक्के मतं मिळतील, असं म्हटलेलं. श्रीलंकेत अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी होण्यासाठी ५० टक्क्याहून अधिक मत मिळणं आवश्यक आहे. कोणालाही तेवढी मत मिळाली नसल्यामुळे दुसऱ्या पसंतीची मत मोजली गेली आणि त्यानंतर दिसनायके विजयी झाल्याचं जाहीर करण्यात आलं. श्रीलंकेच्या इतिहासात पहिल्यांदाच दुसऱ्या पसंतीची मत मोजावी लागली.

दक्षिण आशियातलं राजकारण फार बदललं आहे. ५ ऑगस्टच्या आधी बांगलादेश भारताच्या सर्वात जवळचा आणि विश्वासू सहकारी होता. मोहम्मद युनूस यांच्या सरकारबद्दल असं म्हणता येणार नाही. किंबहुना संबंधात बऱ्याच प्रमाणात तणाव निर्माण झाला आहे. नेपाळची वर्तमान सरकार भारताच्या जवळ आहे, असं म्हणण्याची परिस्थिती नाही. मालदीवचे मुइझ्झु संबंध सुधारण्याचे प्रयत्न करत आहेत. पण त्याला जवळचे सहकारी म्हणता येणार नाही. निवडणूक प्रचारात त्याने भारताच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. संबंध सुधारण्यासाठी पाकिस्तान काही प्रयत्न करत नाही किंबहुना दहशतवादाला सतत मदत करत आला आहे. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत पाकिस्तानच्या पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी परत एकदा काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. त्याला भारताच्या संयुक्त राष्ट्रातील तरुण फर्स्ट सेक्रेटरी भाविका मंगलानंदन यांनी 'उत्तर देण्याच्या अधिकार' अंतर्गत अतिशय प्रभावी उत्तर दिलं. तालिबान सत्तेत असल्यामुळे सहाजिकच अफगाणिस्तानशी भारत व इतर अनेक देशांचे तणावाचे संबंध आहेत. एकाही देशाने तालिबान सरकारला मान्यता दिलेली नाही. दक्षिण आशियातील ही परिस्थिती लक्षात घेता भारताने शेजारी राष्ट्रात आपला प्रभाव वाढविण्यासाठी अधिक सक्रिय होण्याची आवश्यकता आहे. चीनचा वाढता प्रभाव थांबवण्याच्या दृष्टीने रणनीती बनवली पाहिजे.



# कर्तृत्व दाखविणारेच समाजकारण, राजकारणात टिकतात : शरद पवार

मागील पाच वर्षांमध्ये या मतदारसंघांमध्ये एक ऐतिहासिक बदल होतोय, त्याचे वास्तव चित्र तुम्हा सगळ्यांसमोर तुमचे लोकप्रिय आमदार रोहित पवार यांनी ठेवले. मला आठवतंय विधानसभेची निवडणूक लढवावी हा विचार ज्यावेळी रोहितच्या मनामध्ये आला त्यावेळी कुठून लढवावी याची चर्चा होती. काही मित्रांनी कर्जत जामखेडचा उल्लेख केला. हा मतदारसंघ महाराष्ट्रातील दुष्काळी मतदारसंघ आहे. पिण्याच्या पाण्याची अडचण, उद्योगधंदे नाहीत, हाताला काम नाही दळणवळणाची साधने नाहीत, सर्वत्र वीज पुरवठा नाही, हा सर्व नाहीचाच पाढा. असं असताना मला आमच्या मित्रांनी विचारलं हे सगळं संकट असताना त्या संकटाचा भाग तुम्ही या तरुणाच्या खांद्यावर का टाकतात. त्यांना मी सांगितलं, की मला शंभर टक्के कर्तृत्वावरती विश्वास आहे. कर्तृत्व असेल, मेहनत करण्याची तयारी असेल, आणि सामान्य माणसाशी माणुसकीने संबंध ठेवण्याचा स्वभाव असेल तर कसल्याही संकटावर आपल्याला मात करता येते. ती कुवत रोहितमध्ये आहे, त्यामुळे रोहितने ते काम केलं. त्याबद्दल तुम्हा लोकांना धन्यवाद द्यायचे आहेत. हजारो मतांनी तुम्ही विजयी केलं.

अनेकांनी टीका केल्या. बाहेरचे आले, भूमिपुत्र पाहिजे, अजून अनेक गोष्टी बोलण्यात आल्या. कसला भूमिपुत्र? दहा-दहा वर्ष सत्तेवर होते, राज्याच्या मंत्रिमंडळात जाता, हे सगळं तुमच्या हाती असताना एक महत्त्वाचा प्रश्न या मतदारसंघांमध्ये सोडवू शकला नाही आणि तुम्ही भूमिपुत्राचा उल्लेख करायचा? याची चिंता करण्याचं कारण नाही. ही भूमिका तुम्ही घेतली आणि रोहितला मोठ्या मतांनी विजयी केले. सरकार बंद, मंत्रिमंडळ बंद, काही कार्यकर्ते मला भेटायला आले मी मंत्र्यांची यादी केली. तिथे रोहितच नाव दिसत नाही. मी सांगितलं तुम्ही काही चिंता करू नका हे सरकार पाच वर्षासाठी नाही. माझा निकाल हा होता की नवीन पिढीचा प्रतिनिधी पहिल्यांदा निवडून येतो, लगेचच त्याने मंत्रिपदाची



अपेक्षा करू नये.

१९६७ साली मी पहिल्यांदा महाराष्ट्राच्या विधानसभेला निवडून आलो. आज रोहित काम करतोय, तसा संपूर्ण पाच वर्ष मी देखील काम केलं. मंत्री झालो नाही, पदाची अपेक्षा केली नाही. रोहितने देखील आमच्याकडे कुठल्याही पदाची अपेक्षा केली नाही. तुमच्यासारखे कार्यकर्ते म्हणत होते, पण रोहितने कधीही मला मंत्री करा असे सांगितले नाही. दोन अडीच वर्षासाठी मंत्री करायचं याच्यावर माझा विश्वास नाही. मी पाच वर्षे मंत्री नव्हतो पण माझी पाच वर्ष आमदार म्हणून गेल्यानंतर १९७२ सालानंतर एक दिवस असा गेला नाही सत्तेचा, हे नाही तर ते ठिकाण आम्हा लोकांसमोर आलं. मी गृहखात्याचा राज्यमंत्री झालो, शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात शेती खात्याचा मंत्री झालो. नंतर वसंतदादांचं सरकार गेल्यानंतर मी स्वतःच मुख्यमंत्री झालो. एकदा नाही तर चार वेळा मुख्यमंत्री झालो. रोहितची पहिली पाच वर्ष ही तुमची सेवा करण्याची आहेत. त्यानंतरची वर्ष महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी आहेत. ही महाराष्ट्राची सेवा महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये नोंद होईल अशा प्रकारचे कर्तृत्व ज्याच्यामध्ये आहे त्याला वर्ष सहा महिन्यासाठी पद आहे की नाही याची फिकीर असता कामा नये.



**जामखेड येथे २९ सप्टेंबर रोजी खर्डा किल्ल्याच्या नुतनीकरण कामाचे भूमिपूजन व यशवंतराव होळकर यांच्यावरील पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी जनतेशी साधलेला संवाद...**

आज कर्जतमध्ये काय चित्र दिसतंय. पाच वर्षांमध्ये कर्जतचं, जामखेडचं चित्र बदलले. मी इथे पूर्वी अनेकदा आलोय. आमचे काही सहकारी त्यावेळी इथल्या भागात होते, पण सर्वदृष्टीनं मागासलेला कोणता तालुका असेल त्यात तुमचा उल्लेख होतो. एक गोष्ट तुमच्याकडे कायमची होती, ती म्हणजे दुष्काळ. पाऊस पडला नाही की रोजगार हमीची कामं. रोजगार हमीची कामे माणसाला दुष्काळात जगवायची. ही कामे कशी झाली हे बघायला इंदिरा गांधी या तालुक्यात आल्या होत्या. इंदिरा गांधींनी इथला दुष्काळ आणि त्याला तोंड देण्याची हिंमत लोक कसे दाखवतात हे पाहण्यासाठी नगरच्या दक्षिण भागाचा दौरा केला होता. संकटावरील संकटावर मात करून नवीन इतिहास निर्माण करणे हे कर्तृत्व दाखवण्याची कुवत त्याच्यामध्ये आहे. असा प्रतिनिधी गेली पाच वर्ष तुमच्या सेवेत या ठिकाणी आलाय.

कधी कधी मला गंमत वाटते की सत्ता असो अथवा नसो, कामाचा चमत्कार हे लोक कसा करू शकतात? मतदार संघाचा हिशोब पाहिला तर गेल्या साडेचार वर्षांमध्ये

नॅशनल हायवे, मतदार संघातील प्रमुख राज्यमार्ग, जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग, पूल यासाठी किती कोटी या भागासाठी मंजूर झाले तर ते २७०० कोटी. एका मतदारसंघांमध्ये या कामासाठी इतका निधी मंजूर करून आणण्याचे कर्तृत्व रोहितने दाखवलं. पिण्याचे पाणी, त्यासाठी केंद्राची योजना. जलजीवन मिशनसाठी तुमच्या मतदारसंघांमध्ये तीनशे कोटींचा निधी आणला. जामखेड शहर नळ पाणीपुरवठा योजना जे काम सुरू आहे त्यासाठी १८० कोटी. वीज हा नेहमीचाच प्रश्न त्याची गुणवत्ता वाढेल कशी याच्यामध्ये लक्ष घातलं. १२० कोटींचा आराखडा मंजूर करून घेतला. माझी खात्री आहे येत्या दोन ते तीन वर्षांमध्ये एक वाडी, एक वस्ती, एक घर केल्याशिवाय राहणार नाही हे चित्र या ठिकाणी झालं.

समाजाचे काम करत असताना लहान माणसाकडे लक्ष देणं हे लोकप्रतिनिधीचं कर्तव्य असतं. दलित किंवा छोटे घटक असतील त्यांच्या निवासाचा प्रश्न, केंद्र सरकारची योजना आहे दलित वस्ती सुधार. या योजनेसाठी पन्नास कोटी या मतदारसंघासाठी मिळाले. अशा अनेक गोष्टी सांगता येतील. इथल्या हॉस्पिटलची क्षमता वाढली, महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था झाली, सिद्धटेक ते कोर्टी मार्गासाठी आशिया बँकेकडून १८० कोटींचे कर्ज मंजूर केले, या मतदारसंघातील छोटे-मोठे पूल उभारणीसाठी ६० कोटींचा निधी मंजूर करून घेतला, विद्यार्थ्यांना शाळेत जाणं अडचणीचा ठरत असल्याने त्या विद्यार्थ्यांना सायकलीची योजना आणली, त्यात १४००० सायकली वाटल्या. हे ऐतिहासिक काम कुठे केलं असेल तर ते कर्जत-जामखेडमध्ये झालं. इतका कामाचा डोंगर तुमच्या प्रतिनिधींनी या ठिकाणी उभा केला. म्हणून तुम्हा सगळ्यांची शक्ती आणि पाठिंबा आज त्यांच्यासमोर उभा राहिला.


बारामती विकासाचा पॅटर्न

कर्तृत्व दाखवण्याची संधी आली त्यावेळी जे कर्तृत्व दाखवतात तेच समाजकारण आणि राजकारणात टिकतात ही माझी खात्री आहे. मी पहिल्यांदा निवडून आलो तेव्हा मतदार संघात प्रश्न होते. त्यात लक्ष घातलं. पाण्याचा प्रश्न, शैक्षणिक चळवळ, उद्योगधंदे यात लक्ष घातलं. त्याचा परिणाम आज देशामध्ये, संसदेमध्ये बोललं जातं की विकास करायचा असेल तर बारामती पॅटर्न हा विकासाचा पॅटर्न झाला. माझी खात्री आहे की आणखी पाच वर्षानंतर लोक म्हणतील

प्रचंड संकटाच्या काळात सुद्धा अडचणी आणि अडथळे असलेला मतदारसंघ याच्यावर मात करून यशस्वी करण्याचा पॅटर्न कोणता? तर कर्जत जामखेडचा पॅटर्न हा विचार संपूर्ण महाराष्ट्रात गेल्याशिवाय राहणार नाही. हे काम करण्यासाठी आज हा तरुण प्रयत्नांची पराकाष्टा करतोय. जे लोक सत्तेत होते, विधिमंडळात होते. आज सत्ता असेल अथवा नसेल पण ज्या भागातील जनतेने सत्ता दिली त्यांच्यासाठी काही होत असेल तर त्याला मदत करणं हे तर कर्तव्य आहे पण मदत करणे शक्य नसेल तर त्यात अडथळा आणू नका. या




तालुक्यामध्ये काही नवीन होत आहे असं म्हटल्यावर त्यात अडथळा आणायचा आहे. त्याला स्थगिती आणायची आहे. उभं करण्यासाठी अक्कल लागते, उभं केलेलं उद्ध्वस्त करायला अक्कल लागत नाही. हे लोकांना आता पटलेलं आहे. उभं करण्याची ताकद आणि धमक ज्याच्यामध्ये आहे त्याच्या पाठीमागे उभे राहायचा निकाल तुम्ही लोकांनी घेतला ते चित्र आज या ठिकाणी दिसतय याचा मला मनापासून आनंद आहे.

महाराष्ट्राचा चेहरा बदलायचा आहे. यासाठी रोहितला चिंता करण्याची गरज नाही. दोन महिन्यांनी महाराष्ट्राचं चित्र बदलेल. दोन दिवसापूर्वी मी साताऱ्याला होतो, त्यानंतर मी कराड, चिपळूण या ठिकाणी होतो, त्यानंतरच्या काळात मुंबईला आलो, मुंबईवरून इथं आलो. दोन-अडीच दिवसात मी एवढा प्रवास केला. एवढा प्रवास कशासाठी? ठिकठिकाणी विकासासंबंधी नवा चेहरा लोकांना विश्वासात घेऊन कसा करता येईल याचा विचार आम्ही लोक बसून करतोय.

तुम्हा लोकांच्या पाठिंब्याने मला खात्री आहे, की दोन महिन्यानंतर महाराष्ट्राचा चित्र बदलल्यानंतर त्याचा परिवर्तन झाल्यावर महाराष्ट्राचा एकूण एक भाग हा विकासाच्या दृष्टीने, प्रगत वेगाने कसे येत नाही हे आम्ही सगळेजण मिळून बघू. तुमच्या पाठिंब्याने हे चित्र बदलेल. ज्यावेळी दोन वेळा महिन्याची मुदत मागतो त्यावेळी ते मी काम एकटा करणार नाही त्यासाठी मला तरुणांची साथ पाहिजे. ती तरुणांची साथ देण्याची कुवत ती दृष्टी कोणामध्ये असेल तर कर्जत जामखेडचा आजचा आमदार यात कधी कमी पडणार नाही. त्याच्या पाठीशी तुम्ही उभे राहा. माझी खात्री आहे की तुमच्या आयुष्यातलं स्वप्न हे पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. त्याच कामाला तुमची माझी सगळ्यांची शक्ती त्याच्या पाठीशी उभी करू. ठिकठिकाणी असे जे जे तरुण असतील त्या सगळ्यांना प्रोत्साहित करू . त्यांना मोठं करू आणि महाराष्ट्र मोठा करण्याचं काम आपण मिळून करू, ही खात्री या ठिकाणी व्यक्त करतो.

■■

जाता जाता
फिरस्ता

# चला मुरारी हिरो बनने

युक्रेनचे अध्यक्ष झेलिन्स्कि नुकतेच अमेरिकेला गेले होते. तेथे त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेला उद्देशुन संबोधन केले.

या त्यांच्या संबोधनात त्यांनी एक फारच सुरस कहाणी सांगितली. कहाणी म्हणण्यापेक्षा एक युध्दग्रस्त देशाचे अध्यक्ष म्हणून त्यांना येत असलेल्या अनुभवाचे कथन केले.

रशिया आणि युक्रेनदरम्यानच्या युध्दाला आता दोन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. अद्याप ते थांबलेले नाही. युक्रेनच्या तुलनेत रशिया बलाढ्य आहे. त्यामुळे युक्रेनला आता या दीर्घकाळ युध्दाचे चटके जाणवू लागले आहेत. म्हणूनच युध्द थांबविण्यासाठी झेलिन्स्कि आता अगदी मेटाकुटीला आलेले आहेत. जगातल्या सर्व प्रमुख देशांना त्यांनी आतापर्यंत असंख्य आवाहने केली परंतु दोन वर्षांपूर्वी युध्द थांबविण्यासाठी तयार केलेल्या तोडग्याबाबत (जो युक्रेनला मान्य आहे) कुणीही बोलत नाही आणि नवनवीन तोडगे काढून वेळकाढूपणा चालू असल्याचे त्यांनी महासभेसमोरच्या भाषणात सांगितले. या नवनव्या तोडग्यांमुळे युक्रेनचे नुकसान आणि हानि वाढत आहे आणि रशियाला मात्र कोणतीही झळ पोहोचताना दिसत नाही व त्याचा फायदा रशियालाच होत असल्याचा आरोप त्यांनी या भाषणात केला.






झेलिन्स्कि यांची चिंता किंवा त्रागा समजण्यासारखा आहे. अर्थात आज त्यांच्या देशावर जी पाळी आली आहे त्यास ते व त्यांची अपरिपक्व धोरणेच कारणीभूत आहेत. रशियासारख्या बलाढ्य शेजाऱ्याबरोबर शांततापूर्ण संबंध राखण्याऐवजी त्यांनी अमेरिकेच्या नादी लागून रशियाच्या खोड्या काढण्यास सुरुवात केली आणि मग रशियाने इंगा दाखवायला सुरुवात केल्यानंतर आता त्यांची गोची होऊन बसली आहे.

इतके दिवस अमेरिकेने मदत केली पण आता हात आखडता घेतला आहे. डोनाल्ड ट्रंप यांनी तर झेलिन्स्कि हे त्यांच्या प्रत्येक अमेरिका भेटीत शस्त्रास्त्रे आणि लाखो डॉलर्सची मदत मागायला येत असतात अशी टीका केली होती. थोडक्यात अमेरिकेच्या उचकवण्यावरुन सीमेला सीमा लागून असलेल्या शेजारी देशाबरोबर उखाळ्यापाखाळ्या काढण्याची किंमत झेलिन्स्कि मोजत आहेत.

शेजारी देशांशी संबंध द्विपक्षीयच असले पाहिजेत. त्यामध्ये अन्य कुणाचा हस्तक्षेप असू नये असा जो सर्वसाधारण नियम आहे त्याचे पालन झेलिन्स्कि यांनी केले नाही आणि अमेरिकेसारख्या पाताळयंत्री महासत्तेच्या नादी लागून त्यांनी आपले वाटोळे करुन घेतले आहे.


भारताचे वर्तमान राज्यकर्ते झेलिन्स्किंच्या वाटेनेच चालले आहेत की काय अशी शंका कधीकधी येते.

कारण अमेरिकेच्या प्रोत्साहनाने चीनबरोबर ज्या कुरापती सुरु आहेत त्याचे स्वरुप युक्रेन व रशियासारखेच आहे. किंबहुना आता आंतरराष्ट्रीय मंचांवर व राजकारणात भारताची गणना अमेरिकेचा हस्तक देश म्हणून होताना दिसू लागली आहे हे एक दुर्दैव आहे.

हे थोडे विषयांतर झाले. परंतु झेलिन्स्कि यांनी शांततानिर्मितीसाठी सुरु असलेल्या विविध देशांच्या प्रयत्नांमधील फोलपणावर देखील टीका केली.

जे देश शांततेसाठी प्रयत्न करीत आहेत त्यांच्याबद्दल बोलताना त्यांनी एका फार मोठ्या वास्तवाचा पर्दाफाश केला.

ते म्हणाले, ''काही शांततेचे सौदागर(व्यापारी) हे त्यांना नोबेल पारितोषिक मिळण्याचे स्वप्न उराशी बाळगून मध्यस्थीचे प्रयत्न करताना दिसत आहेत. '' (सम पीस ट्रेडर्स हॅव नोबेल ड्रीम).




ही व्यथा बोलून दाखवून त्यांनी असल्या अर्धवट प्रयत्नांनी फायदा हा रशियाचाच होणार असल्याचे सांगितले आणि युक्रेनची आगतिकता व्यक्त केली.

आता नोबेलचा हव्यास मनात ठेवून शांततेचे प्रयत्न करणारे कोण असावेत ?

अगदी अलीकडचा ताजा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये भारताच्या पंतप्रधानांचा समावेश होता. मग झेलिन्स्कि यांच्या म्हणण्याचा रोख त्यांच्याकडे होता काय ?

आता देशात सर्व काही मिळून झाल्यानंतर कुणाला नोबेल पारितोषिकाची चटक निर्माण झाली असेल तर त्यात नवल काही नाही. असती एखाद्याला सवय की बड्याबड्या गोष्टींची स्वप्ने बघण्याची, कारण स्वप्ने बघायला पैसे पडत नाहीत. किंबहुना परदेशी नेत्यांना मिठ्या मारणे, बळजबरीने आलिंगन देणे हाही बहुधा या प्रयत्नांचा भाग असू शकतो. परंतु परराष्ट्र धोरण, परराष्ट्र नीती ही दिखाऊ, मिठ्यामारू आणि उथळ व सवंग नसते. डिप्लोमसी किंवा मुत्सद्देगिरी आणि परराष्ट्र नीती हे अतिगंभीर विषय आहेत. सुमारबुध्दीच्या पलीकडचे आहेत. त्यामुळे झेलिन्स्कि यांच्या भाषणाचा रोख असा काही असेल तर ती बाब दखलपात्र ठरतेच परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या दृष्टीने शरमेची मानावी लागेल.

भारताच्या वर्तमान पंतप्रधानांनी त्यांना नोबेल पारितोषिकाची लालसा असल्याचे किमान एकदा तरी जाहीरपणे बोलून दाखविले आहे. त्यामुळेच केवळ नोबेलच्या लालसेने ते असे काही प्रयत्न किंवा मध्यस्थीचा देखावा करीत असतील तर खरोखरच तो एक आंतरराष्ट्रीय कुचेष्टेचा व टवाळीचा विषय ठरेल आणि ती भारतासाठी मानहानि असेल.

वर्तमान पंतप्रधानांनी नोबेल मिळविण्याची त्यांची इच्छा प्रदर्शित केलेली होती. २०१४ मध्ये ते नुकतेच सत्तारूढ झाले होते. आधीच्या मनमोहनसिंग सरकारने बांगला देशाबरोबर लँड बाऊंडरी ॲग्रीमेंटची सर्व प्रक्रिया पूर्ण केलेली होती आणि त्यावर केवळ दोन्ही देशांच्या पंतप्रधानांच्या सह्या होणे बाकी होते.

परराष्ट्र नीती किंवा धोरण ही निरंतर प्रक्रिया असल्याने पंतप्रधान बदलले तरी त्यात शक्यतोवर फारसा खंड पडत नाही. त्यानुसारच नवे पंतप्रधान आणि बांगला देशाच्या त्यावेळच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी या ऐतिहासिक करारावर सह्या केल्या. या करारामुळे उभय देशांच्या सीमा आखणीमध्ये ज्या काही व्यावहारिक चुका झाल्या होत्या त्या दुरुस्त करण्यात आल्या होत्या. यामुळे काही भूप्रदेश आणि लोकसंख्येची अदलाबदल करण्यात आली होती. अत्यंत शांततापूर्ण मार्गाने हा करार झाला. परंतु इतरांनी केलेल्या कामाचे श्रेयही स्वतःच घेण्याच्या सवंग वृत्तीनुसार या कराराचे श्रेयही पंतप्रधानांनी स्वतःकडेच घेतले.  त्यालाही काही हरकत नाही. परंतु करारावरील सह्यांनंतर बोलताना त्यांनी त्यांच्या मनातली खरी इच्छा बोलून दाखवली.

दोन शेजारी देश अशा मैत्रीपूर्ण रीतीने संवेदनशील अशा मुद्यांवर तोडगा काढतात हे असाधारण मानावे लागेल. जगात इतरत्र असे काही घडले असते तर त्या पंतप्रधानांची नोबेल

पुरस्कारासाठी शिफारस झाली असती असे भारताचे पंतप्रधान म्हणाले.

पहा, कुणाला कशाची इच्छा असावी.

सांगायचा मुद्दा हा की भारतीय पंतप्रधानांच्या मनात नोबेल पारितोषिकाची लालसा आहे हे निश्चित.

देशविदेशात ते ज्या पध्दतीने स्वतःला मिरवीत असतात, जगातला सर्वाधिक लोकप्रिय नेता म्हणून सर्वत्र प्रचार करीत असतात आणि त्यांचे अंधभक्त जगभरात त्यांच्या वैश्विक लोकप्रियतेचे जे दावे प्रसारित करीत राहतात त्यामागे हीच लालसा असावी. त्यांचे दुर्दैव असे की कुणीही त्यांना गांभीर्याने घेत असावे असे वाटत नाही.

जो बायडेन हे जाहीरपणे भारताची चेष्टा करताना भारताचे पंतप्रधान त्याला आक्षेपही न घेता कोडगेपणाने हसत राहतात यावरुनच भारताची घसरती किंमत लक्षात आल्याखेरीज रहात नाही. अशा सुमारबुध्दी नेत्यांमुळे देशाची प्रतिमा खालावते.

तरीही, हे असले नेते नोबेलची स्वप्ने बघत राहतात हे त्यांच्या सवंग व उथळपणाचे लक्षण आहे.

चला मुरारी हिरो बनने असा हा प्रकार झाला.

देशाला असल्या नेत्यांपासून वाचविण्याची गरज आहे.

## युध्दखोर इस्त्रायल

नोबेल पारितोषिकासाठी जर कुणाला लालसा उत्पन्न झाली असेल तर त्या नेत्याने इस्त्रायलने गाझा पट्टीसह सीरिया, लेबानन आणि इराणविरुध्द जो हिंसक संघर्ष सुरु केला आहे तो थांबवून दाखवावा.

हमास संघटनेतील दहशतवादी घटकांनी इस्त्रायलची आगळीक केली. इस्त्रायलच्या निरपराध नागरिकांना ओलीस ठेवण्याचा अगोचरपणा केला. याच्या प्रत्युत्तरादाखल इस्त्रायलने पॅलेस्टिनी नागरिकांचे शिरकाण सुरु केले आहे. म्हणजे मूठभर दहशतवाद्यांच्या माथेफिरु कृत्याची शिक्षा संपूर्ण देशाला देण्याचा हा अतिरेकी प्रकार आहे. इस्त्रायलच्या या संघर्षात साठ-सत्तर हजार निरपराध पॅलेस्टिनी नागरिक मृत्युमखी पडले आहेत.

पॅलेस्टाइनला नकाशावरुन नष्ट करण्याच्या राक्षसी महत्वाकांक्षेने इस्त्रायलचे पंतप्रधान नेत्यनाहू पछाडलेले आहेत. हिंसाचाराच अतिरेक त्यांनी चालविला आहे.



अमेरिकेची अर्थव्यवस्था ज्यू लोकांच्या ताब्यात असल्याने कोणत्याही अमेरिकन अध्यक्षाला इस्त्रायलची तळी उचलण्याखेरीज गत्यंत नसते. त्यामुळे इस्त्रायलकडून गाझामध्ये नरसंहार सुरु असूनही अमेरिका मौन बाळगून आहे.

आता लेबाननमधील हेज्बुल्ला संघटनेने देखील इराणच्या मदतीने इस्त्रायलवर हल्ले सुरु केले आहेत. त्यामुळे





इस्रायलने लेबानन विरुध्दही युध्द सुरु केले आहे.

हेज्बुल्लाच्या प्रमुख नेत्यांना मारण्यात इस्रायलला यश आल्याने हेज्बुल्लाने सूडाची कृति सुरु केली आहे. त्यांना इराणचा पाठिंबा आहे. या परिस्थितीत इस्रायल अधिकाधिक हिंस्र होऊन अविवेकी कृति करीत सुटला आहे. याचे सूत्रधार नेतन्याहू आहेत.





अमेरिकेत अध्यक्षीय निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. ज्यू समाजाची मोठी मते असल्याने इस्रायलच्या नरसंहाराबद्दल हरकत असूनही केवळ निवडणूक जिंकण्यासाठी इस्रायलला न दुखावण्याचे धोरण सुरु आहे. यामुळे नेतन्याहू यांच्यासारखा रक्तपिपासू नेता सोकावत चालला आहे.

खुद्द इस्रायलमध्ये नेतन्याहू यांच्या विरोधात वातावरण आहे. केवळ युध्द सुरु असल्याने तेथे नेतन्याहू स्वतःचे आसन शाबूत ठेवून आहेत. युध्द संपताक्षणी ते पदच्युत होऊ शकतात आणि त्यामुळेच ते युध्दाची अविचारी व्याप्ती वाढवत सुटले आहेत. त्यामुळे आता इस्रायलमधील जनतेनेच या नेतन्याहू नावाच्या अविवेकी नेत्याला रोखले तरच युध्द थांबू शकेल. अन्यथा पश्चिम आशियातील या भागात युध्दाची व्याप्ती वाढत जाऊ शकते. म्हणूनच रशिया व युक्रेनमधील युध्द थांबविण्याचे प्रयत्न करणाऱ्यांनी इस्रायलला समजावून युध्दबंदी करण्याचे प्रयत्न करावेत अशी अपेक्षा आहे.

झेलिन्स्कि यांची समस्या ही आहे की इस्रायलच्या युध्दखोरपणामुळे या भागात सुरु झालेल्या संघर्षाची व्याप्ती गंभीर स्वरुपात वाढत असल्याने जगाचे लक्ष या ठिकाणच्या घडामोडींकडे लागलेले आहे. त्यामुळे रशिया व युक्रेनदरम्यानच्या संघर्षाचे प्राधान्य दुय्यम झाले आहे. त्यामुळे आर्थिक हालाखीने बेजार झालेल्यया झेलिन्स्कि यांचा त्रागा वाढत चालला आहे. याचा परिणाम त्यांच्या देशांतर्गत राजकारणावरही होत आहे.

अलीकडेच त्यांच्या या युध्दखोर भूमिकेच्या विरोधात त्यांच्याच काही मंत्र्यांनी विरोध केला. त्याबरोबर झेलिन्स्कि यांनी मंत्रिमंडळ बरखास्त करुन नवीन चेहऱ्यांचा समावेश असलेल्या मंत्रिमंडळाची स्थापना केली.

न जाणो इस्रायलमध्येही हे घडू शकते. कारण कोणतीही जनता दीर्घकाळ युध्दाच्या अनिश्चित आणि असुरक्षित अशा छायेत राहू शकत नाही.

इस्रायलमध्ये तर नेतन्याहूंच्या मंत्रिमंडळातील काही सहकारी युध्दाची व्याप्ती वाढविण्याच्या विरोधात आहेत. सर्वसाधारण नागरिकही युध्दाच्या विरोधात आहेत. अमेरिकेत देखील आता या इस्रायलच्या युध्दखोर वृत्तीच्या विरोधात लोक आक्रोश करु लागले आहेत. त्यामुळे झेलिन्स्कि यांच्यासाऱखीच नेतन्याहू यांच्यावर मंत्रिमंडळ बरखास्त करण्याची पाळी येते की काय याचीही चर्चा आहे.

एक मात्र खरे की इस्रायल, इराण, लेबानन आणि हमास यांच्या संघर्षात हजारो निरपराध नागरिकांचे बळी गेले आहेत आणि जात आहेत. ही मानवतेची हत्या आहे. यामध्ये माघार घेण्यास कुणीच तयार नाही अशी

स्थिती आहे. उलट अमेरिकेने इस्त्रायलला लष्करी मदत पुरविण्याची तयारी दाखवली आहे.

अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीतील मतांसाठी ही भूमिका घेतली जात आहे. नेतन्याहू यांना स्वतःची पंतप्रधानपदाची खुर्ची वाचविण्यासाठी युध्द चालू ठेवायचे आहे.

हमास, हेज्बुल्ला यांन इस्त्रायलला धडा शिकवायचा आहे आणि ते आततायी कारवाया करुन इस्त्रायलला चिथावत आहेत. इराणने हेज्बुल्लाला हाताशी धरलेले आहे.

थोडक्यात या संघर्षात किंवा रक्तपाातात निरपराध नागरिकांचे बळी जात आहेत हे कुणाच्याही ध्यानात येईनासे झाले आहे.

जणू जगातली मानवता नष्ट झाली आहे अशी ही स्थिती आहे. नेतन्याहू यांनी गाझामध्ये इस्त्रायलच्या विरोधातील एक व्यक्तीही जिवंत सोडण्यात येणार नाही अशी शपथ घेतलेली आहे. हा शुध्द रक्तपिपासूपणा आहे. या अविचारीपणाच्या वातावरणात विवेक आणि मानवता दोघांचाही बळी जात आहे. नेतन्याहू आणि भारताच्या पंतप्रधानांचे म्हणे फार जवळचे संबंध आहेत.

भारताचे पंतप्रधान तर नेतन्याहू यांना त्यांच्या खासगीतल्या नावाने म्हणजे बिबि नावाने पुकारतात. आता या बिबिंना युध्द थांबविण्यासाठी ते गळ का घालत नाहीत असा प्रश्न आहे.

भारताच्या पंतप्रधानांना अमेरिकेप्रमाणेच इस्त्रायलचेही विलक्षण प्रेम आहे. ते नेहमीच उतू जात असते. मग मानवतेला काळिमा फासणार हा संघर्ष थांबविण्यासाठी त्यांनीही प्रयत्न करायला हरकत नसली पाहिजे. परंतु ती आपली कुवत नाही हे बहुधा त्यांना कळून चुकले असावे आणि त्यामुळेच ते गप्प आहेत. एकेकाळी भारताने पॅलेस्टाइनच्या मुक्तिसंग्रामाला पाठिंबा दिला होता. परंतु आताच्या सरकारने तर पूर्णपणे इस्त्रायलला पाठिंबा देण्याची भूमिका घेतलेली आहे. पॅलेस्टाइनपासून फारकत घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. हा भारतीय परराष्ट्रनीतीमधील एक गुणात्मक बदल मानावा लागेल. अमेरिकाधार्जिणेपणाचा हा आणखी एक पुरावा समोर आला आहे. भारताने नेहमीच स्वतंत्र अशा परराष्ट्रनीतीचा अवलंब केलेला होता. वर्तमान राज्यकर्त्यांनी मात्र अमेरिकेच्या मांडीवर जाऊन बसण्याचे आणि अमेरिकेच्या गोटात जाऊन अमेरिकेचे मांडलिकत्व मान्य केल्याची भूमिका घेतलेली आढळते. हे भारताच्या हिताला घातक आहे.

असे राज्यकर्ते भारताचे हितचिंतक आहेत असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल.








## जो बायडेन यांचा विसराळूपणा की आणखी काही ?

नुकतीच स्वघोषित दैवी अवतारी पुरुष उर्फ ब्रह्मांडनायकांनी अमेरिकेला भेट दिली.


अमेरिकेला भेट देण्याची ते एकही संधी सोडत नाहीत. कारण भारत देश अमेरिकेच्या दावणीला जास्तीतजास्त कसा बांधता येईल यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत.

भारताच्या स्वतंत्र परराष्ट्रनीतीचा त्याग करुन अमेरिकेचा सहाय्यक देश म्हणून जागतिक स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांनी भारताला बसविले आहे.

ज्या प्रमाणे युक्रेनला रशियाच्या विरोधात अमेरिका मदत करील अशी आशा होती त्याचप्रमाणेच दैवी अवतारी पुरुषांनाही चीनच्या विरोधात अमेरिका मदत करील अशी भाबडी आशा असावी. अमेरिकेच्या लांगूलचालनामुळे चीन दबावात राहील अशा भ्रमात ते वावरत आहेत.

त्यामुळेच भारताचा प्रमुख सहभाग असलेल्या ब्रिक्स (ब्राझील, रशिया, इंडिया, चीन व साऊथ आफ्रिका) या प्रामुख्याने आर्थिक व व्यापारी असलेल्या राष्ट्रसमूहापेक्षा त्यांना अमेरिकेचे वर्चस्व असलेल्या क्वाड या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान व भारताचा समावेश असलेल्या चार राष्ट्रांच्या समूहाचे महत्व अधिक वाटताना दिसते. त्यामुळे त्यांना ब्रिक्स राष्ट्रसमूहाकडे सोयीस्कर दुर्लक्षही सुरु केले. ब्रिक्स राष्ट्रसमूह अमेरिकेच्या डोळ्यात खुपत होताच आणि तो कधी मोडता येईल यासाठी अमेरिका प्रयत्नशील राहिला. ते अखेर ब्रह्मांडनायकांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत साध्य झाले. कारण त्यांचे अमेरिका प्रेम हे अवर्णनीय आहे. त्याला प्रेम म्हणण्यापेक्षा त्यात मांडलिकत्वाची आणि महासत्तेपुढे शरणागत आणि समर्पित होण्याची भावना अधिक दिसून येते.

क्वाड (क्वाड्रिलॅटरल) हा चार देशांचा राष्ट्रसमूह २००७ मध्ये स्थापन झाला. परंतु तो अल्पजीवि ठरला कारण २००८ मध्ये ऑस्ट्रेलिया त्यातून बाहेर पडला. २०१७ मध्ये त्याचे पुनरुज्जीवन करण्यात आले. त्यात अमेरिकेचा पुढाकार अशासाठी होता की चीनला पायबंद घालण्याच्या हेतुने अमेरिकेने या राष्ट्रसमूहाचा वापर करण्याचे ठरविले. भारत-प्रशांत महासागरीय (इंडो पॅसिफिक) प्रदेशात व सागरी भागात चीनचे वर्चस्व रोखण्याच्या हेतुने तो स्थापन झाला आहे हे उघड आहे. त्यामुळे या राष्ट्रसमूहात मिरवून चीनला दुखावण्याचा धंदा राज्यकर्त्यांनी सुरु केला आहे. त्याचे परिणाम इतर कुणाला भोगावे लागणार नाहीत परंतु भारताची





अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि
भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी.

सीमा चीनला लागून असल्याने भारतालाच अधिक सहन करावे लागतील हे माहिति असूनही साहसवाद सुरु ठेवण्यात आला आहे.

नुकत्याच अमेरिका दौऱ्यात अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी ज्या काही टिप्पण्या केल्या त्या फारशा चांगल्या नव्हत्या. कदाचित बायडेन यांचे वय आणि विसराळूपणा व प्रकृति अस्वास्थ्य त्याला कारणीभूत आहेत असे सांगून त्यांना संशयाचा फायदा दिला जात आहे. या शिखर परिषदेचे यजमान म्हणून बायडेन यांनी पाहुण्या राष्ट्रप्रमुखांचा परिचय करुन देण्याचा शिष्टाचार असतो. बायडेन यांनी जपान व ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांचा परिचय करन दिल्यानंतर त्यांना मोदींचे नावच आठवेना. आता मी कुणाचा परिचय करुन द्यायचा आहे अशी विचारणा त्यांनी केल्यानंतर त्यांच्या सहाय्यकांची चक्क धावाधाव झाली. मग एका सहाय्यकाने चक्क ध्वनिक्षेपकावरुन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा परिचय अध्यक्ष करुन देतील असे सांगून वेळ मारुन नेली.

बायडेन यांनी भारत-अमेरिका बिझनेस फोरमच्या बैठकीत देखील भारत हा एक फारच लहान लोकसंख्या असलेला लहानसा देश असल्याची टिप्पणी केली. आता त्यांनी हा विनोद केला की उपहास केला हे कळायला मार्ग नाही. आणखी एका ठिकाणी त्यांनी मोदी हे स्वतः कसे बदलले आहेत व त्यांनी भारतातही कसे बदल केले असा एक उल्लेख केला. या त्यांच्या टिप्पण्या अनावश्यक होत्या. या टिप्पण्या ऐकताना मोदींच्या चेहऱ्यावर हास्य होते असे तेथील उपस्थितांनी सांगितले. हा सर्व प्रकारच अनुचित होता.

अमेरिकी अध्यक्षांच्या या आक्षेपार्ह टिप्पण्या आणि स्वतःला स्वाभिमानी म्हणून मिरविणाऱ्या मोदींनी अगदी हसतहसत त्या ऐकून घेण्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

अनेक यूट्यूबर्सनी इंदिरा गांधी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांना शिकविलेला धडा तसेच नंतरच्या काळात रोनॉल्ड रेगन यांना सभ्य पण ठाम भाषेत भारताची भूमिका सुनावण्याचे त्यांचे धाडस हे दाखविणाऱ्या चित्रफिती प्रसारित केल्या आणि मोदी हे कसे हिणकस ठरत आहेत हेही सांगितले.

नोव्हेंबर १९७१ मध्ये इंदिरा गांधी यांनी अमेरिकेला भेट



दिली होती. त्यावेळी रिचर्ड निक्सन अमेरिकेचे अध्यक्ष होते. भारताबद्दल आणि इंदिरा गांधी यांच्याबद्दल त्यांच्या मनात अत्यंत तुच्छ आणि तिरस्करणीय असे भाव असत. त्यावेळी बांगला देश मुक्तिसंग्राम सुरु होता. निक्सन हे पाकिस्तानच्या बाजुने ठाम उभे होते. त्यामुळेही त्यांना भारताबद्दल अजिबातच ममत्व नव्हते.

इंदिरा गांधी या त्यांना भेटण्यास गेल्या असता निक्सन यांनी त्यांना ४५ मिनिटे वाट पाहण्यास लावले. इंदिरा गांधी यांनी संयम पाळून तो अपमान सहन केला.

परंतु त्यानंतर राजशिष्टाचारानुसार दुसऱ्या दिवशी निक्सन



यांनी इंदिरा गांधी यांना जाऊन भेटणे अपेक्षित होते. निक्सन यांनी तो शिष्टाचार पाळला परंतु इंदिरा गांधी यांनीही त्यांना बरोब्बर ४५ मिनिटे ताटकळत ठेवले. भारत हा दुय्यम प्रतीचा देश नाही हेही त्यांनी अमेरिकेला ठणकावले.

निक्सन यांनी पाकिस्तानला रोखण्यास नकार दिल्यानंतर इंदिरा गांधी यांनी चक्क निक्सन यांच्या समोरच अमेरिकन जनतेला मानवतेला काळिमा फासणारे पाकिस्तानकडून बंगाली लोकांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले. निक्सन यांची बोलती बंद झाली.

त्यामुळेच निक्सन आणि त्यांचे खास सल्लागार हेन्री किसिंजर इंदिरा गांधी यांच्याबद्दल अत्यंत अयोग्य व अनुचित अशा टिप्पण्या खासगीत करीत असत अशा विश्वासार्ह नोंदी आहेत.

अमेरिकेने आंतरराष्ट्रीय मंचावर भारताला एकटे पाडण्याचा प्रयत्न करताच इंदिरा गांधी यांनी सोव्हिएत युनियनबरोबर(रशिया) शांतता व मैत्री करार करुन अमेरिकेला अक्षरशः ४४० व्होल्टचा झटका दिला होता. यासंदर्भात किसिंजर यांनी त्यांच्या आठवणीत या कराराबाबत याच शब्दात वर्णन करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर १९७५ मध्ये त्यांनी भारताचा पहिली अण्विक चाचणी करुन अमेरिकेला आणखी एक धक्का दिला होता.

थोडक्यात भारताच्या सर्वच पंतप्रधानांनी भारताची शान राखण्यात कधीही कुचराई केली नाही.

मनमोहनसिंग पंतप्रधान झाल्यानंतर ते अमेरिकेच्या कच्छपि लागतील असा प्रचार करण्यात आला होता. परंतु त्यांनी देखील अमेरिका आणि चीन बरोबरच्या संबंधांमध्ये उचित असा समतोल राखला होता. एवढेच नव्हे तर त्यांच्या काळात भारताचे चीनबरोबर अत्यंत चांगले संबंध राहिले असे नमूद करण्यात येते. येथे मुद्दा एवढाच आहे की जो



बायडेन यांनी कोणत्या कारणाने का होईना भारताबाबत व भारतीय पंतप्रधानांबाबत हलक्या टिप्पण्या करणे अपेक्षित नाही. त्याहून अधिक महत्वाचे म्हणजे भारतीय पंतप्रधानांनी देखील त्याला प्रत्युत्तर न देता सहन करणे अधिक आक्षेपार्ह आहे.

■■

## मोदी सरकार शेतकरीविरोधी व उद्योगपतीधार्जिणे

आज बऱ्याच वर्षांनी तुम्हा सगळ्यांचं दर्शन घेण्याची संधी मला मिळाली. भर सकाळी शेतीवाडीची कामं असताना सुद्धा तुम्ही मोठ्या संख्येने उपस्थित राहिलात याबद्दल मी आपल्या सगळ्यांचा आभारी आहे. शिंदखेडा हा परिसर कष्टकरी शेतकऱ्यांचा परिसर आहे. काळ्या आईची सेवा करायची, उत्पादन मिळवायचं, संसार चालवायचा आणि समाजाला शक्ती देण्याची महत्त्वाची कामगिरी करायची हे काम आमचा शेतकरी राजा सतत करत असतो.

अलीकडच्या काळात जे राज्यकर्ते आहेत, त्यांना शेतीसंबंधी यत्किंचितही आस्था नाही. त्यांची अशी अनेक धोरणं सांगता येतील जी धोरणं शेतकरी हिताची नाहीत. आजच्या भाषणांमध्ये कांद्याचा उल्लेख झाला. कांदा एकादृष्टीनं जिरायत शेतकऱ्याचे पीक, सामान्य माणसाचं खाद्य. तुम्ही पिकवलेला कांदा मग तो धुळे जिल्ह्यातला असेल, नाशिकचा असेल, पुणे जिल्ह्यातला असेल, सातारा जिल्ह्यातला असेल, त्या कांदा उत्पादकाला अधिकचे दोन पैसे मिळायला पाहिजेत ही तुमची मागणी रास्त आहे. तो काय मोठा बागायतदार नाही. कांदा पिकवतो, त्या कांद्याला जगाची बाजारपेठ द्यायची असेल तर कांदा निर्यात केला पाहिजे आणि मोदींचे सरकार आलं आणि कांद्याच्या निर्यातीला बंदी घातली. म्हणजे ज्यांनी कष्टाने कांद्याचे पीक घेतलं, दोन पैसे मिळतील म्हणून जगात पाठवायचा निकाल घेतला तर त्याच्यावर बंदी.

आपल्या राज्यात काही भागांमध्ये उसाचं पीक घेतलं जातं. आज हिंदुस्थानामध्ये दोन नंबरचं उसाचं उत्पादन तुमच्या माझ्या महाराष्ट्रामध्ये होतं. उसापासूनपासून साखरनिर्मिती होते, मळीपासून इथेनॉल होतं आणि अन्य पदार्थापासून वीज तयार करता येते आणि मग शेतकऱ्याला उसाची किंमत ज्यादा देता येते. मोदी सरकार आलं आणि ज्या शेतकऱ्यांनी उसातून

# सत्तेचा उन्माद आलेल्यांना जागा दाखवण्याचं काम करा

**शरद पवार**



विविध पूरक उत्पादनं घ्यायचं ठरवलं त्यावर बंधन घातली. त्यावर मर्यादा घातल्या. गहू-तांदूळ हे महाराष्ट्रात, देशात महत्त्वाचं पीक. मोदी सरकारने त्याच्यावरही बंधनं घातली. जे काही तुम्ही पिकवता आणि तुम्हाला घामाची किंमत ज्या उत्पादनावर मिळते ती किंमत तुम्हाला मिळून द्यायची नाही हे सूत्र आजच्या मोदींच्या सरकारने स्वीकारलं आहे. म्हणून आम्ही सांगतो हे मोदी सरकार बळीराजाविरोधी आहे, शेतकरीविरोधी आहे.

दहा वर्ष शेती खात्याचा कारभार मी स्वतः सांभाळला. मी ज्यावेळी शेती खात्याचं काम हाती घेतलं, शपथ घेतली तेव्हा पहिलं काम माझ्याकडे आलं ते म्हणजे अमेरिकेतून गहू आणायचा, परदेशातून तांदूळ आणायचा. मला दुःख झालं. एका शेतकऱ्याच्या कुटुंबात माझा जन्म झाला. माझेही आई-वडील शेती करत होते. हा देश बळीराजांचा देश आहे आणि या देशातल्या सामान्य माणसाला दोन वेळचं गहू-तांदळांसारखं अन्नधान्य हे परदेशातून आणायचं? ही गोष्ट आपल्याला शोभणारी नाही आणि म्हणून ते आव्हान मी स्वीकारलं. गव्हाची, तांदळाची उत्पादकता आणि किंमत वाढवली आणि मला सांगायला अभिमान वाटतो की, जो देश गहू आयात करत होता तो देश २०१४ ला जेव्हा मी त्या खात्याचा काम सोडून दिलं तेव्हा तुम्हा लोकांच्या मदतीने जगातला दोन नंबरचा गहू निर्यात करणारा देश भारत झाला. आमच्या शेतकऱ्यांनी हे कष्ट केले. जो देश परदेशातून तांदूळ आणत होता तो देश जगामध्ये एक नंबरचा तांदूळ पिकवणारा देश झाला. हे तुम्हा लोकांच्या कष्टामुळेच शक्य झालं.

यवतमाळमध्ये एका शेतकऱ्याने कर्जाच्या बोज्यामुळे आत्महत्या केली आणि मी अस्वस्थ झालो. तेव्हा दिल्लीमध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत मी आग्रह केला आणि ७१ हजार कोटी रुपयांचं शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निकाल घेतला. जे कर्ज घेतात आणि वेळेवर फेडतात त्यांना जी १४%, १२% व्याजाचा दर होता तो ६%, ४% पर्यंत आणला, फक्त नियमित परत करणे ही अट घातली आणि कमी व्याजामध्ये कर्ज घेण्याचा निर्णय घेतला. शेतीमालाला किंमत दिली आणि आज जगातला शेती उत्पादन वाढवणारा महत्त्वाचा देश तुमचा-माझा भारत देश आहे.



**धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा येथे १५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी शेतकरी बांधवांना संबोधित केले.**

शिंदखेडला आल्यानंतर अनेक गोष्टी समजल्या, माझे सहकारी संदीप बेडसे आणि बाकीच्या सहकाऱ्यांनीही काही बाबी माझ्या कानावर घातल्या. हा तालुका कष्टकरी शेतकऱ्यांचा तालुका आहे. पण दिसतं काय? इथे गुंडगिरी सुरू झाली. सत्तेचा गैरवापर सुरू झाला. खोटे खटले निरपराध लोकांवर भरायचे आणि दमदाटी करून गुंडगिरीचं राज्य आणू शकतो असं चित्र काही लोकांनी उभं केलं आहे. दुर्दैवानं त्यांना २०-२० वर्ष आमदारकी दिली ती आमदारकी इथल्या लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी न वापरता ती लोकांवर खटले भर, त्यांना तुरुंगात टाक, त्यांना त्रास दे, सत्तेचा गैरवापर कर म्हणून वापरली जात आहे. हेमंत देशमुखांसारखा माझा एक सहकारी, एक प्रामाणिक माजी मंत्री की जो तुम्हा लोकांच्या हिताची जपणूक करण्यासाठी पडेल ते कष्ट करतो, त्यांच्यावर खोटे खटले भरले. जे तुमच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सतत प्रयत्न करत असतात त्या हेमंत देशमुखांना अटक केली जाते, तुरुंगात टाकला जातं याचा अर्थ सत्तेचा गैरवापर कसा केला जातो याचा एक चमत्कारिक उदाहरण या तालुकामध्ये बघायला मिळतं. सत्ता लोकांच्या सेवेसाठी असते पण काही लोकांच्या हातात सत्ता आल्यानंतर



त्या सत्तेचा माज डोक्यात शिरतो आणि एकदा सत्तेचा माज माणसाला आला की तो अशा प्रकारे सत्तेचा गैरवापर करतो.

आपण लोकशाहीवर विश्वास ठेवणारे लोक आहोत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला लोकशाहीत जो अधिकार दिला तो लोकांची सेवा करण्याचा. एका बाजूने लोकांची सेवा करणारे आहेत आणि दुसऱ्या बाजूने सत्तेचा उन्माद आहे. ज्यांना हा उन्माद चढलेला आहे त्यांना खड्यासारखं बाहेर काढायचं. त्यांना त्यांची जागा दाखवायची हे काम या निवडणुकीच्या निमित्ताने आपल्याला करायचं आहे. २०–२० वर्षे आमदारकी पण काही विकास नाही. रस्ते धड नाहीत. शेतीची अवस्था ठीक नाही. मग काय केलं काय ह्या २० वीस वर्षांमध्ये? काही कारखाने काढले? साखर कारखाने काढले? जी कारखानदारी होती तीही बंद केली. नव्या पिढीला एमआयडीसीमधून रोजगार दिला? काय केलं मग? आजूबाजूच्या जिल्ह्यामध्ये प्रगती दिसते, नाशिकमध्ये वेगळं चित्र दिसतं. असं का? कारण गेली २० वर्ष या तालुक्यामध्ये विकासाच्या संदर्भात पावलं टाकली गेली नाहीत.

आज काही लोक सांगतात आम्ही काम करो ना करू , आम्ही आमच्या बहिणींना पंधराशे रुपये दिले. बहिणींचा सन्मान हा या देशांमध्ये प्रत्येकाला आनंद वाटणारा सन्मान आहे. पण आवश्यकता काय? तुम्ही रोजचं वर्तमानपत्रं वाचा. महाराष्ट्रामध्ये रोज वर्तमानपत्र उघडल्यानंतर कुठल्यातरी मुलीवर अत्याचार झाला, कुठे तरी बहिणींवर अत्याचार झाला ही बातमी वाचायला मिळते. पंधराशे रुपये ठीक आहे, पण पंधराशे रुपयांपेक्षा आमच्या बहिणीची अब्रू वाचवणं, त्यांना संरक्षण देणं, तिचं रक्षण करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. पण त्याकडे आजच्या सरकारचं लक्ष नाही. लोकांची फसवणूक सुरु आहे. असा मार्ग घेण्याचा निकाल जे कोणी घेतात त्यांच्याबद्दल काय भूमिका काय घ्यायची हे तुम्ही ठरवायचं आहे.

मला आनंद आहे, आजच्या कार्यक्रमात संदीप बेडसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भजनी मंडळांचा सन्मान केला. महाराष्ट्रात भजनी मंडळांचं विशिष्ट स्थान आहे, आदर आहे. अनेक ठिकाणी आम्ही बघतो, पंढरीची वारकरी मंडळी उन्हातान्हाचा विचार न करता घरदार सोडून पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी चंद्रभागेत स्नान करण्यासाठी पंढरीला जात असतात. त्यांची काही अपेक्षा नसते. पंढरीला जाणं पांडुरंगाचं, दर्शन घेणं, पायरीला नमन करणं ह्यातच त्याला




समाधान मिळतं. वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची मोठी शक्ती आहे आणि तो वारकरी संप्रदाय गावामध्ये आपल्या विचारातून, संतवाणीतून लोकांमध्ये एकवाक्यता निर्माण करतो. लोकांमध्ये एक प्रकारची समभावाची भावना वाढीस लावतो. हे काम ऐतिहासिक आहे आणि ते आमचे वारकरी मंडळी करत असतात.

उजनीचं धरण बांधत असताना चव्हाण साहेबांनी एक गोष्ट सांगितलेली कायम लक्षात राहिली, धरण उभारणीच्या भाषणात चव्हाण साहेब म्हणाले होते, की पांडुरंगा मी तुझी चंद्रभागा अडवतोय, कारण तुझ्या दर्शनाला येणाऱ्या वारकऱ्याच्या शिवारात पाणी यावं आणि त्याची ज्वारी पिकावी आणि त्या ज्वारीच्या कणाच्या दाण्यांमध्ये माझ्या शेतकऱ्याला पांडुरंगा तुझा दर्शन व्हावं म्हणून. जे वारकरी मंडळी संतांचा विचार सांगतात, त्या संतांना आणि त्या संतांचा विचार सांगणाऱ्यांचा सन्मान करण्याचं मोठं काम हे आमचे सहकारी संदीप बेडसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले, त्याबद्दल त्यांना मनापासून मी धन्यवाद देतो. या भजनी मंडळाच्या मार्फत शांततेचा, संयमाचा, समंजसपणाचा संदेश तुम्ही गावामध्ये आपल्या संगीताच्या टाळ मृदुंगाच्या आवाजातून निर्माण कराल, लोकांना प्रोत्साहन द्याल आणि त्यातून महाराष्ट्रात सद्भावनेचं एक वेगळं चित्र उभा राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

आज लोकांना अनेक समस्या आहेत. महागाईसारखे संकट आहे. बेकारीचं संकट आहे. आजचं सरकार तरुणांच्या हाताला काम द्यायला काही पावलं टाकत नाही. आजचं सरकार भगिनींना प्रपंच चालवायला, महागाईतून सुटका करायला जे करायला हवं त्यासाठी उपाययोजना करत नाही. त्यामुळे चुकीच्या लोकांच्या हातामध्ये सत्ता आहे, ती सत्ता उद्या संधी मिळेल त्यावेळेस त्यांच्या हातातून काढून घेणे आणि महाराष्ट्राचं राज्य हे महाविकास आघाडीच्या हातात देणं हे ऐतिहासिक काम तुम्हाला करायचं आहे. मी तुम्हाला शब्द देतो हे राज्य तुम्ही आमच्या हातामध्ये द्या, महाराष्ट्राचा चेहरा बदलल्याशिवाय आम्ही लोक स्वस्थ बसणार नाही, ह्या कामाला तुमची साथ मिळेल एवढी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र!

■■

# अण्णाभाऊंच्या विचारात देशाचं चित्र बदलण्याची ताकद

**शरद पवार**

आज तुम्ही या ठिकाणी कशासाठी एल्गार पुकारला? महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये, सांस्कृतिक जीवनामध्ये, साहित्य जीवनामध्ये ज्यांनी आपल्या कर्तृत्वानं, विचारानं एक इतिहास निर्माण केला, अशा थोर व्यक्तिमत्त्वाची नोंद ही देश पातळीवर घेतली पाहिजे आणि त्यासाठी भारतरत्न यासंबंधीची मागणी आज तुम्ही या ठिकाणी करत आहात. अजिंक्यने सांगितलेली गोष्ट खरी आहे. मला सोलापूरला विचारलं, की कशासाठी तुम्ही ही मागणी करत आहात? मी सांगितलं, की भारतरत्न ही जी पदवी आहे त्याची मला उंची वाढवायची आहे, त्याची प्रतिष्ठा वाढवायची आहे. ती खऱ्या अर्थानं ऐतिहासिक व्हावी आणि ती व्हावी असं वाटत असेल तर शून्यातून जन्मलेला, उपेक्षित कुटुंबातून आलेला आणि विद्वत्ता, साहित्य, कर्तृत्व, संगीत या सगळ्या क्षेत्रामध्ये देशाची उंची दुनियामध्ये वाढवणारा अशी जी व्यक्ती असेल तर त्यामुळे त्या भारतरत्नाची उंची ही दुनियेमध्ये वाढल्याशिवाय राहणार नाही. ती वाढवायची असेल तर अण्णाभाऊ साठे यांना विसरून तुम्ही आयुष्यात कधी पुढे जाणार नाही.

पूर्वी सांगली आणि सातारा एक जिल्हा होता. त्यामध्ये वाटेगावसारख्या गावामध्ये गावाच्या बाहेरील परिसरात एका उपेक्षित कुटुंबामध्ये पाळ्य जन्माला आलं. कुटुंबातील लोकांना प्रचंड आनंद झाला. नामकरण झालं, बाळ वाढत होतं. त्याची वाढ ही कुटुंबियांना, सहकाऱ्यांना आनंद देणारी होती. गरीब होती पण माऊलीला एक गोष्ट आनंद देत होती, की माझं बाळ चांगलं वाढतंय. वाढत वाढत शाळेमध्ये जायचा प्रसंग आला आणि दुर्दैव असं की, ज्या बालकातून साहित्याचा इतिहास





## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळण्यासाठी 'डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया' यांनी मुंबईच्या भायखळा येथे २८ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या जाहीर सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी मांडलेले विचार...

निर्माण होणार आहे त्याचं शालेय शिक्षण फक्त दीड दिवसांचं होतं. दिवस निघून जातात, वर्ष निघून जातात, पोटापाण्याचा प्रश्न आणि त्या सगळ्या कालखंडामध्ये पोटाचा प्रश्न निर्माण झाला तर जायचं कुठे? जायला एकच शहर, त्याचं नाव मुंबानगरी. ही कष्टकऱ्यांची नगरी, घाम गाळणाऱ्यांची नगरी आहे. त्यांच्या घामातून लाखो हातांना काम मिळालं, संपत्तीचे डोंगर उभे राहिले, इतिहास निर्माण झाला. तेव्हा मुंबईमध्ये वाटेगाव पासून पायी या ठिकाणी पदार्पण केलं. हळूहळू समाजामध्ये काम करत असताना मुंबईमध्ये त्या काळात कष्टकऱ्यांची जागा कोणती? मुंबईचं बंदर आणि मुंबईचं गिरणगाव. त्याच गिरणगावात तुम्ही बसलेले आहात. त्या काळामध्ये सगळ्या बाजूने सकाळी भोंगा वाजला की हातात शिदोरी घेऊन आमचा कष्टकरी त्या गिरणीमध्ये जायचा. नंतर अकरा ते बारा तास काम केल्यानंतर भोंग्याने सुट्टी झाली की घरी यायचा. घर म्हणजे चाळीच्या एका खोलीमध्ये दहा ते बारा कष्टकरी राहायचे. जशी त्यांची गिरणीची शिफ्ट तशी राहण्याची शिफ्ट. त्या शिफ्टमधून अनेक दृष्टी असलेले कर्तृत्ववान लोक पुढे आले. त्याच्यामध्ये हिमालयाच्या कर्तृत्वाची उंची असलेली एक व्यक्ती समाजासमोर आली तिचं नाव अण्णाभाऊ साठे. तो सगळा कालखंड संघर्षाचा होता.

तुमच्यापैकी अनेकांनी काही नाव ऐकले आहेत की नाही माहित नाही. मघाशी बोलत असताना स.का.पाटील यांचे नाव तुम्ही घेतलं. तुम्हाला ते माहित आहे? कधी घेतले आहे का नाव? एक काळ असा होता की मुंबईचे राजे कोण म्हटलं तर सका पाटलांचे नाव येतं, ते मोठे नेते होते. त्यांच्याशी काय संघर्ष झाला? त्या काळामध्ये महाराष्ट्र राज्य हे महाराष्ट्र नव्हतं. महाराष्ट्र आणि गुजरात या दोघांचे द्विभाषिक म्हणून राज्य होते. ते राज्य नको आम्हाला मराठी माणसांचे राज्य हवे आहे, ही जनभावना लोकांच्या मनामध्ये होती. मोरारजी देसाई मुख्यमंत्री होते आणि संघर्ष सुरू झाला. त्या संघर्षाला आवर घालण्याच्यासाठी मोरारजी आणि त्यांच्या राज्यकर्त्यांनी बंदुकीचा वापर केला. १०७ लोकं यात हुतात्मे झाले. आज त्यांचे स्मारक हुतात्म्यांचे स्मारक म्हणून आपण त्या ठिकाणी पाहतो. ही जबरदस्त किंमत या देशाच्या कष्टकऱ्यांनी मराठी राज्य व्हावं यासाठी दिली होती.

माझ्यासारखे लोक कॉलेजमध्ये शिकत होते. कधी जाणं-येणं आम्ही करायचो. चळवळीत ते सहभागी होते ही जागृती अनेकांनी केली. पण ही जागृती करण्यासाठी हातात डफ घेतला आणि आपल्या आवाजाने, गीताने संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक माणूस जागा केला. त्यासंबंधी दृष्टी ज्यांनी दाखवली. त्याच्यामध्ये





अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख यांचे नाव घेतल्याशिवाय तो इतिहास कधी पूर्ण होणार नाही. आपल्या पहाडी आवाजाने माणूस जागा केला, स्वप्न आणि अभिमान जागं केलं. संघर्षाच्या या कामासाठी चेतावणी दिली. पार दिल्लीपर्यंत मोर्चा काढला आणि दिल्लीच्या मोर्चामध्ये अण्णाभाऊ, अमर शेख, शाहीर गव्हाणकर अशी अनेकांची नावे घेता येतील त्यांच्या आवाजाने देशाची राजधानी जागृत झाली. हे काय आहे? हे कसलं वादळ आहे? त्यांना सांगण्यात आलं हे वादळ मराठी अस्मितेची मान्यता केंद्र सरकार जोपर्यंत करणार नाही तोपर्यंत थांबणार नाही. कशाचीही अपेक्षा नाही. त्यांना त्यांचे राज्य पाहिजे आणि ते राज्य पाहिजे याचा अर्थ कष्ट करणाऱ्यांचे व घाम गाळणाऱ्यांचे राज्य पाहिजे.

अण्णाभाऊसारखे वाटेगावसारख्या परिसरात वारण्याच्या खोऱ्यामध्ये जन्मलेले त्या व्यक्तीची दृष्टी इथपर्यंत सीमित राहिली नाही. साम्यवादाचा विचार स्वीकारला. अण्णाभाऊंना त्याचा आदर्श होता. साम्यवादी विचार प्रभावीपणाने मांडले. त्याची नोंद जगातील महत्त्वाचा देश त्या काळामध्ये अमेरिकेच्या तोडीचा सोव्हिएत रशिया या देशाच्या नेतृत्वाने सुद्धा घेतली. त्या देशाच्या नेतृत्वाने सोव्हिएत रशियाच्या बाहेर हा विचार मांडण्यासाठी मोलाची कामगारी करणारे जे महान पुरुष आहेत त्याची नोंद घेतली. त्या महान पुरुषांच्या मालिकेमध्ये अण्णाभाऊंचे नाव आले. रशियाने त्यांना निमंत्रण दिले. अण्णाभाऊ हा आमच्या वारण्याच्या खोऱ्यातले सुपुत्र मॉस्कोमध्ये गेला. तिथे जाऊन जे काही त्यांचे लिखाण होते






ते रशियन भाषेत आलं, पोलंड भाषेमध्ये आलं. जगातील १६ ते १७ भाषांमध्ये त्यांचे लिखाण त्या ठिकाणी केले. अण्णाभाऊ एकेकाळी वाटेगाव मधून ओळखले जायचे. जगातील कष्टकऱ्यांच्या देशामध्ये विचारधारेचे पुरस्कार करणाऱ्या घटकांमध्ये अण्णाभाऊंचे नाव त्या ठिकाणी गेलं. भारताचा हा प्रश्न आहे पण त्याहीपेक्षा मोठी भारताची प्रतिष्ठा दुनियेमध्ये वाढवण्याचे काम कोणी केलं? या मालिकेमध्ये आपल्याला जर पूर्तता करायची असेल तर अण्णाभाऊंचे नाव घेतल्याशिवाय ते पूर्ण होत नाही. हे झालं ते त्यांच्या कर्तृत्वाने झाले. अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या, गीतं लिहिली, माणसं जागृत केली. त्यांच्या लेखणीमध्ये एक जबरदस्त शक्ती होती आणि त्या शक्तीच्या माध्यमातून हे काम त्यांनी केलं. 'फकिरा', ज्याला मराठीत साहित्य समजते, साहित्य वाचन यांनी केलं त्यांना त्याची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. अशी एक मोलाची कामगिरी करणारा हा कष्टकऱ्यांचा नेता, घाम गाळणाऱ्यांचा नेता, घामाला प्रतिष्ठा देणारा हा नेता आज या महाराष्ट्रामध्ये पैदा झाला. महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला त्यांचा अभिमान आहे आणि देशाची मराठी भाषेची, साहित्याची, कलेची संस्कृतीची उंची ज्यांनी वाढवली अशा व्यक्तीला भारतरत्न देऊन सन्मानित केलेच पाहिजे ही भूमिका आपल्याला घ्यावी लागणार आहे.

राज्य दुसऱ्यांचे आहे, सांगता येत नाही. भाजपवाल्यांना कष्ट करणाऱ्यांबद्दल किती आस्था आहे हे मी सांगण्याची काही गरज नाही. पण जर का आपण एकत्र झालो, अण्णाभाऊंचा विचार पुढे घेतला त्या विचारांनी पुढे जाण्याचा निकाल घेतला तर माझी खात्री आहे की महाराष्ट्राचे आणि देशाचे चित्र बदलण्याची ताकद अण्णाभाऊंच्या विचारांनी जाणाऱ्या या राज्यातील तुमच्या माझ्यासारख्या लाखो तरुणांच्या सामुदायिक शक्तीतून हा इतिहास आपण निर्माण करू शकतो. त्याची तयारी करायची आहे या भावनेतून आज हे तुम्ही लोकांनी सुरू केला. हे तुमच्या पुरती सिमीत नाही. सबंध महाराष्ट्र त्याच्या मागे उभा करण्याची काळजी, खबरदारी आपण सगळेजण मिळून घेऊ. त्यांचे गीत हे एका प्रकारचा आनंद द्यायचं. माझी मैना! काय सांगायचं त्याच्यात जीवाची काहिली झाली. मला आणखी एक प्रश्न विचारला होता तुमची मैना कुठे आहे? अण्णाभाऊंना तेव्हा कळलं माझ्या विचारांचा एक पाईक त्याचंही दुखणं हेच आहे. हा जो एल्गार तुम्ही पुकारला आहे, मी तुम्हाला एकच सांगतो हा निकाल केंद्र सरकारच्या हातात आहे. राष्ट्रपतींच्या, प्रधानमंत्री यांच्या हातात आहे. आताचा आपला हा महिना दीड महिना दुसऱ्या कामात जरा जाणार. एक काम संपवून आपण इथलं सरकार बदलू, एकत्र बसू. मी तुमच्याबरोबर बसायला तयार आहे. तुम्हा सगळ्यांना घेऊन दिल्लीला जे कोणी राज्यकर्ते असतील त्यांच्या नजरेमध्ये अण्णाभाऊ साठे कोण आहेत? त्यांचे योगदान काय आहे? त्यांच्या योगदानामुळे व त्यांच्या कष्टामुळे आज याची प्रतिष्ठा कशी वाढली? हे त्यांना आपण सांगू आणि भीक म्हणून नाही अधिकार व कर्तृत्व म्हणून या ठिकाणी अण्णाभाऊ साठे यांची ओळख केली पाहिजे आणि ते केली नाही तर लोकशाहीच्या माध्यमातून जेवढे आयुधांचा आधार घेऊन नवीन इतिहास हा निर्माण करण्याचा निर्धार आज या सभागृहामध्ये आपण मिळून करू. मी तुमच्या खांद्याला खांदा लावून अखंडपणाने तुमच्याबरोबर आहे, एवढं या ठिकाणी सांगतो.

■■



# रयतच्या शाळेतील मुलं-मुली दाखवतील कर्तृत्व, बुद्धिमत्ता



**शरद पवार**

आजचा दिवस रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेनंतरचा १३७ वा स्वागताचा दिवस आहे. सामान्य माणसाच्या कुटुंबातील मुला-मुलींना शिक्षणाचे दरवाजे खुले करावे यासाठी एक व्रत घेतलेलं काम अण्णांनी आपल्या आयुष्यामध्ये केलं. अण्णांसमोर काही व्यक्ती आदर्श होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सगळ्यांच्या सत्यशोधक चळवळीचा आणि प्राकृतिक विचाराचा पुरस्कार करण्याचं काम अण्णांनी जीवन रेषा म्हणून स्वीकारली होती. या कामात यश यायचं असेल तर मुलं शिकली पाहिजेत, त्यांच्यासाठी शिक्षणाचे दरवाजे खुले झाले पाहिजेत, साधनं मिळाली पाहिजेत ही भूमिका त्यांनी अंत:करणापासून स्वीकारली. त्याची सुरुवात कुठून करावी यासाठी काले या गावाचा उल्लेख करावा लागेल. हे गाव स्वातंत्र्याच्या चळवळीत संघर्ष करणारं स्वातंत्र्यसैनिकांचं गाव म्हणून ओळखलं जातं. हा सगळा परिसर हा इतिहासाचा भाग झाला. या गावातील ५७ लोकांनी स्वातंत्र्यसैनिकाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आणि त्या संघर्षात सहभागी झाले.

लोकांमध्ये जागृती करणे, सत्यशोधकी विचार लोकांपर्यंत पोहोचवणं यासाठी अनेकांनी कष्ट घेतले. त्याच संदर्भात शांताराम काकडे आणि या गावचे सुपुत्र कै. इस्माईल मुल्ला या दोघांची आठवण या ठिकाणी करून देणे आवश्यक आहे. मुल्ला साहेबांनी आपल्या आयुष्याचा संपूर्ण काळ हा अण्णांचे सहकारी म्हणून झोकून दिला. अशाच या प्रयत्नातूनच काले गावी येथे विद्यालय सुरू व्हावं अशी मागणी त्यांनी अण्णांकडे केली होती. अण्णांनी ती मागणी पूर्ण केली. त्यातून या विद्यालयाचा जन्म झाला.

महात्मा गांधी या देशामध्ये स्वातंत्र्यासाठी



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते २२ सप्टेंबर रोजी सातारा जिल्ह्याच्या कराड तालुक्यातील काले गावात महात्मा गांधी विद्यालय इमारतीचे उद्घाटन झाले. त्यानंतर त्यांनी उपस्थितांना केलेले मार्गदर्शन....**

प्रयत्नांची पराकाष्टा करणारे नेते होते. गांधीजींचे वैशिष्ट्य होतं, की इंग्रज गेले पाहिजे, पण नुसतं इंग्रज जाऊन चालणार नाही तर लोकांच्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी विधायक कार्यक्रम घेणं गरजेचं आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कर्मवीर अण्णा गांधीजींच्या विचाराचे प्रेरक होते. अण्णांनी हा निकाल घेतला, की महात्मा गांधींच्या नावाने मी अनेक विद्यालय काढणार. हा त्यांचा निर्धार पूर्ण करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी शाखा महात्मा गांधीजींच्या नावाने काढल्या. शाखेच्या मालिकेमध्ये काल्याची शाखा सुद्धा आवश्यक येते. ही शाखा महात्मा गांधींच्या नावाने सुरू करण्याचा निकाल हा त्यांनी १९७८ साली घेतला. आजपर्यंत ही शाळा उत्तम प्रकारे काम करते आहे.

आजच्या काळातही शिक्षण आणि त्याचा विस्तार याची गरज आहे. आताच्या काळात नवनवीन आव्हानं येत आहेत. त्याला सामोरे जाण्यासाठी शिक्षणामध्ये गुणवत्ता आणि दर्जा यामध्ये अधिक लक्ष घालण्याची गरज आहे. तंत्रज्ञान आणि इतर नवीन संशोधन याची विचारधारा नव्या पिढीच्या मनामध्ये निर्माण व्हावी याची आवश्यकता आहे. त्यामुळे आम्हा लोकांचा प्रयत्न रयत शिक्षण संस्थेच्या वतीने असा आहे, की आज काल्याला आपण ही वास्तू तयार केली. उत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न करतोय. अण्णांच्या जीवनाचा सबंध इतिहास या ठिकाणी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला समजेल त्याची काळजी आपण या ठिकाणी घेतली. हे करत असताना अजून काही गोष्टी करण्याची गरज आहे. त्यासाठी काही सुविधा या ठिकाणी असण्याची गरज आहे.

आज या ठिकाणी शाळेची इमारत बांधण्यासाठी गावच्या लोकांनी पुढाकार घेतला याचा आनंद आहे. अपेक्षेपेक्षा जास्त रक्कम गोळा केली याचा आनंद आहे. त्यामुळे संस्थेच्या माध्यमातून इतर गोष्टींची असलेली आवश्यकता पूर्ण करण्याचे काम आम्ही केले. यामधून आज ही सुंदर वास्तू या ठिकाणी उभी राहिली. या ठिकाणी विद्यार्थी अनेक दृष्टीने पुढे यशस्वी होतील अशा पद्धतीने तयार झाले पाहिजे. हे पिढी तयार करण्यासाठी इतर उपक्रम हाती घेतली पाहिजे. आज संगणकाचे युग आहे. या युगात आधुनिक संगणक विद्यार्थ्यांना देता येतील का, तसेच संस्थेच्या वतीने यात आणखी काही हातभार लावावा अशा काही गोष्टी आमच्या नजरेसमोर आहेत. मला एका गोष्टीचा आनंद आहे, की काले हे गाव एखादं काम हाती घेतल्यानंतर ते पूर्ण केल्याशिवाय शांत राहत नाही, स्वस्थ बसत नाही. आज तुमच्या गावचा लौकिक आहे. संस्थेच्या शाखेत आणखी ज्या सुधारणा करायच्या आहेत त्या मोहिमेशी बांधलेले विकास पाटील आणि आमच्या संस्थेचे दुसरे शाखाप्रमुख यांनी काही मागणी आमच्याकडे केली. त्यासाठी किमान ५० लाखाच्या निधीची आवश्यकता आहे. संस्थेच्या तसेच अन्य मार्गाने या कामासाठी एक कोटी रुपये आम्ही उभे करून देऊ. एक चांगली वास्तू आज या ठिकाणी झाली. मुलांना उत्तम प्रकारच्या शिक्षणासाठी सुविधा द्यावी तसेच आधुनिकतेचा आधार घेऊन अधिक चांगली सुविधा त्यांना देऊ. आज देश पातळीवर आमच्या शाळेची बाहेर पडलेली मुलं-मुली आपलं कर्तृत्व आणि बुद्धिमत्ता दाखवतील अशी त्यांची तयारी आम्ही करून घेऊ, हीच खात्री सर्वांना देतो.



घंटाकर्ण




## गोमाता रक्षकांना ईशान्य भारतात मज्जाव

सत्तारूढ भाजपचे एक संत आहेत.

त्यांचे नाव शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती.

त्यांनी गौध्वज स्थापना भारत यात्रा सुरु केली आहे.

या यात्रेचे ध्येय उघड व स्पष्ट आहे.

गायीला राष्ट्रमातेचा दर्जा देणे आणि गोहत्या प्रतिबंधक कायदा सर्व राज्यांनी संमत करुन लागू करावा या दोन प्रमुख मागण्यांसाठी ते भारतभ्रमण करीत आहेत. याच भारत भ्रमण यात्रेत त्यांनी त्यांचा मोर्चा ईशान्य भारताकडे वळविला. या भागात त्यांनी यात्रा नेण्याचे ठरविले खरे परंतु अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि मेघालय या तीन राज्यांनी त्यांच्या भारत यात्रेला परवानगी नाकारली. त्यांच्या यात्रेला या तीन राज्यांनी प्रवेशबंदी केली आहे.

या तिन्ही राज्यात भाजप व त्यांच्या मित्रपक्षांची सरकारे आहेत येथे हे लक्षात ठेवावे लागेल.

अरुणाचलचे मुख्यमंत्री पेमा खांदू हे भाजपचे आहेत हेही येथे नमूद करावे लागेल. अरुणाचल विधानसभेत ६० पैकी ४६ आमदार भाजपचे आहेत.

नागालँडमध्ये भाजपचा मित्रपक्ष नॅशनॅलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी (एनडीपीपी) आणि मेघालयात नॅशनल पीपल्स पार्टी(एनपीपी) चे सरकार आहे. हे प्रादेशिक पक्ष भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीत आहेत.

ईशान्य भारतातील राज्यांमध्ये खाद्यसंस्कृति भिन्न आहे. या राज्यांमध्ये मांसभक्षण निषिध्द नाही. गोवंशातील प्राण्यांचे मांसही येथे नियमितपणे खाल्ले जाते. मूलतः ही राज्ये आदिवासीबहुल राज्ये आहेत आणि ते आपली संस्कृति अत्यंत निर्धाराने जपत असतात. त्यामुळेच त्यांनी या स्वामींच्या गौध्वज स्थापना भारतयात्रेला नुसता विरोध केलेला नाही तर चक्क या स्वामींना विमानतळांवरुन बाहेर देखील पडू न देता त्यांची परत पाठवणी केली.

स्वामींना हा धक्का होता.

परंतु करणार काय ? आपलेच दात आणि आपलेच ओठ ! खरे तर आपलेच पोट म्हणावे लागेल कारण त्यांच्या यात्रेचा संबंध पोटाशी निगडित म्हणजेच खाद्य भक्षणाशी निगडित होता. अमुक मांस खाऊ नये वगैरे वगैरे.

राजकीयदृष्ट्या भाजपच्या केंद्रीय नेतृत्वालाही ईशान्य भारतातल्या राज्यांना दुखावता येणार नाही.

त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी आणि खाद्य संस्कृति ही भिन्न आहे हे भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला मान्य करावे लागेल अन्यथा हट्ट आणि दुराग्रहाने या



गोष्टी लादण्याचे प्रयत्न केल्यास तेथे बंडखोरी होऊ शकते. त्यामुळेच या स्वामींना मुकाट्याने या तीन राज्यांमधून काढता पाय घ्यावा लागला.

आधीच भाजपची केंद्रातील अवस्था राजकीयदृष्ट्या पंगु झालेली असल्याने आणि प्रादेशिक पक्षांच्या पाठिंब्यावर सरकार चालवावे लागत असल्याने आता नव्याने कुणा प्रादेशिक पक्षांबरोबर पंगा घेण्याच्या अवस्थेत मोदी-शहा जोडगोळी नाही. त्यामुळेच या तीन राज्यांनी या गौध्वज यात्रेवर बंदी घालूनही जोडगोळी शांत बसून आहे.

हा काळाचा महिमा आहे.

## हरयाणात भाजप बचावात

हरयाणातील निवडणुकीचे निकाल काहीही लागले तरी यानिमित्ताने एक गोष्ट ठळकपणे समोर येते.

नरेंद्र मोदींनी केवळ त्यांचे निकटचे मित्र या एकमेव निकषावर कोणताही जनाधार नसलेल्या व पंजाबी निर्वासित असलेल्या मनोहरलाल खट्टर यांना हरयाणावर तब्बल नऊ वर्षे लादले त्याची किंमत मोजण्याची पाळी आता भाजपवर आली आहे.

हरयाणात २०१४ मध्ये प्रथमच भाजपचे सरकार सत्तेत आले.

हरयाणातील राजकारणावर जाट समाजाचे वर्चस्व आहे आणि या समाजाला डावलून मोदींनी खट्टर या बिगर हरयाणवी नेत्याला मुख्यमंत्रीपदी नेमले. खट्टर हे हरयाणाचेच रहिवासी असले तरी ते मूळचे हरयाणवी नाहीत.

फाळणीच्या वेळी जे निर्वासित आले त्या कुटुंबांमध्ये सध्याच्या पाकिस्तानातील पंजाब प्रांतातील पंजाबी मंडळीही होती. त्यातील काही कुटुंबे पंजाब ऐवजी हरयाणात स्थायिक झाली. खट्टर अशाच निर्वासित कुटुंबातील आहेत. ते मूळ पंजाबी आहेत.



पंजाबमधून हरयाणा वेगळा झाल्यानंतर दोन्ही राज्यांमधील सामाजिक भावना तीव्र असणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच वेगळा हरयाणा झाल्यानंतर तेथे हरयाणातील नेत्यांकडेच राज्यांचे नेतृत्व राहिले. परंतु मोदी यांचा खाक्याच निराळा असल्याने त्यांनी हरयाणाचे नेतृत्व मनोहरलाल खट्टर या पंजाबी व्यक्तीकडे दिले.

खट्टर हे हरयाणातील राजकारणात फारसे वजनदार मानले जात नाहीत.

त्यांची एकमेव पात्रता म्हणजे मोदींचे ते निकटचे मित्र आहेत. खट्टर यांच्याबरोबरच्या मैत्रीचे गुणगान गाताना मोदींनी एकेकाळी खट्टर त्यांना त्यांच्या मोटारसायकलीवरुन हिंडवत असत असे सांगितले. थोडक्यात मोदींच्या वरदहस्तामुळे हरयाणातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी खट्टर यांना स्वीकारले. मोदींच्या दहशतीच्या राजकारणाचाच हा भाग.

एक उध्दट आणि अकार्यक्षम मुख्यमंत्री म्हणून खट्टर हरयाणात ओळखले जातात असे भाजपचे कार्यकर्ते उघडपणे बोलत आहेत. केवळ मोदीचे मित्र म्हणून त्यांना हरयाणावर लादले आणि त्यांना सहन करावे लागले असे कार्यकर्ते उघडपणे बोलू लागले. खट्टर मुख्यमंत्रीपदी असतील भाजपचा पराभव अटळ आहे असे भाजपचेच हरयाणातले कार्यकर्ते उघडउघड बोलू लागले आणि बंडखोरीचे संकेत देऊ लागले होते.

अखेर ब्रह्मांडनायक उर्फ स्वघोषित दैवी अवतार पुरुषांना शहाणपण आले. निवडणुकीत पराभव दिसू लागल्यावर त्यांनी तातडीने खट्टर यांना बदलले आणि त्यांच्या जागी राजकीयदृष्ट्या अत्यंत हलक्या अशा नायबसिंग सैनी यांची नेमणूक करण्यात आली. या उशीराच्या शहाणपणाचा फार फायदा होईल काय हा प्रश्न आहे. याचे कारण तिकिटवाटपात खट्टर यांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना झुकते माप दिले गेल्याच्या तक्रारी ऐकू येत आहेत.

त्याविरुध्दही कार्यकर्ते बोलत आहेत. अशाच एका बैठकीला खट्टर उपस्थित होते तेव्हा एका कार्यकर्त्याने पक्षाचा हिस्सारचा उमेदवार पडणार असल्याचे सांगताच खट्टर प्रचंड संतापले.

कारण तो उमेदवार त्यांचा आहे. पिसाळलेल्या खट्टर यांनी त्यांच्या सुरक्षा रक्षकांना त्या कार्यकर्त्याला बाहेर घालवून देण्यास सांगितले.

हा प्रकार हरयाणात चांगलाच गाजला आणि सर्वांच्या चर्चेत आहे.

थोडक्यात काय, तर हरयाणातही भाजपचे शहा आणि त्यांच्या वर

असलेले शहेनशहा यांची डाळ शिजण्याबाबत शंका व्यक्त होऊ लागली आहे.

## रामानंतर आता सीतेसाठी राजकारण

भाजप व संघ परिवाराने प्रभु रामचंद्रांचा त्यांच्या राजकीय सत्ताप्राप्तीच्या उद्दिष्टासाठी यशस्वी वपर करुन घेतला.

अयोध्येत राम मंदिराची उभारणी करुन त्यांनी त्या राजकीय उद्दिष्टावर कळस चढवला.

बहुधा या घडामोडींपासून प्रेरणा घेऊन आता बिहारचे मुख्यमंत्री नीतीशकुमार यांनी त्यांच्या राज्यात असलेल्या सीतामढी येथे भव्य सीतामाता मंदिर उभारण्याची घोषणा काही काळापूर्वी केली होती.

अलीकडेच त्यांनी ज्याठिकाणी सीतामातेचा जन्म झाला असे मानले जाते त्या पुनौरा धाम या तीर्थक्षेत्राला जाण्यासाठी चांगल्या रस्त्यांची निर्मिती करण्याची मागणी पंतप्रधानांकडे केली.

या स्थानसाठी असलेल्या रस्ते किंवा मार्ग आणि रेल्वे संपर्कात सुधारणा केली जावी ज्यामुळे भाविकांना येथे जाणे सुकर होईल असे त्यांनी पंतप्रधानांना सुचविले.

बिहारमध्ये सीतामातेचा जन्म सीतामढी येथे झाल्याचे मानले जात असल्याने बिहारमधील जनमानसात तो एक श्रध्देचा भाग आहे. नीतीशकुमार यांनी यासंदर्भात केलेल्या मागण्यांचे जनमानसातून स्वागत करण्यात आले आहे. नीतीशकुमार हे मतांवर नजर ठेवूनच या गोष्टी करीत आहेत हे उघड आहे. परंतु केंद्रातील रामभक्त सरकार आणि या सरकारचे प्रमुख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मात्र नीतीशकुमार यांच्या या मागण्यांना अद्याप औपचारिक असा प्रतिसादही दिलेला नाही. त्यामुळे आता राजकीयदृष्ट्या जागरुक बिहारी जनतेमध्ये तो मुद्दा चर्चिला जाऊ लागला आहे. बिहारमधील भाजपनेत्यांनी याबाबत सारवासारवी सुरु केलेली आहे.

मोदी अमेरिकेच्या दौऱ्यामध्ये व्यस्त आहेत आणि त्याचबरोबर हरयाण व महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमुळेही सतत प्रचारदौऱ्यांवर असल्याने कदाचित त्यांच्याकडून या मागणीबाबत निवेदन करायचे राहून गेले असावे असे कारण बिहारचे भाजपचे नेते पुढे करु लागले आहेत.

नीतीशकुमार यांच्या पक्षाच्या एका नेत्याने तर भाजपच्या नेत्यांना चांगलेच सुनावले. तो म्हणाला की लक्षात ठेवा सीतामातेबद्दल बिहारच्या जनमानसात एक विशेष श्रध्दा आहे. पंतप्रधानांना त्यासंदर्भात केलेल्या मागण्यांकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही ही चांगली गोष्ट नाही. पंतप्रधान सीतामातेला विसरले असावेत असे आम्हाला वाटायला लागले आहे. याचा परिणाम चांगला होणार नाही. यामुळे भाजपचे बिहारमधील स्थानिक नेतेही जरासे अस्वस्थ झाले आहेत.

काहींनी तत्काळ मध्यस्थी करीत नीतीशकुमार यांच्या अनुयायांना सबुरी बाळगण्याचा सल्ला देऊन शांत करण्याचा प्रयत्न चालविला आहे.

लवकरच पंतप्रधान यासंदर्भात पावले उचलतील असे मधाचे बोटही त्यांनी लावले आहे.



उत्तर प्रदेशात राम आणि आता बिहारमध्ये नीतीशकुमार यांनी सीतामातेचा आश्रय घेऊन लोकांच्या श्रध्देला गोंजारायला सुरुवात केली आहे. हे राजकीय गोंजारणे निव्वळ मतांसाठी आहे हेही येथे ओळखायला हवे.

## मासे खा मासे !

बिहारचाच विषय चालू आहे. याच राज्यातल्या एका गंमतीदार प्रसंगाकडे लक्ष वेधल्याखेरीज रहावत नाही म्हणून हा किस्सा.

बिहारमध्ये सहरसा म्हणून शहर आहे. जिल्ह्याचे ठिकाण आहे.





अलीकडेच तेथे मत्स्यसंवर्धन खात्यातर्फे एक कार्यक्रम झाला.

मत्स्यसंवर्धन व विकासाचे काम कसे चालू आहे यासंदर्भातील प्रदर्शन खात्यातर्फे भरविण्यात आले होते. मुख्यमंत्री नीतीशकुमार यांनी त्या प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

उद्घाटन झाले, प्रास्ताविक आणि इतर भाषणे झाली, आभारप्रदर्शन झाले. कार्यक्रमाला लोकांनी केलेली गर्दी पाहून कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या खात्याला विलक्षण समाधान लाभल्याचे संबंधित अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरुन लक्षात येत होते.

खात्याने या प्रदर्शनात त्यांच्यातर्फे जोपासल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या माश्यांचा समावेश होता. त्यासाठी खात्याने लहानलहान पाण्याच्या काचेच्या टाक्यांमधून विविध प्रकारचे जिवंत मासे ठेवलेले होते.

कार्यक्रम संपला आणि जमलेल्या गर्दीने थेट या काचेच्या टाक्यांमध्ये ठेवलेल्या माश्यांकडे मोर्चा वळवला. त्यांनी धडाधड त्या काचेच्या टाक्या फोडल्या आणि त्यांना हवे असलेले मासे घेऊन पोबारा करण्यास सुरुवात केली.

जमाव आक्रमक होता आणि त्यांनी विजेच्या चपळाईने या टाक्यांवर हल्ला चढविल्याने तेथे बंदोबस्तासाठी असलेले पोलिस किंवा इतरही सुरक्षा रक्षक त्या हल्ल्याने हतबुध्द झाले. त्यांना काही कळून ते भानावर येईपर्यंत मासे घेऊन जमाव गायब झाला होता.

या गर्दीतच काही माणसे चक्क निर्लज्जपणे बोलत होती की आम्ही मुख्यमंत्र्याचे भाषण ऐकायला थोडेच आलो होतो. आम्हाला तर या माश्यांमध्ये जास्त रस होता. असे चांगले मासे आम्हाला बाहेर बाजारात थोडीच मिळणार आहेत आणि तेही फुकटात ?

या प्रकारामुळे पोलिस आणि मत्स्यसंवर्धन खाते अक्षरशः बधीर झालेले आढळले. कायद्याचा किंवा किमान नागरी शिस्तीचा किती अभाव आहे आणि हे बेताल व बकाल भावना किती खोलवर रुजली आहे याचेच आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाही.

या अत्यंत लाजिरवाण्या प्रकारामुळे या खात्याचे हजारो रुपयांचे नुकसान झाले ते वेगळेच. कारण मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम असल्याने आयोजन करताना सर्व काही दर्जेदार असेल याची खबरदारी घेण्यात आली होती. प्रदर्शनासाठी आणलेले मासे देखील दर्जेदार होते. बहुधा त्यामुळेच जमावाला स्वतःची खाद्यलालसा आवरता आली नसावी.

प्रसंग लाजिरवाणा होता हे मात्र निश्चित.

## दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांसाठी शोध

दिल्ली विधानसभेची निवडणूक पुढच्या वर्षी आहे.

वेळापत्रकाप्रमाणे फेब्रुवारी २०२५च्या दरम्यान ती होणे अपेक्षित आहे. गेल्या दोन निवडणुकांमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालच्या आम आदमी पार्टीने प्रमुख प्रतिस्पर्धी असलेल्या भाजपला चारी मुंड्या चीत केले. काँग्रेसला तर खातेही उघडता आले नव्हते.

केंद्र सरकार दिल्लीत असले तरी दिल्ली विधानसभेत मात्र जनतेने कौल न दिल्याने भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचा तिळपापड होणे स्वाभाविक आहे.

केजरीवाल यांनी दिल्लीकरांना वीज, पाणी, शाळा आणि आरोग्य सुविधा यासंदर्भात जे नावीन्यपूर्ण प्रयोग करुन दिलासा दिला त्यामुळे दिल्लीच्या स्थानिक पातळीवर त्यांना प्रचंड पाठिंबा मिळाला आहेच परंतु पंजाबसारख्या राज्यामध्ये देखील त्यांच्या पक्षाचे सरकार स्थापन होऊ शकले ही एक मोठी गोष्ट मानली जाते. त्यामुळेच केजरीवाल यांना राजकीयदृष्ट्या मोठे होऊ न देण्यासाठी केंद्र सरकारने विविध युक्त्या करुन त्यांचे पंख छाटलेच परंतु दारु परवाना प्रकरणात अडकवून बेजार करुन टाकले आहे.

आपल्याविरुध्द ईडीचा तपास सुरु असल्याने व त्याबाबतची न्यायालयीन लढाई सुरु असल्याने केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपद सोडले आहे.



आता दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी महिला नेत्या आतिषी यांची निवड करण्यात आली आहे. स्वच्छ प्रतिमेच्या नेत्या म्हणून त्या ओळखल्या जातात. उच्चविद्या विभूषित ही त्यांची आणखी एक जमेची



बाजू असल्याने आगामी निवडणुकीतही आम आदमी पार्टीचा वरचष्मा राखण्याची केजरीवाल यांची योजना आहे.

आतिषि यांना तुल्यबळ महिला नेत्याच्या शोधात भाजप श्रेष्ठी आहेत.

सुषमा स्वराज यांच्या कन्या बासुरी या अद्याप अननुभवी व नवीन असल्याने त्यांचा या निवडणुकीसाठी विचार करता येणार नाही. यामुळे नव्याने मिळत असलेल्या माहितीनुसार भाजप श्रेष्ठी स्मृति इराणी यांना मुख्यमंत्रीपदाच्या भाजपच्या उमेदवार म्हणून जाहीर करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

स्मृति इराणी या अमेठी मतदारसंघातून राहूल गांधी यांच्याकडून पराभूत



झाल्यानंतर त्यांना राज्यसभेत घेण्यात आलेले नाही आणि सध्या त्या कोणत्याच पदावरही नाहीत. कधीकधी पक्षाच्या प्रवक्ते म्हणून त्या पत्रकार परिषदा घेताना आढळतात.

स्मृति इराणी या मूळच्या दिल्लीच्याच आहेत. त्यांचे मूळ नाव स्मृति मल्होत्रा असे आहे. पश्चिम दिल्लीतल्या राजौरी गार्डन या उपनगराच्या त्या रहिवाशी आहेत. मुंबईला गेल्यानंतर त्यांच्या लग्नानंतर त्या स्मृति इराणी झाल्या आहेत. त्यामुळे दिल्लीच्या संस्कृतीशी त्यांची नाळ जुळलेली आहे व म्हणूनच





एक नवा आक्रमक महिला चेहरा म्हणून भाजपतर्फे त्यांचा विचार चालू असल्याची माहिती आहे.

दरम्यान दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदासाठी कायम आस लावून बसलेले आणि या पदासाठीचे कायमचे उमेदवार विजय गोयल हेही सक्रिय झाले



आहेत.

काहीतरी नाट्यमय करुन प्रसिध्दीच्या झोतात राहण्यात गोयल पटाईत आहेत.

दिल्लीच्या पाणी प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी दिल्लीतील सर्वाधिक गजबज असलेल्या आयटीओ चौकात आंघोळ केली होती.

केजरीवाल यांनी नुकतीच वैद्यकीय कारणांच्या आधारे जामीनासाठी कोर्टात अर्ज केला असता गोयल हे रुग्णवाहिका घेऊन केजरीवाल यांच्या निवासस्थानी पोहोचले होते.

अशा अनेक नाट्यमय गोष्टी करण्यात त्यांचा हातखंडा आहे.

परंतु यामुळेच त्यांना कुणी गंभीरपणे घेईनासे झाले आहे. तरीही मुख्यमंत्रीपदासाठी त्याचे प्रयत्न चालूच



असतात.

दिल्लीतील भाजप नवीन चेहऱ्याच्या शोधात आहे हे खरे आहे. एकेकाळी हा भाजपचा गड होता. सुषमा स्वराज, अरुण जेटली, हर्षवर्धन, जगदीश मुखी ही मंडळी होती. त्यांच्या आधी केदारनाथ साहनी, मदनलाल खुराना, विजयकुमार मल्होत्रा आणि साहिबसिंग वर्मा हे नेते होते. आता यातले काही काळाच्या पडद्याआड गेले तर काहींना मोदी-शहा यांनी निवृत्त केले आहे. त्यामुळेच दिल्लीत भाजपला नव्या चेहऱ्याची नितांत आवश्यकता आहे आणि बहुधा त्यामुळेच काहीतरी नाट्यमय करण्याचा भाग म्हणून स्मृति इराणी यांना दिल्लीसाठी चेहरा म्हणून जाहीर केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## राजकारणी प्रशांत किशोर

निवडणुकांचे रणनीतीकार, राजकारणी मंडळींना त्यांचे नेतृत्व लोकप्रिय व व्यापक करण्यासाठीच्या युक्त्या सांगणारे सल्लागार म्हणून प्रशांत किशोर उर्फ पीके यांना भारतभर प्रसिध्दी मिळाली.

नरेंद्र मोदी यांचे ते सल्लागार होते. मोदी यांना मिळालेल्या यशामुळे प्रशांत किशोर यांनाही ही सर्व किमया त्यांनीच केली असे वाटू लागले.

ते बिहारचे आहेत. नीतीशकुमार यांच्याशी त्यांची चांगली मैत्री होती.

नीतीशकुमार यांनाही त्यांनी मदत केली होती. यानंतर त्यांनी विविध राज्यांमधल्या मुख्यमंत्र्यांसाठीही सल्लागाराचे आपले दुकान चालवले. हे करता करता त्यांना स्वतःलाच राजकारणात प्रवेश करण्याची इच्छा झाली.

देशाच्या राजकारणाला वेगळे वळण देणे हे ध्येय असल्याचे ते सांगू लागले. राजकारण प्रवेशासाठीची प्रथम कर्मभूमि म्हणून त्यांनी बिहारचीच निवड केली.






बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुकीत उतरण्याची तयारी म्हणून त्यांनी बिहारचे अनेक दौरे केले व जिल्ह्याजिल्ह्यात पाठीराख्यांची चाचपणी केली.

आता त्यांनी नुकतीच त्यांच्या जन सुराज्य पक्षाची महुर्तमेढ रोवली. परंतु या कार्यक्रमाच्या वेळचे त्यांचे वर्तन पक्क्या राजकारण्यासारखे होते असे उपस्थितांनी सांगितले. या कार्यक्रमाला सुरुवातीला लोकांची गर्दी कमी होती. त्यामुळे प्रशांत किशोर चक्क दोन तास गर्दी जमेपर्यंत थांबून राहिले आणि उशीराने आले. त्यांच्या भाषणाच्या शैलीबद्दल बोलायचे झाल्यास ते लालूप्रसाद यांच्या धर्तीवर किंवा त्या शैलीत बोलताना आढळले. लालूप्रसाद यांच्या भाषणात चतुराई आणि रांगडेपणा, ग्राम्य शैलीचे मिश्रण असते आणि तशाच पध्दतीने प्रशांत किशोर बोलले असे सांगण्यात येते.

काहींनी त्यांची तुलना अरविंद केजरीवाल यांच्याशी केली. बिहारमध्ये आणखी एका नव्या चेहऱ्याचा उदय झाला आहे असे काहींचे म्हणणे होते.

मात्र काही पत्रकारांनी प्रशांत किशोर हेही बिहारमधील जातीवर आधारित राजकारणापासून स्वतःला अलिप्त ठेवू शकलेले नाहीत असेही नमूद केले.

प्रशांत किशोर यांनी राजकारणात आदर्शवाद आणण्याच्या आणाभाका घेतल्या असल्या तरी प्रत्यक्षात ते किती आणू शकतात हे पहावे लागेल. नीतीशकुमार हे त्यांचे आदर्श असले तरी नीतीशकुमार यांचा प्रवासही समाजवादाकडून सत्तालोलुप राजकारणी असा झालेला आहे. धर्मनिरपेक्षतेकडून धर्माधारित राजकारणाकडे झालेला आहे. अरविंद केजरीवाल यांनीही भ्रष्टाचारविरोधी नेता म्हणून सुरुवात केली आणि आज त्यांच्याविरुध्दच भ्रष्टाचाराचे आरोप होऊ लागले आहेत.

त्यामुळे आता हे प्रशांत किशोर राजकारणात कोणते नावीन्य आणतात हे पाहण्याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

## रेल्वेच्या दुरावस्थेला जबाबदार कोण ?

देशात बुलेट ट्रेनचे स्वप्न पाहिले जात आहे आणि हट्टाने, दुराग्रहाने ते काम पूर्ण केले जात आहे.

वंदे भारत नावाच्या रेल्वेगाड्या




चालू करण्यात आल्या आहेत. असे सांगण्यात येते की एक वंदे भारत गाडी चालविण्यासाठी चार इतर गाड्यांचा खोळंबा केला जात आहे आणि त्यामुळेही रेल्वेचे अतोनात आर्थिक नुकसान होत आहे.

वंदे भारत हा एक पांढरा हत्ती होऊ पहात आहे. अलीकडेच रेल्वेमार्गांची देखभाल व दुरुस्ती योग्य रीतीने होत नसल्याने रेल्वेगाड्या रुळावरुन घसरण्याचे आणि गंभीर अपघात होण्याचे प्रकार सातत्याने घडताना दिसत आहेत. आता हे किटाळ आपल्यावर येऊ नये यासाठी भाजपच्या प्रचारकांनी घातपाताचा संशय पसरविण्यास सुरुवात केली आहे. यासाठी रुळावर पाच किलोचा गॅस सिलिंडर कसा ठेवला जात आहे याचा प्रचारही करण्यास सुरुवात झाली आहे.

सीएजीच्या ताज्या अहवालात रेल्वे मंत्रालयात व्यवस्थापनाचा अभाव असल्याबद्दल टीका करण्यात आली आहे. या ढिसाळ व अनागोंदी कारभारामुळे तसेच रेल्वेच्या जमीनींची विक्री व विकसनाच्या प्रक्रियेतील त्रुटींमुळे रेल्वेचे २६०० कोटि रुपयांचे नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

रेल्वेने प्लॅटफॉर्म तिकिटाचे दर वाढवले आहेत. रेल्वेभाडेवाढ तर झालेलीच आहे. रेल्वेच्या अनेक आस्थापनांचे खासगीकरण करुन सरकारने भरपूर पैसा कमवूनही तो पैसा कुठे गेला हा प्रश्न अनुत्तरित आहे.

रेल्वेचे उत्पन्न वाढविण्यासाठी साध्या डब्यांऐवजी वातानुकूलित डब्यांची संख्या वाढवून लोकांना वाढीव पैसे देऊन प्रवास करण्यास भाग पाडले जात आहे.

एवढ्या विविध मार्गांनी पैसा येऊनही रेल्वेकडे निधीची कमतरता का आहे आणि २६०० कोटि रुपयांचे नुकसान का आहे अशी विचारणा सीएजीच्या अहवालात करण्यात आली आहे. रेल्वेचेही पूर्ण खासगीकरण करण्याच्या दुष्ट हालचाली मोदी सरकार करीत आहे. त्यामुळेच सामान्य लोकांनाही आता रेल्वेप्रवास महाग व न परवडणारा झाला आहे.

रेल्वेमध्ये क्रांतिकारक सुधारणा केल्याचे मोदी सरकारचे दावे किती खोटे व पोकळ आहेत याचा हा नमूना आहे. ■■


एखाद्या विशिष्ट विचारसरणीशी बांधिलकी राखणे आणि ती सामान्यजनांना पटवून देणे ही सार्वजनिक जीवनातली फार मोठी कला आहे. त्यासाठी भाषा आणि शब्दांवर प्रभुत्व लागतेच परंतु समोरच्या व्यक्तीला तिच्याच भाषेत ते पटविण्यासाठी बौध्दिक क्षमता, खोली आणि चतुराई पण अंगी असणे तेवढेच महत्वाचे असते. केवळ पोथीनिष्ठेने कुणाला स्वतःभोवती लोकांना जमा करता येत नाही. कारण पोथीनिष्ठेतूनच कर्मकांड निर्माण होते. त्या दुष्टचक्रात न अडकणाऱ्या व्यक्ती लोकांना अधिक भावतात.

भारतात १९९१ मध्ये आर्थिक उदारीकरणाची, खुल्या आणि स्पर्धा व बाजारपेठेवर आधारित अर्थव्यवस्थेची सुरुवात करण्यात आली. जागतिक पातळीवरील परिस्थिती लक्षात घेऊनच आर्थिक उदारीकरणाचे पाठीराखे या उदारीकरणाच्या धोरणाला पर्याय नसल्याचे सर्वत्र सांगत असत. आर्थिक उदारीकरणाला पर्याय नाही हे लोकांच्या मनावर बिंबवताना ही मंडळी 'टिना फॅक्टर' (TINA-There Is No Alternative) या संज्ञेचा वापर करीत. या मताच्या मंडळींचा त्यावेळी मोठाच जोर होता. या नव्या परिस्थितीत समाजवादी आणि संमिश्र अर्थव्यवस्थेची पाठराखण करणाऱ्या लोकांना या युक्तिवादाला चपखल प्रत्युत्तर देताना अडचणी येत असत. परंतु जेएनयू (जवाहरलाल नेहरू युनिर्व्हसिटी) मध्ये या विषयावर एक चर्चा किंवा परिसंवाद झाला. त्यावेळी सीताराम येचुरी यांनी या नवउदारआर्थिक धोरणांना विरोध केला होता. तेव्हा समोर बसलेल्या प्रेक्षकांमधून कुणीतरी त्यांना प्रश्न केला की उदारीकरणाचे पाठीराखे त्याला पर्याय नाही म्हणून 'टिना फॅक्टर'चा सतत उल्लेख करतात त्याला तुमचे उत्तर काय ?

# सीताराम येचुरी

## उणीव भासणार!

**अनंत बागाईतकर**



क्षणाचाही वेळ न घालवता सीताराम येचुरी यांनी उत्तर दिले '' SITA Factor''. म्हणजे ''Socialism Is The Alternative''(SITA). याचा मराठीत अर्थ हा की ''समाजवाद हाच पर्याय''. भारतीय समाजात आर्थिक समानता आणण्याचा प्रयत्न करणे हा नव-उदार-आर्थिकवादाचा पर्याय आहे असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ होता. त्यांच्या या चतुर उत्तरावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट होणे अपरिहार्य होते हे ओघाने आलेच. अनेक वेळेस त्यांनी खासगीत किंवा अगदी जाहीरपणे देखील मान्यही केले होते की आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया आता मागे नेता येणार नाही किंवा बंद करता येणार नसली तरी या प्रक्रियेद्वारे भारतातील गरीबांना आर्थिक न्याय कसा देता येईल याचे मार्ग शोधावे लागणार आहेत आणि त्यामुळेच निव्वळ स्पर्धेवर आधारित धोरणांना आमचा विरोध कायम राहील. याचे कारण स्पष्ट आहे. स्पर्धा याचा अर्थ जो सबळ तोच स्पर्धेत टिकणार आणि निर्बळ मात्र दुबळा होत जाणार. या अशा प्रकारच्या धोरणामुळे भारतातील आर्थिक विषमता दूर होणार नाही आणि कमकुवत व दुर्बळ वर्गांना आर्थिक न्याय मिळणार नाही. हा त्यांचा विचार त्यांच्या व्यक्तिमत्वाप्रमाणेच व्यावहारिक आणि सामान्यातल्या सामान्य माणसाला समजणारा होता. त्यामुळेच सीताराम येचुरी यांचे व्यक्तिमत्व हे एकांगी किंवा एककल्ली व पोथिनिष्ठ नव्हते. गंभीर विचारसरणीलाही त्यांनी व्यावहारिकतेची जोड देऊन स्वतःचा असा एक व्यापक चाहतावर्ग निर्माण केला होता.


शरद पवार हे सिताराम येचुरी यांच्या पार्थिवावर फुले अर्पण करून श्रद्धांजली वाहताना.

कम्युनिस्ट, मार्क्सवादी म्हटल्यावर एकेकाळी कुणीतरी अत्यंत रागीट, जगावर सतत चिडलेला चिडखोर माणूस, अतिचिकित्सक किंवा चिरफाड करणारा, भावभावना नसलेला आणि सर्वसामान्यांपेक्षा काहीतरी भलतेच करणारा अशी एक प्रतिमा तयार झाली होती. अशा विचारसरणीची माणसे हसत नाहीत, हसण्याचे त्यांना वावडे असते असाही एक समज तयार झालेला होता. अर्थात हा समज तयार होण्यासाठी या विचारसरणीच्या नेत्यांचे वर्तन, आचरणही कारणीभूत होते. साम्यवादी विचारसरणीला आंतरराष्ट्रीय बैठक असल्याने ही मंडळी भारतापेक्षा परदेशात म्हणजेच चीन, रशियासारख्या समाजवादी देशांमध्ये काय घडले यात अधिक रस घेतात, भांडवलदार, अमेरिका यांना शिव्या घालतात असेही एक चित्र निर्माण झाले होते. सतत वैचारिक काथ्याकूट करणारे म्हणून सामान्यजन त्यांच्या जवळपासही फिरकत नसत अशीही एकेकाळी स्थिती होती. परंतु बदलत्या काळानुसार भारतातील साम्यवादी चळवळीत आणि त्या चळवळीच्या नेत्यांमध्येही बदल होत गेले. चीनने ज्यावेळी त्यांच्या देशातील समाजवाद व साम्यवाद हा चिनी छापाचा असल्याची घोषणा केल्यानंतर देशोदेशीच्या साम्यवादी व समाजवादी चळवळी देखील संबंधित देशातील परिस्थितीशी, सामाजिक स्थितीशी सुसंगत होत गेल्या. भारतातही हे स्थित्यंतर झाले. सीताराम येचुरी या स्थित्यंतरातूनच पुढे आलेले नेते होते. त्यामुळेच त्यांनी त्यांच्या पक्षाची धोरणे भारतीय परिस्थितीला सुसंगत करण्यात मोठी कामगिरी बजावली. विशेषतः भारतीय समाजात वर्गापेक्षा वर्ण हा कसा वरचष्मा बाळगून आहे हे कळायला भारतीय साम्यवादी विचारसरणीतल्या वरच्या पिढीला बरीच वर्षे जावी लागली होती. जेव्हा ते वास्तव समजले तेव्हा त्यांचा काळ सरत आलेला होता. परंतु सीताराम येचुरी यांच्यासारख्या दुसऱ्या फळीतल्या नेत्यांनी भारतीय परिस्थितीचे भान ठेवून साम्यवाद व समाजवादाला भारतीय चेहरा देण्यात फार मोठे योगदान दिले. म्हणूनच त्यांच्या अकाली निधनामुळे या चळवळीचे मोठे नुकसान झालेले आहे.

काही माणसे नको त्यावेळी आपल्यातून निघून जातात. त्यांचे जाणे जिव्हारी लागते. ज्यावेळी त्यांची गरज सर्वात जास्त असते तेव्हाच ते गेल्याने निर्माण झालेली पोकळी आणखी बोचत राहते. सीताराम येचुरी यांचे जाणे असेच जिव्हारी लागणारे आहे. आधुनिक मापदंडांप्रमाणे त्यांचे वय (७२) जाण्याचे नव्हते. एक अतिशय सक्रिय राजकीय नेता म्हणून ते विरोधी पक्षांमध्ये सर्वांना हवेहवेसे वाटणारे होते. दिल्लीतल्या पत्रकारांमधील अत्यंत लोकप्रिय नेता म्हणून सीताराम येचुरी ओळखले जात. विशेषतः विरोधी पक्षांमधील

राजकारणातील त्यांची भूमिका, सक्रियता यामुळे विरोधी गोटातल्या अनेक बित्तंबातम्या त्यांच्याकडे असत आणि काही मोजक्या पत्रकारांपुढे ते खुलेपणाने माहिती देत असत. एक अत्यंत विश्वासार्ह नेता म्हणून पत्रकारांमध्ये त्यांचा लौकिक होता. पत्रकारांना काहीतरी काल्पनिक किंवा दिशाभूल करणारी माहिती देण्याचा अनुचित प्रकार त्यांनी कधीही केला नाही. त्यामुळेच एखाद्या पत्रकाराला माहितीबाबत काही अडचण आल्यास व त्याबद्दल सीताराम येचुरी यांना फोन केल्यास ते योग्य ते मार्गदर्शन करीत असत. अत्यंत साधी राहणी, अगदी रस्त्यावर भेटल्यानंतर तेथल्याच एखाद्या चहाच्या टपरीवरही पत्रकार मित्रांबरोबर चहा घेण्यास मागेपुढे न पाहणारा आणि तेथेच उभ्याउभ्या मनसोक्त गप्पा आणि विनोदात रमणारा हा नेता होता. त्यामुळेच त्यांचे जाणे ही कल्पना असह्य वाटते.

खरे तर दिल्लीतल्या पत्रकारांनी किमान आमच्या पिढीतल्या तरी सीताराम येचुरी यांना कधीही सीतारामजी वगैरे आहोजाहो करण्याचा प्रकार केला नाही. सर्व पत्रकार त्यांना अरेतुरेमध्येच बोलायचे. 'सीता' किंवा फारतर सीताराम या नावानेच त्यांना हाका मारले जात असे. कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी असूनही अत्यंत हसतमुख असलेला नेता म्हणून सीतारामची ओळख होती. सीतारामचे आणखी एक वैशिष्ट्य होते. अगदी लहानातल्या लहान वृत्तपत्राच्या पत्रकारालाही तो एखाद्या बड्या वृत्तपत्राच्या पत्रकाराप्रमाणेच समानतेने वागवत असे. अनेक नेते मोठे झाल्यानंतर त्यांना लहान, प्रादेशिक किंवा भाषिक वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींशी बोलणे कमीपणाचे किंवा त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारे वाटते. परंतु सीताराम याला अपवाद होता. त्याचा आणखी एक चांगला गुण म्हणजे पत्रकार परिषदेत किंवा इतरत्रही एखाद्या पत्रकाराने कितीही अडचणीचा किंवा काहीसा तिरका प्रश्न विचारला तरीही सीतारामने कधीही तोल किंवा संयम ढळू दिला नाही. पत्रकारांच्या सर्व प्रश्नांना पाहिजे तेवढा वेळ थांबून आणि पत्रकारांचे समाधान होईपर्यंत उत्तरे देण्यात सीताराम कधीही कमी पडला नाही. त्याचप्रमाणे अडचणीच्या प्रश्नांना उत्तरे न देता मग त्या पत्रकाराचीच जाहीर चेष्टा कर, टिंगलटवाळी करुन खिल्ली उडव असले प्रकारही त्याने केले नाहीत. याठिकाणी हे नमूद करण्याचे कारण आहे. सर्वसामान्यांना पत्रकारांना कशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते हे समजणार नाही म्हणून हा उल्लेख केला. सत्तारूढ भाजपच्या पत्रकार परिषदांमध्ये हल्ली पत्रकारांना अडचणीचे प्रश्नच विचारले देऊ जात नसल्याचा अनुभव आहे. सत्तेमुळे या पक्षाचे नेते एवढे उन्मत्त झालेले आहेत की एखाद्या पत्रकाराने आक्रमक व अडचणीचे प्रश्नच विचारले तर त्याचा भर पत्रकार परिषदेत अपमान व पाणउतारा करण्यापर्यंत यांची मजल जाते. एवढेच नाही तर त्या पत्रकाराच्या वरिष्ठांना फोन करुन त्याची तक्रार केली जाते आणि त्याला भाजपच्या पत्रकार परिषदांना न पाठविण्याचा हुकुम दिला जातो. त्यामुळेच सीताराम सारखे नेते या पार्श्वभूमीवर वेगळे का दिसतात आणि पत्रकारांना ते आपलेसे का वाटतात याचे कारण किंवा पार्श्वभूमि ही आहे.

एक अत्यंत कुशाग्र बुध्दीचा नेता म्हणून सीतारामची लौकिक होता. सीबीएसई बोर्डात ते संपूर्ण देशात अव्वल म्हणजेच प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला होता. वडिलांच्या बदलीच्या नोकरीमुळे दिल्लीत आल्यानंतर त्याने सेंट स्टीफन्स कॉलेजात गुणवत्तेवर प्रवेश मिळवला आणि अर्थशास्त्रात प्रथम वर्गात पदवी प्राप्त केली. यानंतर त्याने जेएनयू मध्ये प्रवेश घेतला आणि तेथे भारतीय कृषिशी संबंधित विषयावर पीएचडी करण्याचे त्याने ठरवले होते. परंतु विद्यार्थी चळवळीत अधिक सक्रिय झाल्यानंतर ते बारगळले. परंतु आणीबाणीच्या विरोधात जेएनयूमध्ये आवाज उठविण्यात सीताराम अग्रभागी होता. त्याने विद्यार्थ्यांची चळवळच आणीबाणीच्या विरोधात उभारली. या कारणास्तवच विद्यार्थ्यांनी या विद्यापीठाच्या कुलपति असलेल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन सुरु केले. सीतारामने त्याचे नेतृत्व केले. इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना भेटून या विद्यार्थ्यांनी त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीचे निवेदन व ठराव दिला. इंदिरा गांधी या स्वतः घराबाहेर आल्या आणि या विद्यार्थ्यांना सामोऱ्या गेल्या. त्यांच्या विरोधातले निवेदन किंवा ठराव सीतारामने वाचला आणि इंदिरा गांधी यांनी शांतपणे सर्व ऐकून घेतले. त्यांनी लगेच राजीनामा दिला नाही. परंतु काही काळाने त्यांनी कुलपतिपदाचा राजीनामा दिला. इंदिरा गांधी या हुकुमशहा होत्या म्हणून जी मंडळी त्यांच्यावर टीका करतात त्यांच्यासाठी हा प्रसंग डोळ्यात अंजन घालणारा ठरावा. विशेषतः सध्या ज्या स्वघोषित दैवी अवतार पुरुषांचा बोलबाला आहे त्यांना किमान बुध्दी असेल तर त्यांना या प्रसंगावरुन काही शिकवण मिळेल. परंतु विद्यार्थीदशेतूनच सीताराम डाव्या चळवळीत ओढला गेला आणि अगदी तरुण वयात तो पक्षाच्या केंद्रीय समितीचा सदस्य झाला. एसएफआय या सीपीएमच्या विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष झाल्यानंतर त्याने मागे वळून पाहिलेच नाही.

सीताराम राज्यसभेत होता. सलग बारा वर्षे त्याने राज्यसभा गाजवली. त्याची भाषणे सोप्या भाषेतली असत आणि अगदी दैनंदिन जीवनातले दाखले देत आपला मुद्दा पटवून देण्याची त्याची हातोटी होती. वैचारिक, जडजांबाल भाषेत तो कधीच बोलला नाही व त्यामुळेच त्याच्या भाषणांना व मुद्यांना प्रसिध्दी देखील मिळत असे. किंबहुना ज्योति बसू , हरकिशनसिंग सुरजित यांच्यानंतर लोकप्रिय म्हणता येईल असा नेता सीतारामच होता. सर्व पक्षांमधील नेत्यांशी सीतारामचे चांगले संबंध होते. अगदी उदाहरणच द्यायचे झाले तर रा.स्व.संघपरिवारातील व भाजपचे ज्येष्ठ नेते मुरलीमनोहर जोशी यांच्याशी सीतारामचे अत्यंत चांगले संबंध होते. भाजपमधील ज्या नेत्यांनी नवआर्थिक उदारीकरणाच्या विरोधात भूमिका घेतली होती त्यात मुरलीमनोहर जोशी आघाडीवर होते. त्यामुळे त्यांची व अनेक डाव्या नेत्यांची आर्थिक भूमिका जवळपास सारखी असायची. संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये हे दोघेही

अनेकवेळेस आर्थिक मुद्यांवर बोलताना पहायला मिळत असे. मुरलीमनोहर जोशी ए सीताराम म्हणूनच हाक मारत असत. सीतारामालाही विनोद करण्याची हुक्की येत असे. भाजप व संघ परिवार आम्हा कम्युनिस्टांना विरोध करीत असतात. पण पहा माझ्या नावात नुसता राम नाही तर सीता पण आहे. ज्या सीतेचा रामाने त्याग केला त्या सीतेलाही माझ्या नावात रामाच्या बरोबरीने स्थान आहे आणि तिचे नाव पहिले आहे असे म्हणून दोघेही खळाळून हसत. भाजप व संघ परिवाराला कम्युनिस्टांचे वावडे आहे आणि कम्युनिस्ट पक्षांनाही भाजपबद्दल ममत्व नाही. परंतु आर्थिक मुद्यांवर दोन्हीकडील नेते एकाच आवाजात बोलताना आढळतात. हा उदारमतवादी लोकशाहीचा करिष्मा आहे. परंतु वर्तमान राज्यकर्त्यांना या लोकशाहीचीच ॲलर्जी झालेली असल्याने त्यांनी या खुल्या व उदार वातावरणाचा चुथडा करुन टाकला आहे.

विरोधी पक्षांना भाजपच्या विरोधात एकत्रित करण्यासाठी सीतारामने फार मोठी मेहनत घेतली. विरोधी पक्षांच्या एकत्र येण्यासाठी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचीही गरज होती. त्यांचा या विरोधी आघाडीत समावेश आवश्यक होता. परंतु ममता बॅनर्जी पडल्या कट्टर कम्युनिस्ट विरोधी त्यामुळे या अडचणीतून मार्ग काढण्याचे दिव्य पार कसे पाडायचे हा प्रश्न होता. ममता बॅनर्जी आघाडीत सामील झाल्या नाही तरी त्यांनी किमान भाजपची साथ देऊ नये (नवीन पटनाईक यांच्यासारखी) यासाठी प्रयत्न करणे भाग होते. त्यासाठी सीतारामने प्रसंगी माघार घेण्याचा किंवा पडती बाजू घेण्याचा प्रकारही केला आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीत ममता बॅनर्जी यांचा सहभाग असेल यासाठी प्रयत्न केले. यासंदर्भात ते आणि शरद पवार यांच्याकडे या गोष्टीचे श्रेय द्यावे लागेल. ममता बॅनर्जी या टोकाच्या दुराग्रही असल्याने त्यांच्याशी अशाच नेत्याच्या माध्यमातून बोलले पाहिजे की ज्या नेत्याचा त्या आदर करतात हे सीतारामने ओळखले होते. सीताराम आणि शरद पवार यांचे संबंध अत्यंत निकटचे. किंबहुना विरोधी पक्षांच्या आघाडीच्या प्रयत्नात सीतारामने जवळपास शरद पवार यांच्या मदतीनेच पुढाकार घेतला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शरद पवार आणि सीताराम दोघेही एकाचवेळी दिल्लीत असायचे तेव्हा त्यांची भेट झाली नाही असे क्वचितच घडायचे. दोघांमध्ये केवळ राजकीय संबंध नव्हते. पुस्तके, संशोधनात्मक दस्तावेज, वेगवेगळ्या मुद्यांवर ते एकमेकांशी बोलत असत, देवाणघेवाण करीत असत. एकदा संसदेत काहीतरी जटिल मुद्यावर चर्चा होती. भोजनाची सुटी झाली होती. सीतारामला एक दस्तावेज हवा होता. शरद पवार घरी निघाले होते व सीतारामला भाषणाची तयारी करायची होती. संबंधित दस्तावेज शरद पवारांच्या घरी होता. तेव्हा पवारांबरोबर घरी जाऊन तो दस्तावेज आणला. सीताराम संसदेच्या प्रवेशद्वारापाशीच वाट पहात होता. त्याला तो दस्तावेज दिल्यावर त्याला हायसे वाटले. शरद पवार आणि सीताराम यांच्या घट्ट मैत्रीतला एक प्रमुख दुवा म्हणजे डी.पी.त्रिपाठी किंवा ज्यांना दिल्लीच्या राजकीय वर्तुळात 'डीपीटी' म्हणून ओळखले जायचे हे होते. अलौकिक स्मरणशक्तिची देणगी असलेले त्रिपाठी होते. ते देखील जेएनयूचेच विद्यार्थी. ते आणि मार्क्सवादी नेते प्रकाश करात हे समकालीन व सीतारामला एकदोन वर्षांनी सीनियर होते. परंतु त्यांची विलक्षण चांगली व घट्ट मैत्री होती. डीपीटी हे अत्यंत विद्वान, बहुभाषिक आणि प्रतिभावान होते. हिंदी



**'जेएनयू'च्या कुलपदीपदाचा इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्यावरील आरोपांचे सीताराम येचुरी त्यांच्यासमोर वाचन करताना.**

आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर त्यांची विलक्षण पकड होती. दिल्लीच्या बौध्दिक वर्तुळात त्यांना खास मान होता. दुर्दैवाने डीपीटी देखील काही वर्षांपूर्वीच अकाली हे जग सोडून गेले. ते पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते होते आणि राज्यसभेवरही होते. डीपीटी हे दर दोन-तीन महिन्यात इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे एक रात्रिभोजन आयोजित करीत असत. त्यामध्ये त्यांचे हे सर्व बौध्दिक मित्र मोजके पत्रकार मित्र यांचा समावेश असे. अत्यंत वेचक व निवडक अशा बुध्दिमंतांचे ते संमेलन असे. सीताराम, प्रकाश करात हेही तेथे आवर्जुन येत असत. भोजनाच्या निमित्ताने तेथे मनसोक्त गप्पा, विचारांची विविध वैचारिक दृष्टिकोनांची देवाणघेवाण होत असे. बौध्दिकदृष्ट्या ताजेतवाने होण्याचे ते एक निमित्त असे.

संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये अधिवेशनकाळात शब्दशः रोज सीतारमबरोबर भेट व गप्पा होत असत. सिगारेटचे झुरके घेत सेंट्रल हॉलजवळच्या स्मोकिंग रुममध्ये गप्पा होत असत. मग भूक लागली की बाहेर येऊन इडलीवडा, पोंगल भात असे खाणे किंवा कॉफी टोस्ट खाण्याचे असंख्य प्रसंग सांगता येतील. एकदा सेंट्रल हॉलमध्ये असेच काहीतरी खाणे खाल्ल्यानंतर त्या रात्री सीतारामला काहीतरी त्रास झाला. त्याने सेंट्रल हॉलमध्ये त्याला सर्व्हिस देणारा वेटर अजय याला रात्रीच फोन केला. हा अजय विलक्षण होता. त्याने सीतारामला त्या दिवशी काय खाल्ले याचे तपशील घडाघडा सांगितले आणि वर सीतारामला सुनावले की मी तुम्हाला अमुक गोष्टीनंतर अमुक गोष्ट खाऊ नका, त्रास होईल असे सांगितले होते, तुम्ही ऐकले नाही आणि तुम्हाला त्रास झाला. त्रास किरकोळ होता. दुसऱ्या दिवशी आम्ही सेंट्रल हॉलमध्ये गप्पा मारत बसलो असताना सीतारामने हा किस्सा सांगितले. अजयला तेथे बोलावले आणि त्या वेटरने त्याला रात्री कसे झापले तो किस्सा सुनावून सर्वांना हसवले. मुद्दा त्रासाचा नव्हता तर एका सामान्य वेटरबरोबर देखील सीतारामचे मैत्रीसंबंध कसे होते हे यावरुन दिसून येते.



सीताराम बहुभाषी होता. तो मूळचा आंध्र प्रदेशातील. जन्म चेन्नईला झालेला. शिक्षण दिल्लीत झालेले यामुळे त्याचे तेलगु, तमीळ, हिंदी व इंग्रजीवर कमालीचे प्रभुत्व होते. मल्याळी भाषाही त्याला अवगत होती. एखाद्या बंगाली माणसाप्रमाणे तो उत्तम बंगाली बोलत असे. बंगाली भाषेतून तो भाषणेही देत असे. ज्योति बसूंचा तो लाडका होता. त्याच्या पक्षाच्या तसेच इतर पक्षांच्या विविध राज्यातल्या नेत्यांबरोबर तो त्यांच्या भाषेत बोलत असे. ते पाहून एकदा ज्योति बसू त्याला म्हणाले, सीताराम तू फार धोकादायक आहेस. तू ज्या वेगवेगळ्या भाषा बोलतोस तेवढ्या भाषा आम्हाला येत नसल्याने तू काय बोलतोस ते कळत नाही आणि आम्हाला तू शिव्या देत असशील तरी ते आम्हाला कळणार नाही. तेव्हा तू अशा बैठकीत सर्वांना कळेल अशाच भाषेत बोलत जा. ज्योतिबाबूंच्या या वक्तव्यावर सगळे खळाळून हसले. हा किस्सा सीतारामने स्वतःच सांगितला.

सीतारामला अलीकडच्या काळात दोन धक्के बसले. आईचे निधन आणि त्याच्या मुलाचा करोना काळात झालेला अकाली मृत्यु. यामुळे सीताराम खूपच खचलेला आढळला. त्याची प्रकृति नीट नसली तरी कामात बुडवून घेण्याच्या सवयीने त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. ज्या इंदिरा गांधी यांच्या विरोधात त्याने आंदोलनाचे नेतृत्व केले होते त्याच इंदिरा गांधी यांचे नातू राहूल आणि सून सोनिया गांधी यांच्याबरोबरही सीतारामचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध राहिले. काहींच्या माहितीप्रमाणे अलीकडेच तो सोनिया गांधी यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या घरी गेला असता राहूलबरोबर भेट झाली. त्याला खोकल्याचा त्रास होत असल्याचे पाहिल्यानंतर राहूल गांधी यांनी जवळपास जबरदस्तीनेच त्यांना डॉक्टरांना दाखविण्यास पाठविले. परंतु प्रकृतीची आबाळ करण्याचे त्याने सोडले नाही.

सीताराम सर्वांना सोडून गेला. आता फक्त त्याच्या आठवणी आहेत. दिल्लीत ज्या नेत्यांबरोबर निकटचे मैत्रीसंबंध निर्माण झाले त्यात सीतारामचा समावेश आहे. असंख्य आठवणी, असंख्य प्रसंग व किस्से आहेत. मार्क्सवादी व कम्युनिस्ट असूनही सीताराम कधी पोथीनिष्ठ मार्क्सवादी झाला नाही. विचारसरणीशी बांधील राहूनही त्यामध्ये व्यावहारिकता आणण्याचा व राजकीय लवचिकतेचा अवलंब त्याने कौशल्याने केला. वर म्हटल्याप्रमाणे भाजपला पराभूत करण्यासाठी प्रसंगी दोन पावले मागे येण्याबाबत आपल्या सहकाऱ्यांचे मन वाळविणे ही सोपी गोष्ट नव्हती. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्यासारखा प्रतिस्पर्धी तर केरळ मध्ये कम्युनिस्ट सत्तेत तर काँग्रेस विरोधात अशी स्थिती असूनही सांप्रदायिक व कट्टरपंथी व एकाधिकारशाही प्रवृत्तींच्या विरोधात व्यापक आघाडी उभारण्यासाठी प्रसंगी पडती किंवा दुय्यम बाजू स्वीकारण्याची लवचिकता व व्यावहारिकता सीतारामने स्वतः दाखवलीच परंतु सहकाऱ्यांना ते पटवून देण्याचे महाकाय कामही त्याने केले. बदलती परिस्थिती व बदलत्या काळानुसार स्वतःला सुसंगत राखणे हे महत्वाचे असते. बदलत्या परिस्थितीत मुद्दे बदलतात, संदर्भही बदलत असतात आणि अशा वेळी स्वतःला काळसुसंगत राखण्यासाठी जी व्यावहारिकता व लवचिकता लागते ती सीतारामच्या व्यक्तिमत्वात पुरेपूर होती. त्यामुळेच त्याने पडत्या व प्रतिकूल काळातही त्याच्या पक्षाचे यशस्वी सारथ्य केले. कॉम्रेड सीताराम लाल सलाम!

■■

# हक्क मागतोय महाराष्ट्र मोहिमेतून, राज्याचं वैभव परत मिळवूया

(पान ४ वरून)

अटल सेतू, कोस्टल रोड या सर्व ठिकाणी निकृष्ट काम करून जनतेचा जीव हा धोक्यात आणण्याचं देखील काम या लोकांच्याकडून होतंय.

महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेनं पाहणाऱ्यांना उत्तर हे महाराष्ट्रातील जनतेनं दिलं हा आजपर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास आहे. महाराष्ट्राचं वैभव ज्या महायुतीनं घालवलेलं आहे, ते पुन्हा आपल्या सगळ्यांना मिळवायचं आहे. आमचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार शरद पवार साहेब यांच्या मार्गदर्शनानं आम्ही आता महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं हक्क मागतोय महाराष्ट्र ही व्यापक मोहीम आता महाराष्ट्रात आम्ही राबवतोय. महाराष्ट्राला वाचवण्यासाठी, हिरावलेला हक्क महाराष्ट्राचा



परत मिळवण्यासाठी एका नव्या जोमानं आम्ही सगळे एकत्र येतोय. महायुती सरकार विरूद्ध गलथान कारभाराची एक चार्जशीट तयार करण्यात आलेली आहे. ही चार्जशीट पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्ता घरोघरी जाऊन, प्रत्येक मतदारापर्यंत जाऊन ही माहिती देणार आहे. तसेच राज्यातील जनतेचा आक्रोश दर्शवणारे, हक्क मागतोय महाराष्ट्र हे गीत प्रसारित करण्यात येणार आहे. महायुती सरकारच्या महाराष्ट्रद्रोहाची मुद्देसूद माहिती देणारी पुस्तिका आम्ही तयार केलेली आहे. त्याचे वाटपही प्रत्येकाला करण्यात येणार आहे.

या मोहिमेत सहभागी होण्यासाठी ७०३०१२००१२ या क्रमांकावर मिस्ड् कॉल द्या. त्यानंतर तुम्हाला एक मेसेज येईल. त्यामध्ये डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू डॉट हक्क मागतोय महाराष्ट्र डॉट कॉम (www.hakkmagtoymaharashtra.com) या संकेतस्थळावर क्लिक करून आपण या मोहिमेत सहभागी व्हा. चला आपण सगळे दिल्लीची चाकरी करणाऱ्या या महाराष्ट्रातल्या महाराष्ट्रद्रोह्यांना नाकारून महाराष्ट्राचं घालवण्यात आलेलं वैभव पुन्हा मिळवण्याचं काम करूया आणि महाराष्ट्राचा हक्क पुन्हा आपण सगळे खेचून घेऊया. ही आमची सगळ्यांची भूमिका आहे. अणि त्याप्रकारे आज हक्क मागतोय महाराष्ट्र हे अशा स्वरूपाचं आमचे दहा मुद्दे हे महाराष्ट्रातल्या जनतेपर्यंत पोहोचवण्याचं काम आम्ही सगळे करतोय.

निवडणुका जवळ आहेत. परंतु, त्यासाठी आमच्या महाराष्ट्रातल्या युवक राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं बेरोजगार युवकांचे प्रश्न मांडण्यासाठी आणि उद्योग महाराष्ट्राच्या बाहेर जातायंत यासाठी महाराष्ट्रभर आंदोलन छेडण्यात येणार







आहे. त्याचबरोबर आमच्या लाडक्या बहिणी, महाराष्ट्रातल्या भगिनी सुरक्षित नाहीत. ती सुरक्षितता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रातल्या सगळ्या महिला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं जागोजागी आम्ही आंदोलन करून सरकारचं महाराष्ट्रातल्या महिला असुरक्षित आहेत, त्याकडं लक्ष वेधण्याचं काम करणार आहे. आणि शेतकऱ्यांचे प्रश्न तर आम्ही नेहमीच मांडत आलेलो आहे. त्यामुळं महाराष्ट्रातली महागाई, महाराष्ट्रातली बेरोजगारी, महाराष्ट्रातल्या महिला असुरक्षित झाल्या आहेत. या सगळ्या गोष्टींवर राष्ट्रवादी काँग्रेसकडून आवाज उठवताना आम्ही हक्क मागतोय महाराष्ट्र ही भूमिका घेऊन महाराष्ट्रातल्या जनतेकडं जातोय आणि केंद्र सरकारकडून पुन्हा महाराष्ट्राचं वैभव हक्कानं परत मिळवण्यासाठी यानिमित्तानं आम्ही ही मोहीम सुरू करतोय.

# महात्मा गांधी

# अहिंसेचे पुजारी, तरीही क्रांतीकारी



गांधी जयंतीच्या दिवशी महात्माजींच्या चरित्रामधील अनेक पैलूंचा पुन्हा एकदा प्रत्यय येतो. स्वतः महात्माजींनी कधीही ईश्वर किंवा धर्माचा प्रचार केला नाही. ते जणू जागते वागते प्रवचनकार होते. सत्ता, संपत्ती आणि अहंकारापासून माणसाला गिळंकृत करणाऱ्या आधुनिक जगात गांधीसारखा एखादा चांगला माणूस निर्माण होतो. त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले नाही याबद्दल खोलवर माहिती घेतली असता नोबेल पुरस्कार समितीतील काही सदस्यांनी त्यांच्या नावाला असहमती दर्शविली होती. त्याचे कारण होते गांधीजी हा पुरस्कार स्विकारतील किंवा नाही याबद्दल स्पष्टता नव्हती. आज जगभरात मान्यता मिळालेला अहिंसेचा पुजारी म्हणून महात्माजींची ओळख आहे. केवळ स्वातंत्र्य प्राप्ती पुरते त्यांचे विचार विश्व मर्यादित नव्हते. पण अखेर कुणा माथेफिरुने ऐन प्रार्थना स्थळी जाऊन त्यांची हत्या केली. गांधीजींच्या ओठावरचे अखेरचे शब्द हे राम हेच होते. तरी सुद्धा ९ ऑगस्ट, १९४२ रोजी त्यांनी चले जाव चा नारा दिला. गांधीजींनी त्यावेळी म्हटले होते ख्रिस्ताने आपले शरीर क्रुसवर चढवून आणि खिळे ठोकून आत्मसमर्पण केले त्याचप्रमाणे उपोषण करण्याचा निर्णय मी घेतला आहे. सर्वत्र शांती रहावी हीच सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

मला तर गांधीजी म्हणजे एक ताजमहाल वाटतो. प्रत्येक वेळी त्यांचे चरित्र आपल्याला महात्माजींचे वेगळेच पैलू समोर आणतात. आज गांधी जयंतीच्या दिवशी त्यांना मनोमन नमस्कार.

**शेवटचे पान**



